
असंभव
पांडुरंग कुलकर्णी

# असंभव

या ईपुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820

ई प्रकाशन : २० मार्च २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# असंभव

पांडुरंग कुलकर्णी

गायत्री साहित्य
२०१३

प्रकाशक
**रवींद्र गुर्जर**
गायत्री साहित्य
२६/१२, प्रतीकनगर, येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२० - २६६९५१६८
E-mail : gayatri.sahitya78@gmail.com

© **सौ. सुनीता कुलकर्णी**

प्रथमावृत्ती : ६ जून २०१३

मुखपृष्ठ
**अशोक बोकील**

अक्षरजुळणी
**भंडारी मुद्रणालय**
आनंदनगर, सिंहगड रोड
पुणे ४११०५१.


मुद्रक
**मंदार प्रिंटर्स**
कसबा पेठ
पुणे ४११०११.

**किंमत ₹ १००/-**

आत्यंतिक अडचणीच्या वेळी
माझ्या पाठीशी पहाडाप्रमाणे उभी राहणारी
आणि माझ्यावर सतत निर्व्याज्य व नि:स्वार्थी
प्रेम करणारी माझी ज्येष्ठ भगिनी

**श्रीमती पुष्पा देशपांडे (चिंचवड)**

हीस प्रेमपूर्वक !!



पांडुरंग कुलकर्णी

# असंभव

गोष्ट खूप जुन्या काळातली म्हणजे - पेन्शन बँकेत जमा होत नव्हते - त्या काळातली आहे. एक दिवस ऑफिसमध्ये फायली चाळत बसलो असताना अचानक शिपाई आला आणि एक चिठ्ठी माझ्याकडे दिली. चिठ्ठीवरचे नाव वाचून मी स्वत: उठलो आणि केबिनबाहेर जाऊन अदबीने, आलेल्या साहेबांना आत आणून बसविले आणि शिपायाला चहाची ऑर्डर दिली.

"बोला साहेब, बऱ्याच वर्षांनी दिसत आहात; रिटायर्ड झाल्यावर नाशिकला जाऊन सेटल झालात असे ऐकले होते. आज मुंबईत कसे? सहजच की --" मी चौकशी केली.

"तुमच्याचकडे काम होते," साहेब म्हणाले.

"माझ्याकडे ?" मी कुतूहलाने विचारले. "होय पेन्शनसाठी जिवंत असल्याचा दाखला घ्यायला आलोय. अहो, सरकारी नियम! प्रत्यक्ष माणूस समोर उभा असला तरी तो जिवंत असल्याचा पुरावा म्हणून सरकारी कागद हवाच!" असं म्हणून साहेब खळखळून हसले.

"हो हो, तेही बरोबर आहे,"असं म्हणून मीही त्यांच्या हसण्यात सामील झालो आणि संबंधित स्टाफला बोलविण्यासाठी बेल वाजविली. दरम्यान उगीचच एक वेडगळ विचार माझ्या डोक्यात चमकून गेला की, साहेबांना ते जिवंत असल्याचा दाखला आपण देणार आहोत खरे, पण त्यांना आपण बऱ्याच वर्षांनी पहात आहोत. ते नक्की जिवंत असतील ना? हा विचार इतक्या प्रकर्षाने डोक्यात आला की मी नकळत टेबलाखाली वाकून चक्क त्यांचे पाय बघितले. ते सुलटेच होते! आणि तिथेच 'असंभव' या कथेचे बीज माझ्या मनात रुजले.

या आणि अशा अनेक प्रसंगी सुचलेल्या असंभवनीय कथांचा हा गुच्छ वाचकचरणी नम्रपणे अर्पण!

गायत्री साहित्य

# लेखकाचे दोन शब्द

एखादा संकल्प आपण करावा आणि तो सिद्धीस जावा, यासारखा दुसरा आनंद नाही महाराज! ६ जून, २०१२चा तो दिवस. माझा ६९वा वाढदिवस. मी नित्याप्रमाणे आमचे लेखक/प्रकाशक मित्र श्री. रवींद्र गुर्जर यांचेकडे गेलो होतो. सौ. आशा गुर्जर पण हजर होत्या. उभयतांनी मला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि सहज विचारले, ''काय मग, आज वाढदिवस - विशेष काय?'' काय माझ्या मनात आले कुणास ठाऊक; पण अनाहूतपणे मी बोलून गेलो, 'गुर्जर्स!', यस, आम्ही त्यांना 'गुर्जर्स' असंच अनेकवचनी संबोधतो. तर म्हणालो, ''गुर्जर्स, पुढील वर्षी म्हणजे जून २०१३मध्ये मी माझ्या वयाची सत्तरी पूर्ण करीत आहे आणि त्या प्रीत्यर्थ माझा एक कथासंग्रह आणि एक ललितलेखसंग्रह अशी दोन पुस्तके तुमच्या 'गायत्री साहित्य'तर्फे तुम्ही प्रकाशित करणार आहात, असा संकल्प माझ्या आजच्या वाढदिवशी मी तुमच्या साक्षीने जाहीर करीत आहे.''

झालं! संकल्प तर बोलून गेलो. बाण भात्यातून निघून गेला. आता तो संकल्प सिद्धीस नेण्याची मोठी जबाबदारी माझ्यावर होती. आशाताई जातायेता मला ''लिखाण कुठपर्यंत आलंय? झाल्या का कथा? झाले का लेख?'' असं टोकत होत्या. माझी पत्नी सुनीता पण जरा रिकामा दिसलो की, ''वेळ वाया घालवू नका. संकल्प लक्षात ठेवा!'' असं टुमणं लावायची. आपोआप माझ्यावर एकप्रकारे गोड दडपण येत होते आणि त्या दडपणाखालीच मी लिहित सुटलो. काही कथा, काही लेख आधीच निरनिराळ्या दिवाळी अंकांतून प्रकाशित झाले होते. काही नवीन लिहिले. आणि अखेर 'असंभव' हा कथासंग्रह व 'मॉर्निंग वॉक' हा लेखसंग्रह, अशी दोन पुस्तके छपाईसाठी सिद्ध झाली.

'असंभव'साठी प्रा. मिलिंद जोशी या थोर साहित्यिक धुरिणाची प्रस्तावना लाभली, हे मी माझे परमभाग्यच समजतो. प्रा. मिलिंद जोशी यांच्याशी जुळलेले हे

ऋणानुबंध असेच अतूट राहोत ही ईश्वरास प्रार्थना. आणि आमचे प्रकाशक 'गायत्री साहित्य'चे श्री. रवींद्र गुर्जर यांना धन्यवाद द्यायला खरंच माझ्याकडे शब्द नाहीत. याआधी त्यांनी माझे 'सहज सुचलं म्हणून' हे पुस्तक प्रकाशित केले आहे आणि आता लागापोठ हे दुसरे व तिसरे पुस्तक प्रकाशित करीत आहेत. वेळेच बंधन (डेडलाईन) असूनही इतर कामांतून वेळ काढून आणि धावपळ करून त्यांनी ही दोन्ही पुस्तके माझ्या वाढदिवशी प्रकाशनास सिद्ध ठेवली. यासाठी... नाही... नाही... याबद्दल त्यांचे आभार वगैरे मानून, त्यांच्या रोषास पात्र होऊन, मी एक चांगला मित्र गमावू इच्छित नाही.

'अच्छी पत्नी, अच्छे बच्चे और अच्छे दोस्त नसीबवालोंकोही मिलते है' असं एक वाक्य कुठल्यातरी सिनेमात आहे. परमेश्वराने हा 'अच्छा' ठेवा मला भरभरून दिलाय, ही माझी पूर्वपुण्याईच! माझ्या कुटुंबियांनी माझ्या पाठीशी उभे केलेले बळ, हे या संकल्पसिद्धीचे बलस्थान आहे. आभारी आहे, परमेश्वरा, मी तुझा शतश: आभारी आहे!

दि. ६ जून, २०१३

**-पांडुरंग कुलकर्णी**


१८/७ (वेस्ट), प्रतीकनगर,
येरवडा, पुणे ४११००६.
संपर्क ९८२३०७९८९८
९८५०३९६७३७

# प्रस्तावना

पांडुरंग हरी कुलकर्णी हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या वृत्तीत वेड आहे ते लिहिण्या-बोलण्याचे. साहित्याच्या वाचनातून, लेखनातून आणि सादरीकरणातूनच आनंद मिळविण्याचे. आकाशवाणी आणि दूरचित्रवाणीसारख्या माध्यमांतूनही त्यांनी कार्यक्रम सादर करून नावलौकिक मिळवला आहे. रंगभूमी आणि चित्रपटभूमीवर ते सहजतेने वावरले आहेत. जीवनाचे सर्व पैलू जाणून घ्यावेत यासाठी उत्सुक असलेले ते एक मनस्वी कलावंत आहेत. त्यांचा 'असंभव' हा कथासंग्रह वाचकांना भावेल असाच आहे.

कथा हा साहित्य-प्रकार माणसांना आवडतो, याचे कारण आपल्यापेक्षा इतरांच्या आयुष्यांत काय चालले आहे याची उत्सुकता सर्वांनाच असते. कथा म्हणजे गोष्ट नव्हे. कथेच्या माध्यमातून आपल्याला जीवनात आलेल्या अनुभवांचा अन्वयार्थ माणूस लावत असतो. कथालेखन हा एकप्रकारे त्या लेखकाचा आत्मशोधच असतो. कथालेखन करीत असताना कथाकार स्वत:बरोबर समाजाला आणि समाजाबरोबर स्वत:ला तपासून पाहत असतो. स्वत:च्या नजरेने तो समाजाकडे पाहत असतो आणि पुन्हा समाजाच्या नजरेने स्वत:कडे पाहत असतो. या दृष्टादृष्टीतून सकस कथा जन्माला येते.

पांडुरंग कुलकर्णी यांचा अनेकविध क्षेत्रांत संचार घडल्यामुळे नाना प्रकारची माणसे त्यांना भेटली. त्यांनी अनेक इरसाल नमुने अनुभवले. तेच त्यांच्या कथांमधूनच डोकावतात. शान्ता शेळके म्हणत असत, ''काही अनुभव चिमटीने घ्यायचे असतात तर काही ओंजळीने!''

सर्जनशील लेखकासाठी स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या आयुष्यातील अनुभवांचा एखादा तुकडा पुरेसा असतो. त्याच्या बळावर तो सर्जनाचे बांधकाम करीत असतो. पांडुरंग कुलकर्णी यांच्या कथांमध्ये दैनंदिन जीवनातले साधे वाटणारे अनुभव सकस कथाविषय घेऊन प्रकटतात.

'असंभव' ही पहिलीच कथा वाचकांना गुंतवून ठेवणारी आहे. एका सत्शील माणसाच्या वाट्याला येणारा अनुभव आणि त्या अनुभवामागचे कारुण्य नेमक्या रीतीने आणि मोठ्या ताकदीने कथाकाराने मांडले आहे. या कथाकाराच्या कथेत हास्य आणि कारुण्य यांचा सुंदर मिलाफ आहे. 'मेरे सामनेवाली खिडकी में', 'बायको प्रेमात पडते.' या कथा वाचकांना निखळ आनंद देणाऱ्या आहेत. 'आनंद' ही कथा दु:खाचा वेगळा पदर उलगडून दाखविणारी आहे. निपुत्रिक असणाऱ्या दांपत्याला एक मूल दत्तक घेतल्यानंतर नशिबाने स्वत:चे मूल येते. मग जवळचा कोण? हा भावकल्लोळ आईच्या मनात निर्माण होतो. आणि या कथेचा शेवटही भारतीय संस्कृतीतील आई-मुलांच्या नात्याला साजेला होतो. वारस, कभी कभी ऐसा भी, खलनिग्रहणाय, नाक दाबलं की, अजब प्रेमाची गजब गोष्ट या साऱ्याच कथा वाचनीय आहेत. विषय आणि आशयाचे वैविध्य हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे.

'व्यर्थतेतला अर्थ शोधणं' ही माणसाची खासियत आहे. आपण अमुक एका मार्गानं गेलो तर आपल्या वाट्याला राग, लोभ, द्वेष, दु:ख, यशापयश येणारच हे माहीत असूनही माणसे त्या मार्गाने जात राहतात. हीच त्याची माणूस असण्याची खरी कसोटी असते. या कसोटीवर पांडुरंग हरी कुलकर्णी यांच्या कथेतली पात्रं उतरतात. म्हणूनच ती उपरी किंवा परकी वाटत नाहीत; ती आपलीशी वाटतात आणि आपला ठसा उमटवून जातात.

अनेकदा कथांमध्ये संवाद म्हणजे सुविचारांची पेरणी असेच चित्र दिसते. त्यापासूनही या कथा अलिप्त आहेत, याचा आनंद वाटतो. साधे-सोपे आणि सहज वाटणारे संवाद यातून कथा फुलत जाते आणि वाचकांची कथेची उत्सुकता वाढत जाते. आजकालच्या कथासंग्रहांमध्ये

वाचनीयता हा गुण अभावानेच आढळतो. त्याला हा कथासंग्रह अपवाद आहे. माझ्याप्रमाणेच वाचकांनाही हा कथासंग्रह भावेल अशी खात्री आहे.

पांडुरंग कुलकर्णी यांना कथेची नस सापडली आहे. त्यांनी आपला लिहिता हात थांबवू नये. त्यांच्या पुढील कथाप्रवासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**गुरुवार, ३० मे २०१३**

**-प्रा. मिलिंद जोशी**
बी १/१२, रविराज टेरेस,
सुखसागरनगर, कात्रज, पुणे ४६.
फोन : (०२०) २६९६३५०९
मो. : ९८५०२७०८२३

## अ नु क्र म

असंभव / १३
मेरे सामनेवाली खिडकी में... / २८
नाक दाबलं की... / ४१
खलनिग्रहणाय / ५५
वारस / ६५
आनंद / ८९
कभी कभी ऐसा भी होता है! / ११०
अजब प्रेमाची गजब गोष्ट / ११७
बायको प्रेमात पडते / १२१

# असंभव

नाना कुलकर्णी. आमचे हेडक्लार्क. ना. ना. म्हणजे नामदेव नारायण कुलकर्णी. म्हणून त्यांना सगळे नाना कुलकर्णी असं म्हणत. त्यांना आम्ही जरी 'नाना' म्हणत असलो, तरी खरंतर ते 'होहो' कुलकर्णी होते. दोन ना(नकार) एकत्र आले की एक होकार होतो, असं म्हणतात. तसंच नानांचं होतं. ते कधीही कुणालाही नाही म्हणायचे नाहीत.

आता कुलकर्णी म्हटलं की माणूस कसा असेल, हे तुम्ही ओळखलंच असेल. चोर, दरोडेखोर, खुनी, धूर्त, कावेबाज या कॅटेगरीत तुम्ही कधी कुलकर्णी हे नाव ऐकलंय? उद्योगपती, कारखानदार तर शक्यच नाही. पुढारी आणि मंत्री? छे! नाहीच नाही. यापैकी कुठल्याही कॅटेगरीत कुलकर्णी गेला तर 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है?' असं म्हणून तिथून त्याला तडीपार केलं जाईल!

कुलकर्णी म्हटलं, की साधा, सरळ, नाकासमोर थेट आणि खाली बघून चालणारा माणूस. रस्त्यातून चालताना समोरून मुंगी आली, तरी अदबीनं बाजूला होऊन तिला वाट करून देणारा माणूस. चुकून कुणाच्या फाटक्या चपलेवर पाय पडला, तरी चप्पल आपल्या पांढऱ्या स्वच्छ धोतरानं पुसून देणारा माणूस. एक निरुपद्रवी माणूस.

आमचे हेडक्लार्क कुलकर्णी पण असेच साधे, सरळ, वेळेच्या आधी ऑफिसमध्ये येणार आणि ऑफिस सुटल्यावर सगळ्यांच्या नंतर घरी जाणार. खालच्या स्टाफवर कधी डाफरणार नाहीत, ओरडणार नाहीत की, वरच्या साहेबांसमोर कधी मान वर करणार नाहीत.

घरची परिस्थिती यथातथाच असावी; पण त्याबद्दल ऑफिसमध्ये कुणाशीही चकार शब्दानं बोलायचे नाहीत. कसं काय कुणास ठाऊक, माझ्याशी मात्र त्यांचं चांगलं जमायचं. मला वाटतं, मी ऑफिसमधला एकमेव असेन की ज्याच्याशी ते घरगुती गोष्टी शेअर करायचे. कदाचित इतर लोकं त्यांची टिंगल-टवाळी करतील, अशी त्यांना भीती वाटत असावी.

त्यांची आई लहानपणीच गेली, वडील पण लवकर गेले. त्यामुळे लग्नाच्या तीन बहिणी, एक शिकणारा भाऊ आणि एक म्हातारी काकी, एवढी सगळी जबाबदारी ऐन तारुण्यात त्यांच्यावर पडली. तुटपुंज्या पगारात स्वत: अर्धपोटी राहून हा परिवार ते सांभाळत. वेळोवेळी प्रॉव्हिडंट फंडातून कर्ज काढून त्यांनी बहिणींची लग्नं केली. भावाचं शिक्षण पूर्ण केलं. हे सगळं करीत असताना स्वत:च्या लग्नाचा विचार करायची त्यांना सवडच झाली नाही. नंतर वय उलटून गेलं म्हणून त्यांनी लग्नाचा विचारच सोडला; पण म्हाताऱ्या काकीनं मागे लागून त्यांना लग्न करणं भाग पाडलं आणि त्यांच्यावर अक्षता टाकून ती गेली. कुलकर्णींचं लग्न उशिराच झालं. आता त्यांना एक मुलगा आणि दोन मुली आहेत.

कुलकर्णी आजपासून रिटायर होत आहेत. रिटायर होताना त्यांचा सर्वांत मोठा मुलगा आठ वर्षांचा आहे. त्याच्याहून लहान दोन बहिणी आणि पत्नी एवढ्या परिवाराचं त्यांच्या एकट्याच्या पेन्शनमध्ये कसं भागणार? फंड सगळा आधीच कर्ज काढून संपलेला. काय आणि कसं करतील आता कुलकर्णी? हा विचार उगीचच माझं डोकं कुरतडायला लागला. नाही म्हटलं, तरी माझ्यात आणि त्यांच्यात एक मैत्रीचं नातं निर्माण झालं होतं.

त्या दिवशी सकाळी आम्ही दोघं ऑफिसच्या कॅण्टीनमध्ये चहा घेत होतो. मी त्यांना सहज म्हणालो, ''काय नाना... उद्यापासून तुमचा आराम. ऑफिसची कटकट संपली.''

''हं!'' नाना एवढंच हुंकारले आणि उगीचच मला स्वत:चं काहीतरी चुकल्यासारखं वाटलं. मी त्यांच्या दुखऱ्या मनावर आघात तर केला नव्हता? मनात विचार आला, की पत्नी, तीन मुलं एवढा संसार नाना, त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनीत कसा चालवणार? मुलींची लग्नं, मुलाचं शिक्षण, कितीतरी गोष्टी. कमावतं दुसरं कुणीच नाही. त्यांची एकट्याची

एवढीशी पेन्शन कुठं कुठं पुरी पडणार? शेवटी मी न राहवून विचारलंच, ''पुढचं प्लॅनिंग काय केलंत नाना? सरकारी क्वॉर्टर तर तुम्हाला सोडावीच लागेल.''

''हं... क्वॉर्टर तर सोडावी लागेलच,'' नाना निराशपणे म्हणाले.

''पण मग तुम्ही जाणार कुठं? मुंबईत कुठं जागा बघून ठेवलीत का?'' मी पुन्हा विचारलं.

''मुंबईत? छे छे!! मला परवडणार आहे का ते?''

''मग राहणार कुठं तुम्ही?'' माझा प्रश्न.

''पनवेलला आमचं वडिलोपार्जित छोटंसं घर आहे, तिकडे जाऊन राहीन म्हणतो,'' नानांनी खुलासा केला.

ऐकून मला बरं वाटलं. चला, निदान डोक्यावर छप्पर तर आहे. ''पण मग इतर खर्चाचं काय? मुलांची शिक्षणं, लग्नं, तुमच्या एकट्याच्या पेन्शनीत हे सगळं भागणं कठीण आहे,'' मी वस्तुनिष्ठ बोललो.

''हं... कठीण तर आहेत, पण बघू. ते म्हणतात ना, आलिया भोगासी असावे सादर, देवावरी भार टाकूनीया.''

''ते खरंय नाना! देव तर आहेच; पण आपणसुद्धा थोडा काही तरी विचार करायलाच हवा ना?'' मी म्हणालो.

कुलकर्णी म्हणाले, ''त्याचं काय आहे साने, पनवेलच्या वाड्यात दोन-तीन भाडेकरू आहेत. शिवाय मी वडलांकडून भिक्षुकीचा व्यवसाय शिकलेलो आहे, त्याचा उपयोग मला करता येईल. म्हणजे पेन्शन, थोडं भाडं आणि थोडी भिक्षुकी असं मिळून रेटू कसं तरी!''

हे ऐकलं मात्र, मला मनोमन कुलकर्णींची दया आली; पण मी तरी काय करणार? मी पण साधा मध्यमवर्गीय नोकरदार माणूस. दरमहा त्यांना उचलून पैसे देणं शक्यच नव्हतं, आणि तसे त्यांनीही घेतले नसते; पण त्यांच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असं माझं मन मला सारखं सांगत होतं. पण काय करणार? काय? एक मोठं प्रश्नचिन्ह - आणि अचानक मला एक उत्तर सुचलं. यस्! एवढी मदत मी त्यांना नक्कीच करू शकतो. त्यांचा संसार सावरण्यासाठी खारीचा वाटा मी नक्कीच उचलू शकतो. मी कुलकर्णींना

म्हणालो, ''हे बघा साहेब, मी पेन्शन डिपार्टमेंटलाच आहे. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे मी तुमचे पेन्शन पेपर्स तातडीने तयार करतो. म्हणजे तुमची पेन्शन लगेच सुरू होईल. दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्ही दरमहा पेन्शन घ्यायला याल, तेव्हा तुमची भिक्षुकीची आणि इतर सगळी कामं सांभाळून, ऑफिसच्या दिवशी आणि ऑफिसच्या वेळेत कधीही या. अगदी ऑफिसच्या वेळेनंतर आलात तरी चालेल. मी तुमचं बिल रेडी ठेवत जाईन. तुम्ही फक्त सही करायची, पेन्शन घ्यायचं आणि निघायचं. त्यामुळं तुमच्यावर पेन्शन घेण्यासाठी दिवसाचं आणि वेळेचं बंधन राहणार नाही, आणि हा वाचलेला वेळ तुम्हाला तुमची भिक्षुकी वगैरे कामासाठी वापरता येईल - कसं?'' (त्या काळात पेन्शन बँकेत जमा होत नसे. प्रत्यक्ष जाऊनच ते आणावं लागे.)

हे मी कुलकर्णींना सांगितलं आणि मला माझ्या मनावरचा थोडासा का होईना, भार हलका झाल्यासारखं वाटलं.

''तेवढं जरी तुम्ही केलंत तरी खूप झालं सानेसाहेब,'' दोन्ही हात नम्रपणे जोडून कुलकर्णी म्हणाले.

मी त्यांचे जोडलेले हात प्रेमानं माझ्या दोन्ही हातात घेतले आणि म्हणालो, ''कृपा करून तुम्ही मला 'साहेब' म्हणू नका. सानेच म्हणा,'' असं म्हणून मी उठलो आणि भटाचे चहाचे पैसे देऊ लागलो, तर तो म्हणाला, ''पैसे ऱ्हाऊ द्या साहेब. आजचा चहा कुलकर्णीसाहेबांना माझ्यातर्फे.''

कुलकर्णींनी कृतज्ञतेनं त्याच्या पाठीवर प्रेमानं थोपटलं आणि आम्ही दोघंही कॅन्टीनच्या बाहेर पडलो.

तेव्हापासून मी पेन्शनच्या तारखेपर्यंत कुलकर्णींचं पेन्शनचं बिल वगैरे अप-टू-डेट करून ठेवत असे. कुलकर्णी त्यांच्या सवडीप्रमाणे कधीही येत आणि सही करून लगेच पेन्शन घेऊन निघत. मात्र प्रत्येक वेळी भटाकडे गरम वडा आणि चहा घेतल्याशिवाय मी त्यांना सोडत नसे.

आमचा हा मासिक कार्यक्रम पंधरा वर्षं अव्याहत चालू होता. कुलकर्णी बसची गर्दी टाळण्यासाठी बहुतेक वेळा संध्याकाळी ऑफिस सुटल्यावरच येत असत. मी ऑफिसमध्ये उशिरापर्यंत बसतो, हे त्यांना ठाऊक होतं. खरं

तर त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून बसून राहायचो; पण हे मात्र मी त्यांना कळू दिलं नव्हतं. हो, उगाच त्यांना ऑकवर्ड आणि गिल्टी वाटायला नको! त्यामुळे पेन्शन घ्यायला ते आरामात संध्याकाळी येत. पेन्शन दिल्यावर मी भटाकडून एक वडा आणि एक चहा त्यांच्यासाठी मागवत असे. ''तुम्ही नाही चहा-वडा घेत?'' ते मला नेहमी विचारत.

''नाही, एकदा दुपारचा चहा झाला, की रात्री घरी जेवेपर्यंत मी काहीच घेत नाही,'' मी सांगत असे आणि ते खरंही होतं. असा हा आमचा पेन्शन आणि वडा-चहा सिलसिला तब्बल पंधरा वर्षं चालला होता.

एक दिवस मी असाच दिवसभराचं अकाउंट्स चेक करत बसलो होतो. मोरे आला आणि ''साहेबांनी तुम्हाला अर्जंट बोलावलंय,'' असा निरोप त्यानं सांगितला.

साहेबांनी मला असं अचानक का बोलावून घ्यावं बरं... असा विचार करीत मी साहेबांच्या केबिनपर्यंत गेलो. शिरस्त्याप्रमाणं दार किलकिलं करून 'मे आय कम इन सर?' अशी औपचारिक परवानगी मागितली आणि त्यांनी 'कम इन' म्हणण्याची वाट न बघता डायरेक्ट आत घुसलो. आमचं हे असं नेहमीचंच होतं. आत घुसून मी त्यांच्यासमोर ठेवलेल्या खुर्चीच्या दिशेनं दोन पावलं टाकली नाहीत तो 'थांबा साने' त्यांचा हुकमी आवाज माझ्या कानावर पडला. मी थबकलो. त्यांच्याकडे बघतच राहिलो. माझ्यासाठी आज हे वेगळंच होतं. ''मी तुम्हाला 'आत या' असं नाही म्हणालो,'' साहेबांचं पुढचं वाक्य माझ्या कानावर पडलं.

''न...नाही साहेब... पण...''

''देन, गो बॅक अँड वेट आऊटसाईड. ऑब्झर्व्ह दि मॅनर्स,'' त्याच हुकुमी आवाजात ते पुढं म्हणाले,

मी काही चुकीचं तर ऐकलं नाही ना, या विचारात काही क्षण सुन्न होऊन त्यांच्याकडं बघतच राहिलो. बहुतेक ते स्वप्नच असावं.

तेवढ्यात त्यांनी 'टण टण टण' करून टेबलावरची बेल जोरात वाजवली. ''काय साहेब'' असं म्हणत मोरे शिपाई आत आला.

''काय रे, मला भेटायला येणारा माणूस डायरेक्ट केबिनमध्ये कसा घुसतो? बाहेर स्टुलावर बसून तू काय झोपा काढतोस की काय?'' साहेब

त्याच्यावर खेकसले. त्यांचं हे खेकसणं मोरेवर नसून माझ्यावर आहे, हे मी ओळखलं. पण का? माझ्याशी नेहमी फ्रेंडली वागणारे साहेब आज असे का वागत आहेत, या विचारात मी केबिनबाहेर आलो आणि सुन्नपणे उभा राहिलो. मोरे शिपाई माझ्या मागोमाग बाहेर आला आणि मला म्हणाला, ''काय सानेसाहेब, आज राऊतसाहेब एवढे का बरं गरम झाले तुमच्यावर?'' कुणास ठाऊक, अशा अर्थानं वरच्या ओठानं खालचा ओठ दुमडून मी खांदे उडवले.

मी विचार करीत होतो, की आज राऊतसाहेबांनी माझ्याशी असं का वागावं? नेहमीचा शिरस्ता असा की, त्यांनी बोलावलं असो किंवा नसो, काही कामासाठी किंवा सहज मी त्यांच्या केबिनच्या दारावर नॉक करून, दार किलकिले उघडून 'मे आय कम इन सर?' अशी त्यांची औपचारिक परवानगी मागावी आणि त्यांनी 'या... या... साने' असं म्हणून मला हसत बोलवावं आणि शिपायाला हाक मारून, ''मोरे, सानेसाहेबांसाठी एक कडक चहा सांग रे,'' असा आदेश द्यावा आणि मग चहा येईपर्यंत आणि चहा घेता घेता काही काम असेल तर त्याबद्दल किंवा वाचलेल्या एखाद्या नवीन पुस्तकाबद्दल चर्चा करावी... आणि आज हे असं? काहीतरी गडबड नक्कीच आहे. नाहीतर राऊत साहेब माझ्याशी असं कधीच वागणार नाहीत. अगदी माझ्या हातून काही चूक झाली, तरी ती चूक ते हसतखेळत माझ्या पदरात टाकतील. मला तो प्रसंग आठवला...

एकदा दुपारनंतर माझं कॅशबुक आणि कॅशबॉक्स घेऊन त्यांनी मला मोरे शिपायाकडून असंच बोलावून घेतलं होतं. मी नेहमीप्रमाणे त्यांच्या पुढ्यातल्या खुर्चीत जाऊन बसल्यावर त्यांनी कॅश मोजून ती कॅशबुकाशी टॅली केली. म्हणाले, ''काय साने, आज कुबेरात जाऊन एक्झिक्युटिव्ह लंच घेतलात काय?''

मी म्हणालो, ''नाही साहेब, मी तर आज डबा आणला होता. पण असं का विचारता?'' साहेबांनी माझी कॅश बॉक्स माझ्याकडे सरकवली आणि म्हणाले, ''नाही, तुमच्या कॅशमध्ये शंभर रुपये कमी आहेत म्हणून म्हणालो.''

''काय? शंभर रुपये कमी? सॉरी सर, मला वाटतं कुणाला तरी नोटेला

नोट चिकटून एक नोट जादा गेली असावी; पण मी भरून टाकीन लगेच ती.'' मी ओशाळून म्हणालो.

''छान! अशीच जर कामं केलीत, तर महिन्याचा पगार इथंच भरावा लागेल तुम्हाला. जरा केअरफुली कामं करता जा,'' असं म्हणून साहेबांनी खिशातून एक शंभराची नोट काढून मला दाखवली आणि म्हणाले, ''कुणाला तरी नाही हो साने, सकाळी माझ्या टी.ए. बिलाचं पेमेंट केलंत ना तुम्ही, तेव्हा मलाच एक नोट जादा दिलीत. म्हणूनच मी कॅशबुक आणि कॅशबॉक्स मागवली आणि तुमची कॅश बुकाबरोबर टॅली केली, तर शंभर रुमये कमी. म्हटलं आज साने बरोबर सापडलेत. करूया जरा गंमत.'' असं म्हणून नोट मला दिली आणि म्हणाले, ''घ्या ही नोट आणि कॅशमध्ये जमा करा आणि बी केअरफुल इन फ्युचर,'' असं म्हणून हसले.

कुणाच्याही हातून अशी प्रामाणिक चूक झाली, तर ते कधी रागावत नसत. त्यांना दोन गोष्टींची भयंकर चीड होती - त्या म्हणजे खोटेपणा आणि भ्रष्टाचार. पण मग ते आज माझ्यावर इतके का चिडलेत, असा विचार करीत मी सुन्नपणे शून्यात बघत उभा असतानाच केबिनमधून आलेल्या 'टण टण' अशा बेलच्या आवाजानं माझी तंद्री भंग पावली. मोरे शिपाई आत जाऊन बाहेर आला आणि मला म्हणाला, ''तुम्हाला साहेबांनी बोलावलंय.''

आता मात्र मी सावधपणे केबिनचं दार किलकिलं केलं आणि शिस्तीत म्हणालो, ''मे आय कम इन सर?''

''यस् कम इन!'' साहेबांच्या आवाजात अजून तीच हुकमत होती.

मी आत गेलो आणि नेहमीप्रमाणे त्यांच्यासमोर न बसता उभाच राहून, ''मला बोलावलंत का'' या अर्थी नम्रपणे ''यस सर'' असं म्हणालो. आता तरी ते मला बसायला सांगतील, अशी माझी अपेक्षा होती; पण मला तसंच उभं ठेवून त्यांनी माझ्या दिशेनं एक सरकारी लिफाफा भिरकावला आणि त्याच हुकमी आवाजात म्हणाले, ''वाचा हे.''

मी लिफाफ्यातला कागद काढून वाचू लागलो आणि जसजसा मी वाचत गेलो तसतसा माझ्या चेहऱ्याचा रंग उडत गेला. माझे पाय लटपटू लागले. सर्वांगाला दरदरून घाम फुटला. ''न... नाही... नाही... साहेब... क... कुणीतरी माझ्याविरुद्ध ही... ही... खोटी तक्रार केलीय साहेब... शक्य

नाही... हे शक्य नाही साहेब,'' मी चाचरत कसाबसा बोललो. तो कागद म्हणजे ऑफिसनं मला दिलेलं चार्जशीट होतं. रिडायर्ड हेडक्लार्क नाना कुलकर्णी यांची पेन्शन मी त्यांची खोटी सही करून, गेली तब्बल पंधरा वर्षे तिचा अपहार केला आहे, असा अफरातफरीचा चार्ज माझ्यावर ठेवला होता.

''खोटं... खोटं आहे साहेब, सगळं साफ खोटं आहे. नक्कीच कुणीतरी माझ्या वाईटावर आहे. माझ्यावरच्या आकसापोटी माझ्याविरुद्ध ही खोटी तक्रार केलीय साहेब,'' मी भराभर आवेशात माझी कैफियत मांडली.

''तुम्हाला काय वाटतं मि. साने, तक्रार आली आणि काही चौकशी न करताच ऑफिसनं ॲक्शन घेतली? नाही साने, आरोप गंभीर आहे आणि म्हणून ॲक्शन घेण्यापूर्वीच ऑफिसनं प्रकरण चौकशीसाठी फ्लाइंग स्क्वाडकडं दिलं होतं आणि हा त्यांचा इन्कायरी रिपोर्ट आहे,'' असं म्हणून साहेबांनी आणखी एक लिफाफा माझ्याकडं सरकवला आणि म्हणाले, ''वाचा!''

मी रिपोर्ट वाचला आणि म्हणालो, ''नाही साहेब, हा रिपोर्ट खरा नाही साहेब. मी शपथेवर सांगतो साहेब. दरमहा स्वत: कुलकर्णीसाहेबांनी जातीनं येऊन पेन्शन नेली आहे. अहो, ते माझे चांगले मित्र होते. त्यांच्याबद्दल मला खूप सहानुभूती होती. उलट एवढ्याशा तुटपुंज्या पेन्शनमध्ये ते पत्नी आणि तीन मुलांचा परिवार कसा सांभाळणार, याचीच मला चिंता लागून राहिली होती. मी ती त्यांच्याजवळ बोलूनही दाखवली होती. खोटं... खोटं आहे सगळं साहेब. तक्रार खोटी आहे, हा रिपोर्ट खोटा आहे. कुणीतरी मला यात गुंतवायला बघतंय. हे सगळं खोटं आहे साहेब.''

साहेबांनी त्यांच्या उजव्या हाताचा पंजा दाखवून मला गप्प केलं आणि ड्रॉवरमधून आणखी एक लिफाफा काढून मला दिला आणि म्हणाले, ''आता हे बघा.''

मी लिफाफ्यातून कागद काढून बघितला - ते नाना कुलकर्णी यांचं डेथ सर्टिफिकेट होतं.

''आता बोला मि. साने, तक्रार खोटी, रिपोर्ट खोटा आणि हे डेथ सर्टिफिकेट पण खोटं? मि. साने, ऑफिसनं तुमच्या सेक्शनमध्ये पण चौकशी

केली; पण गेल्या पंधरा वर्षांत ऑफिसमधल्या कुणीही कुलकर्णींना पेन्शनसाठी, ऑर अदरवाईज, ऑफिसमध्ये आलेलं पाहिलं नाही. तशी आम्ही त्यांची स्टेटमेंट्स रेकॉर्ड केलीत. आता मला सांगा, सगळं ऑफिस तुमच्या विरोधात आहे? बोला मि. साने बोला. कुणीच कसं बघितलं नाही कुलकर्णींना?

मी काय बोलणार? मीच कुलकर्णींना सांगितलं होतं, की पेन्शन घ्यायला तुम्ही तुमच्या सवडीनुसार ऑफिस बंद झाल्यावर आलात तरी चालेल; आणि कुलकर्णी त्याप्रमाणे ऑफिस बंद झाल्यावर यायचे. मग कोण कसं बघणार त्यांना? छेऽऽः, सहानुभूतीपोटी त्यांना दिलेली ही सवलत माझ्याच अंगाशी आली - इतक्या भयंकरपणे. आणि अचानक मल आठवलं... भट... यस्... चहावाल्या भटानं त्यांना नक्कीच बघितलंय. कारण ते आले, की मी नेहमी भटाला एक वडा आणि चहाची ऑर्डर देत असे. यस्! करेक्ट! मी उत्साहात साहेबांना म्हणालो, ''साहेब, कुलकर्णी पेन्शन न्यायला येत असत तेव्हा त्यांना बघणारी एक व्यक्ती आहे, चहावाला भट.''

''तो कसा काय?'' साहेबांनी विचारलं.

''साहेब, कुलकर्णींना त्यांची भिक्षुकी सांभाळून पेन्शन न्यायला येत जा, असं मीच सांगितलं होतं. त्यामुळं ते सावकाश ऑफिस सुटल्यावर येत असत. त्या वेळी इतर कुणी त्यांना बघणं शक्यच नव्हतं; पण ते आल्यावर मी नियमितपणे, त्यांच्यासाठी, भटाला वडा आणि चहाची ऑर्डर देत असे. तेव्हा प्रत्येक वेळी त्यांना भटानं नक्कीच पाहिलं आहे.''

साहेबांनी डोळे बारीक करून माझ्याकडं रोखून बघितलं आणि बेल मारली.

''काय साहेब?'' मोरेनं येऊन विचारलं.

''अरे, त्या चहावाल्या भटाला जरा बोलाव,'' त्यांनी हुकमी आवाजात मोरेला सांगितलं. ''वा! मि. साने, तुम्हाला कुलकर्णींविषयी सहानुभूती होती. त्यांचा कामाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून तुम्ही त्यांना ऑफिस सुटल्यावर पेन्शन घ्यायला बोलावत होतात. ऑफिसात कुणी नसताना ते तुमच्याकडून पेन्शन घेऊन जात असत. ही तुमची बचावाची स्टोरी तर मस्त जुळवलीत; पण लक्षात ठेवा, मढ्याच्या टाळूवरचं तुम्ही खाल्लेलं हे लोणी तुम्हाला

पचणार नाही.''इतक्यात, ''काय साहेब?'' असं म्हणत भट आत आला.

''काय रे, तुझ्याकडचा वडा आणि चहा फार चांगला असतो म्हणे?''

''होय साहेब, आणू का तुम्हा दोघांसाठी?'' भटानं खूष होऊन विचारलं.

''आणू नकोस, पण आपले कुलकर्णीसाहेब पेन्शनसाठी आले, की प्रत्येक वेळी तू त्यांना वडा आणि चहा देतोस म्हणे! खरं का हे?''

''कोण कुलकर्णी? आपल्याकडं हेडक्लार्क होते ते?'' भटानं विचारलं.

''हां... हां... तेच हेडक्लार्क कुलकर्णीसाहेब.''

''छा... छा...!!अहो, त्यांना रिटायर्ड झाल्यावर मी मोजून तीन-चार वेळा बघितलं असेल. गेल्या दहा-पंधरा वर्षांत तर दिसलेच नाहीत ते,'' भटानं सांगितलं.

काय? इतकी वर्षं नानांसाठी वडा-चहा आणणाऱ्या भटाला ते दिसले नाहीत? अशक्य! मग हा खोटं का बोलतोय? मी संभ्रमात पडलो.

''बरं, कधी दिसले तर मी बोलावलंय म्हणून सांग त्यांना. जा आता,'' असं ते म्हणाले आणि ''जी, सांगतो,'' असं म्हणून भट निघून गेला.

भट गेल्यावर राऊतसाहेबांनी मान हलवत सहेतुक माझ्याकडं बघितलं. ''बोला मि. साने, यावर आता काय म्हणणं आहे?''

आता मात्र माझं सगळं अवसान गळून पडलं. हे काय चाललंय हेच समजेना. दोन-पाच वेळा नाही, तर सतत पंधरा वर्षं कुलकर्णींसाठी वडा आणि चहा घेऊन येणारा, माझ्या रोजच्या भेटण्यातला चहावाला भट पण माझ्याविरुद्ध, अगदी माझ्या समोरच, बोललेला पाहून मी तर हतबुद्धच झालो आणि भकास नजरेनं साहेबांकडं बघत राहिलो.

''आय ॲम सॉरी मि. साने. बट नाऊ आय वुईल हॅव टू हँडओव्हर धिस केस टू पुलिस,'' असं म्हणून साहेबांनी टेबलावरचा फोन पुढे ओढला आणि एक नंबर फिरवला.

मी तर चेतनाहीनच झालो होतो. मला डोळे असून समोरचं दिसत नव्हतं की कान असून ऐकू येत नव्हतं. साहेबांचं फोनवर बोलून झालं आणि रिसीव्हर ठेवता ठेवता त्यांचा हात फोनच्या बाजूलाच ठेवलेल्या डेस्क कॅलेंडरला लागला आणि ते नेमकं माझ्या बाजूला धाडकन पडलं. मी भानावर

येऊन माझ्या नकळत ते कॅलेंडर उचललं आणि परत टेबलावर ठेवता ठेवता माझं लक्ष तारखेवर गेलं आणि मी चमकलो.

''साहेब, कुलकर्णी कोणत्याही परिस्थितीत पाच तारखेपर्यंत पेन्शन घेऊन जातातच. आज पाच तारीख आहे. आज ते नक्की येतील,'' मी उत्तेजित होऊन म्हणालो.

साहेबांनी अविश्वासानं माझ्याकडं बघितलं आणि म्हणाले, ''ठीक आहे, धिस इज लास्ट चान्स फॉर यू. आपण थांबू या थोडा वेळ त्यांच्यासाठी. जर ते आले तर प्रश्नच मिटला...'' साहेब म्हणाले. माझ्या जिवात जीव आला. कुलकर्णी आज नक्की येणार, याची मला शंभर टक्के खात्री होती.

इतक्यात साहेबांनी फोन करून बोलाविलेले सब-इन्स्पेक्टर साळवी, त्यांच्या दोन कॉन्स्टेबलसह केबिनमध्ये हजर झाले.

''या, बसा साळवी, आपण थोडा वेळ थांबू या. तोपर्यंत, गो थ्रू धिस रिपोर्ट अँड पेपर्स,'' असं म्हणून साहेबांनी पेपर्स साळवींपुढे सरकवले. साळवींनी पेपर हातात घेता घेता माझ्याकडं बघितलं.

''ही इज दि मॅन इन्व्हॉल्व्ड इन दि केस,'' साहेबांनी त्यांना माहिती पुरवली.

ऑफिस सुटलं. एक-एक करून सगळा स्टाफ जाऊ लागला. एक-दोन जण जाता जाता केबिनमध्ये, साहेबांना बाय करण्यासाठी डोकावले. केबिनमध्ये पोलीस बघून त्यांच्या डोळ्यांत आश्चर्य आणि गोंधळलेपण दिसत होतं. हळूहळू ऑफिस रिकामं झालं. साहेबांनी बेल मारून मोरेला बोलावलं आणि ''कुलकर्णी आले की त्यांना आत पाठवून द्या,'' असं सांगितलं.

''पण या रिपोर्टप्रमाणे तर ते...'' साळवींचं वाक्य अर्धवट सोडून साहेबांनी उजव्या हाताच्या पंजानं 'जरा थांबा' अशी खूण केली.

सहा... सात... आठ... वाजले; पण कुलकर्णी काही आले नाहीत. ''साने, आता तरी तुमचं हे नाटक पुरे करा आणि काय ते स्पष्ट सांगा,'' साहेब म्हणाले.

मी अगदी रडकुंडीला आलो होतो. ''साहेब, माझ्या मुलाबाळांची शपथ घेऊन सांगतो. एवढ्यात ते यायलाच पाहिजे होते; पण का नाही आले,

हेच मला कळत नाहीये,'' मी तळमळीनं म्हणालो.

''सगळं तुम्हाला चांगलं कळतंय मि. साने. आता तरी हे नाटक बंद करा आणि गुन्हा कबूल करा,'' साहेब निर्वाणीचं बोलले.

''साहेब, प्लीज माझ्यावर विश्वास ठेवा,'' मी पुन्हा काकुळतीनं विनंती केली.

एकाएकी साहेब खुर्चीतून उठले आणि साळवींना म्हणाले, ''सब इन्स्पेक्टर साहेब, तुमची प्रोसेस सुरू करा. मी बाहेर आहे,'' असं म्हणून ताडताड जाऊन केबिनचा दरवाजा उघडून बाहेर पडले.

मी धावत त्यांच्या मागे गेलो आणि दारातच त्यांना अडवून त्यांच्या पायावर पडलो. त्यांच्या पायांना घट्ट मिठी मारून विनवणी केली, ''साहेब, कृपा करून असं करू नका. मी खरंच निर्दोष आहे. कुलकर्णींच्या पेन्शनचा मी अपहार केलेला नाही. पुन:पुन्हा सांगतो साहेब, कुलकर्णी स्वत: येऊन त्यांची पेन्शन घेऊन गेलेत.''

''इनफ, मि. साने इनफ! खूप झालं. यू हॅव टू फेस,'' असं म्हणून त्यांनी आपले पाय माझ्या मिठीतून सोडवून घेण्याचा जोरदार प्रयत्न केला; पण मी माझी मिठी घट्ट केली आणि म्हणालो, ''साहेब, मला माहीत आहे की आतापर्यंत तुम्ही माझ्यासाठी खूप केलंय; पण आता ही शेवटची विनंती. माझ्यासाठी एकदाच, फक्त एकदाच माझं ऐका. मला कुलकर्णींचं पनवेलचं घर माहीत आहे. तेव्हा कृपया एकदा त्यांच्या घरी आपण स्वत: जाऊन झाल्या प्रकाराची खातरजमा करू.''

''नाऊ नथिंग डुइंग,'' राऊतसाहेब मोठ्यानं मान हलवत म्हणाले.

''सर, ते एवढं म्हणातहेत तर अजून एक चान्स देऊ त्यांना,'' पी.एस.आय. साळवींनी मध्येच माझी रदबदली केली. मी मनोमन त्यांचे आभार मानले.

''ओ.के. लेट अस गो. माझी गाडी काढू की...''

''नको सर, मी जीप आणली आहे ना,'' साळवी म्हणाले.

साहेब, साळवी, त्यांचा स्टाफ आणि मी असे आम्ही जीपमध्ये बसलो आणि जीप पनवेलच्या दिशेनं निघाली.

जीप पनवेलला कुलकर्णींच्या वाड्यासमोर थांबली. ''मि. साने, तुम्हीच पुढं जाऊन चौकशी करा. आम्ही तुमच्या मागेच आहोत,'' साहेब म्हणाले.

मी कुलकर्णींच्या घराची कडी वाजवली. दार वहिनींनीच उघडलं. ‘‘अरे सानेसाहेब, तुम्ही एवढ्या रात्री?’’ त्यांनी आश्चर्यानं विचारलं.

‘‘ते मी नंतर सांगतो; पण आधी सांगा कुलकर्णी कुठं आहेत?’’ मी घाईनं विचारलं.

‘‘म्हणजे काय? तुम्हाला माहीत नाही का ते? अहो, रिटायर्ड झाल्यावर तीन-चार महिन्यांतच गेले ते!’’ खुद्द वहिनींच्याच तोंडून मी हे ऐकलं आणि सगळं जग माझ्याभोवती गरागरा फिरायला लागलं. सर्वांगातून विजेचा एक लोळ गेला. माझी शुद्ध हरपली आणि मी धाडकन जमिनीवर कोसळलो. मला शुद्ध आली तेव्हा मी हॉस्पिटलच्या कॉटवर होतो. शेजारी राऊतसाहेब, पी.एस.आय. साळवी आणि डॉक्टर बसले होते. शुद्ध आली आणि लगेच मी या मंडळींना पाहून उठू लागलो.

‘‘रिलॅक्स मि. साने, रिलॅक्स. उठू नका. गेले चोवीस तास तुम्ही बेशुद्ध होतात. तुम्हाला खूप अशक्तपणा आलाय. हे डॉ. नाडकर्णी. तुम्हाला सात दिवस कंप्लीट बेडरेस्ट घ्यायला हवी, असं त्यांचं म्हणणं आहे. सो रिलॅक्स,’’ राऊतसाहेब म्हणाले.

‘‘पण कुलकर्णी... पेन्शन...’’ मी कण्हत बोलण्याचा प्रयत्न केला.

‘‘ऑल राइट! एव्हरीथिंग इज ऑल राइट. तुम्ही निर्दोष आहात, हे आता पटलंय आम्हा सगळ्यांना. सो प्लीज रिलॅक्स नाउ,’’ साहेब मला प्रेमानं थोपटत म्हणाले.

एवढं मी ऐकलं आणि पुन्हा मला गुंगी येऊन मी झोपी गेलो आणि उठलो तेव्हा मी एकदम फ्रेश होतो. माझी बायको, दोन मुलं आणि राऊतसाहेब पण हजर होते. त्यांनी आणलेलं खाणं खाल्लं, चहा घेऊन फ्रेश झालो. पनवेलला कुलकर्णीसाहेबांच्या घरी मी बेशुद्ध होऊन पडलो, इतकंच मला आठवत होतं. पुढं काय झालं, हे ऐकायला की उत्सुक होतो.

कुलकर्णीवहिनी मी पडलेला पाहून घाबरल्या. ‘‘यांना असं काय झालं अचानक?’’ त्यांनी साहेबांना विचारलं. साहेबांनी त्यांना सगळी केस तपशीलवार सांगितली आणि आम्ही तिथं येण्याचं प्रयोजनही सांगितलं. यावर कुलकर्णीवहिनींनी जे सांगितलं ते अविश्वसनीय आणि असंभव कॅटेगरीतलं होतं.

त्या साहेबांना म्हणाल्या, ''साहेब, रिटायर झाल्यावर एक-दोन महिन्यांतच संसाराच्या आणि मुलांच्या काळजीनं यांनी अंथरुण धरलं. आमचा सर्वांत मोठा मुलगा दामू त्या वेळी फक्त आठ वर्षांचा होता. दोन लहान मुली, तुटपुंजी पेन्शन, भिक्षुकी चालेना. घरचा रोजचा खर्च, मुलांची शिक्षणं - कसं भागणार एवढ्याशा पेन्शनमध्ये, हाच विचार ते सतत करायचे. मी त्यांना सतत सांगायची, 'अहो, नका एवढी चिंता करू. होईल काही तरी, करू कसं तरी.' पण त्यांची चिंता मिटेना आणि ते काही अंथरूण सोडेनात. एका रात्री यांना जास्तच झालं. त्यांनी मला जवळ बोलावलं आणि माझे कान त्यांच्या तोंडाच्या अगदी जवळ घेण्यास सांगितलं. त्यांचा आवाज फारच खोल गेला होता. म्हणाले, 'सावित्री, माझी वेळ झाली. मी काही आता वाचत नाही; पण तुझं आणि मुलांचं माझ्यानंतर कसं होणार, ही एकच चिंता माझा जीव कुरतडतेय.' केवळ तेवढ्यापायी त्यांचा जीव घुटमळत होता. 'मी तुला एक गोष्ट सांगतो. तू याबद्दल कुणाला काहीही सांगायचं नाही. तुला माझी शपथ आहे,' असं म्हणाले. पण साहेब, आज बिचाऱ्या सानेंच्यावर हा प्रसंग आलाय. मी जर आता बोलले नाही, तर साने तुरुंगात जातील आणि त्यांचा संसार उघड्यावर पडेल आणि असं झालं तर यांचा आत्मा आणि परमेश्वर मला कधीच क्षमा करणार नाही - म्हणून तुम्हाला आता ते सांगतेच.

''पण असं त्यांनी सांगितलं तरी काय?'' साहेबांनी त्यांना विचारलं.

वहिनी म्हणाल्या, ''सांगते ना...'' आणि त्या सांगू लागल्या, ''हे म्हणाले, 'दर महिन्याच्या एक ते पाच तारखेदरम्यान जेव्हा तू देवापुढं सांजवात लावायला जाशील, तेव्हा तिथं तुला एक पाकीट दिसेल. त्या पाकिटात माझी महिन्याची पेन्शन असेल. ती पेन्शन आणि येणारं घरभाडं एवढ्या पैशात तू आपला दामू मोठा होऊन नोकरीला लागेपर्यंत संसार चालवायचा. आपला दामू मोठा होऊन नोकरीला लागला की माझी पेन्शन बंद होईल.' एवढं सांगितलं आणि त्यांनी प्राण सोडला.

''तेव्हापासून, गेली पंधरा वर्षं, दर महिन्याच्या एक ते पाच तारखेदरम्यान सांजवातीच्या वेळी मला देव्हाऱ्यात यांच्या पेन्शनचं पाकीट मिळायचं आणि त्याच पैशांवर गेली पंधरा वर्षं आमचं घर चाललंय. आज

पाच तारीख आहे. आज जेव्हा मी सांजवात लावली तेव्हा...''

असं वाक्य अर्धवट टाकून वहिनी आत गेल्या आणि त्यांनी एक पाकीट साहेबांच्या हातावर ठेवलं आणि म्हणाल्या, ''आज त्या ठिकाणी पेन्शनच्या ऐवजी मला हे पाकीट मिळालं. तुम्हीच ते वाचा.''

साहेबांनी पाकिटातली चिठ्ठी काढून वाचली. त्या चिठ्ठीत फक्त एकच ओळ लिहिली होती. ती ओळ वाचून साहेब दिङ्मूढच झाले. ती ओळ अशी होती की...

''आपला दामू गेल्या महिन्यापासून नोकरीला लागलाय. आज त्याचा पहिला पगार होईल. तेव्हा आजपासून माझी पेन्शन बंद.'' खाली नाना कुलकर्णींची ओरिजिनल सही होती.

**(अथश्री, दिवाळी २०१०)**

('डॉ. अ.वा. वर्टी विनोदी कथा पारितोषिक' प्राप्त)

# मेरे सामनेवाली खिडकी में...

आनंदनगर ही शहराबाहेरची, उपनगरातली एक टापटीप आणि शांत वस्ती.

सोसायटीमधल्या समोरासमोरच्या इमारती इतक्या खेटून की बाल्कनीतून समोरच्या घराचं संपूर्ण दृश्य दिसावं. ही म्हणजे तरुण आणि त्यातल्या त्यात नवपरिणित जोडप्यांसाठी मोठीच अडचण!

पण राधाबाई काही तरुण नव्हत्या आणि 'जस्ट मॅरिड' तर मुळीच नव्हत्या. त्यांचं लग्न होऊन चांगली पंचेचाळीस वर्षं उलटली होती. एकुलता एक मुलगा संदेश, एकुलती एक सून नंदिनी आणि एकुलता एक नातू निलेश - सगळेच लांब, अमेरिकेत. तीन-चार वर्षांतून कधीतरी भेटायला यायचे; पण तेवढेच. एरवी दोन बेडरूमच्या त्या फ्लॅटमध्ये राधाबाई आणि नाना, दोघांचंच राज्य आणि फक्त दोघांचंच काम ते काय असणार? त्यामुळे बराचसा रिकामा वेळ राधाबाई बाल्कनीत बसून काढत आणि नाना मॉर्निंग वॉक करून आले, की बाल्कनीच्या मागेच असलेल्या हॉलमध्ये झुल्यावर बसून वर्तमानपत्रांचा फडशा पाडत. विरुद्ध बाजूच्या बाल्कनीतून बघितलं तर नाना हॉलमध्ये बसून बातम्या वाचत आहेत आणि राधाबाई बाल्कनीच्या कठड्यावर कोपर टेकून खालची, वरची आणि समोरची न्याहाळणी आणि टेहळणी करीत आहेत, असंच दृश्य दिसायचं.

आज मात्र समोरच्या खिडकीतून बघून राधाबाई अगदी खुशीत येऊन गुणगुणत होत्या, अंमळ मोठमोठ्यानं... 'मेरे सामनेवाली खिडकी में...'

पेपर वाचतावाचता नानांची दोन-तीन वेळा त्यांच्याकडे - अंमळ रागानंच - बघितलं. शेवटी न राहवून बोललेच, ''काय राधाक्का... आज आनंदात खुशीत येऊन गाताय.'' नाना कधी मूडमध्ये असले, की त्यांना राधाक्का, राधाकाकू, राधावहिनी असं काही पण म्हणायचे. राधाबाईंच्या पण ते अंगवळणी पडलं होतं.

''हो, आहेच मी आज खुशीत...'' असं म्हणून आणि आवाजाची पट्टी किंचित वाढवून राधाबाई पुन्हा गुणगुणू लागल्या, 'मेरे सामनेवाली खिडकी में एक चाँदसा टुकडा रहता है।''

नानांनी नकळत स्वत:च्या टकलावरून हात फिरवला आणि राधाबाईंनी बघायच्या आत झटकन काढून घेतला. मग म्हणाले, ''अरे वा! लेकिन ये खुशी आज किस खुशी में?'' टीव्हीवर बघितलेल्या हिंदी सिनेमाच्या थाटात नानांनी विचारलं.

''आहे आमची एक गंमत!'' असं म्हणून राधाबाईंनी नाक उडवलं.

''पण आम्हाला सांगा की तुमची ती गंमत,'' नानांनी नेट लावून विचारलं.

राधाबाईंनी एक छानसा मुरका मारला आणि म्हणाल्या, ''नको बाई! मला लाज वाटते.''

''अहो, लाजताय काय अशा नव्या नवरीसारख्या. सांगा तरी तुमच्या खुशीचं कारण...'' नानांनी आग्रह केला.

''नको बाई! तुम्ही रागवाल म्हणून भीती वाटते.'' राधाबाई निग्रहानं म्हणाल्या.

''अहो, आयुष्यभर तुम्हाला भिऊन वागलो मी. आता माझी कसली भीती वाटतेय तुम्हाला? सांगा.'' नाना म्हणाले. नानांच्या 'सांगा' या शब्दात इतका जोर होता, की अधिक ओढेवेढे न घेता राधाबाईंनी समोरच्या खिडकीकडे एक तिरपा कटाक्ष टाकला आणि पुन्हा एकदा एक छानसा मुरका मारून म्हणाल्या, ''मी किनै, मी किनै प्रेमात पडलेय.'' असं म्हणून पुन्हा एकदा समोरच्या खिडकीकडे तिरपा कटाक्ष टाकून त्या गुणगुणल्या : 'एक चाँदसा टुकडा रहता है...' हे ऐकलं मात्र आणि भयंकर स्फोट नानांच्या डोक्यात झाले. काही क्षण रागानं त्यांच्या ओठातून शब्दच फुटेनात. शेवटी,

हायवेवरून एकशेदहाच्या स्पीडनं चाललेल्या ट्रकच्या चाकात खिळा घुसून, जोरानं आवाज करत पंक्चर झालेल्या टायरसारखे ते एकदाचे फुटले आणि सबंध कॉलनीच्या कानात दडे बसावेत इतक्या मोठ्या आवाजात ओरडले, ''काय?.. तू...तू प्रेमात पडलीयेस? आणि या... या... वयात?''

राधाबाईंनी नानांच्या या ओरडण्याला अजिबात भीक घातली नाही. तितक्याच शांतपणे त्या म्हणाल्या, ''मग काय झालं? एवढी काही मी म्हातारी नाही. नुकतंच कुठे पासष्ट सरलंय आणि परवा मी टीव्हीवर पाहिलेल्या सिनेमात चक्क म्हटलं होतं ना, प्यार मोहोब्बत को उम्र का तकाजा नही होता।''

''हं ... उम्रका तकाजा म्हणे. राधे.. राधे... हे असलं बोलणं शोभत नाही तुला... या वयात. तू एक पत्नी आहेस, एक आई आहेस, एक आजी आहेस, हे विसरू नकोस.'' नाना धुसफुसले.

''हो, आहे ना! मी आई आहे, आजी आहे; पण माझा मुलगा आणि नातू आहेत का माझ्याजवळ? ते जाऊन बसलेत तिकडे अमेरिकेत. खरंच सांगतेय हो, हा एकटेपणा मला अगदी खायला उठतोय. सहन होत नाही.''

''का? मी नाही इथे तुझ्या सोबत?'' नाना चिडून म्हणाले. राधाबाईंना नानांच्या या चिडण्याची गंमत वाटली. त्यांना डिवचण्यासाठी त्या मुद्दामच म्हणाल्या.

''आहात ना; पण तुम्ही आता म्हातारे झालात.''

आपल्या उजव्या हाताची तर्जनी राधाबाईंच्या नाकासमोर नाचवत नाना ओरडले, ''राधे-राधे मला जास्त राग आणू नको हं...''

''इश्शऽऽ! त्यात एवढं रागवायला काय झालं? म्हातारं होत नाही कुणी?'' राधाबाई तेवढ्याच शांतपणे म्हणाल्या.

''होतात ना, लोक म्हातारे होतात; पण त्या म्हाताऱ्या लोकांच्या म्हाताऱ्या बायका प्रेमात पडून, तुझ्यासारखा दुसरा चाँद का टुकडा शोधत नाहीत या वयात.'' आणि हे बोलत असताना नानांनी नकळत संतापानं आपला हात आपल्या टकलावरून फिरवला. ''अगं, लोक काय म्हणतील याचा जरा विचार कर,'' नानांनी पुस्ती जोडली. राधाबाईंनी कावळा हाकलतात तसा उजवा हात झटकला आणि म्हणाल्या, ''म्हणू देत लोकांना

काय म्हणायचं ते,'' असं म्हणून त्या गाऊ लागल्या.

''कुछ तो लोग कहेंगे-लोगोंका काम है कहना। छोडो बेकार की बातों...''

त्या गाण्याचा गळा घोटत नाना ओरडले, ''चूप! लोकांना काही कहू दे नाहीतर ना कहू दे; पण मला मात्र हे बिलकूल खपणार नाही,'' नानांनी राष्ट्रभाषेत तारे तोडले.

''का? मत्सर वाटतोय त्याचा?'' खिडकीकडे कटाक्ष टाकत राधाबाई म्हणाल्या.

''आता मात्र हद्द झाली - सरहद्द झाली- सीमा - रमेश देव - अजिंक्य अख्खी देव फॅमिली झाली,'' नाना संतापानं करवादले.

''चिडताय कशाला इतके? तुम्हाला बघायचा आहे का माझा चाँद का टुकडा?'' राधाबाईंनी शांतपणे विचारलं.

''काही नको - तूच बघत बस तुझा चाँद का टुकडा!'' नाना फिस्कारले.

तरीपण राधाबाई नानांच्या जवळ गेल्या.

जबरदस्तीनं पण लाडिकपणे त्यांना बसल्या जागेवरून उठवलं आणि खेचतच बाल्कनीत आणलं. बाल्कनीतून समोरच्या खिडकीकडे बोट दाखवून म्हणाल्या, ''बघा, तो बघा माझा चाँद का टुकडा!''

नानांनी खिडकीतून समोर बघितलं आणि त्यांना एक हसतमुख, गोरंगोमटं व गुटगुटीत असं हातपाय झाडत, स्वत:शीच खेळत असलेलं बाळ दिसलं. चार-सहा महिन्यांच्या त्या बाळाकडे बघत 'हा तुमचा चाँद का टुकडा?' असं म्हणत नाना पुन्हा मागच्या डुलत्या खुर्चीवर जाऊन बसले आणि टकलावर हात फिरवत डुलायला लागले.

राधाबाई पण लगबगीनं आत गेल्या आणि परत येताना आणलेली दुर्बीण डोळ्यांना लावून समोरच्या खिडकीतून बघू लागल्या आणि दुर्बिणीतून बघताना त्यांना बाळ तर स्पष्ट दिसत होतंच, पण बाळाच्या बाजूला ठेवलेल्या औषधांच्या बाटल्यांवरची आणि पावडरच्या डब्यांवरची नावंसुद्धा स्पष्ट वाचता येत होती. बाळाच्या बाजूलाच भिंतीवर एक ब्लॅकबोर्ड लटकत होता. तोसुद्धा राधाबाईंना स्पष्ट वाचता येत होता.

**सूचना :**

(१) पहिलं दूध - सकाळी १०.३० वा.

(२) बेबीफूड दोन चमचे - सकाळी ११.३० वा. (दुधातून)

(३) गरम केलेलं (कोमट) पाणी - दुपारी १२.०० वा. (चार चमचे)

(४) दुसरं दूध - दुपारी १.३० वा.

(५) गुलाबी औषध (एक चमचा) - दुपारी १.४५ वा.

(६) हिरवं औषध (एक चमचा) - दुपारी २.०० वा.

(७) तिसरं दूध - दुपारी ४.०० वा.

(८) बेबी फूड दोन चमचे - दुपारी ५.०० वा.

(९) गरज पडल्यास साहेबांना किंवा बाईसाहेबांना ऑफिसमध्ये फोन करणे.

साहेब - शरद पोंक्षे - टेलि ----

बाईसाहेब - स्मिता पोंक्षे - टेलि ---

आपल्या घरचा टेलि. ----

सूचना : बंटीला रडवू नये.

राधाबाईंनी तो बोर्ड वाचला, त्या नवागतांची नावं त्यांना समजली आणि प्रॉब्लेम पण कळला. त्यांचं लक्ष सहजच आत हॉलमध्ये भिंतीवर लावलेल्या घड्याळाकडे गेलं. म्हणजे पावणेअकरा वाजले होते.

राधाबाईंनी लगबगीनं नानांना हाक मारली, ''अहो, ऐकलंत का?''

टाइम्सच्या पुरवणीत आलेला मल्लिकाचा फोटो बघण्यात नाना इतके रंगले होते, की राधाबाईंची हाक काही त्यांची तंद्री भंग करू शकली नाही.

''अहो, ऐकलंत का? मी काय म्हणते?'' राधाबाईंनी पुन्हा साद घातली.

नानांना वाटलं, पुरवणीतली रंगीत फोटोतली मल्लिकाच आपल्याला लाडिक साद घालते आहे आणि फोटोत तिनं पसरलेले बाहू जणूकाय आपल्यासाठीच आहेत... असं समजून नानांनी पुरवणी छातीशी कवटाळून मल्लिकाला आलिंगन दिलं.

आता मात्र राधाबाईंची सहनशक्ती संपली आणि 'नानाऽऽ' असं त्या जोरानं ओरडल्या. ''म...म... मी कुठे तिला... मी नाही,'' असं काहीतरी पुटपुटत नकळत त्यांनी पुरवणी छातीशी अधिकच घट्ट आवळली.

''अहोऽऽ तुमच्या छातीवरचे केस टोचतायेत त्या बिचारीला. फेका ती पुरवणी आणि आत जाऊन आपला कॉर्डलेस फोन तेवढा मला आणून द्या,'' राधाबाईंनी फर्मावलं. एरवी नानांनी हे फर्मान जुमानलं नसतं. 'मी काय तुझ्या ... चा नोकर आहे का?' असं काहीतरी खरमरीत उत्तर राधाबाईंना दिलं असतं; पण आपलं उघडं पडलेलं मल्लिकापितळ झाकण्याची ही संधी न सोडण्याइतके धूर्त ते नक्कीच होते. त्यांनी गुपचूप जाऊन कॉर्डलेस आणला आणि राधाबाईंच्या हातात कोंबला.

दुर्बिणीतून समोरच्या घरातला ब्लॅकबोर्ड न्याहाळत राधाबाईंनी कॉर्डलेसची बटणं दाबली आणि त्या समोरून फोन उचलण्याची वाट पाहू लागल्या.

''हॅलोऽऽ'' पलीकडून आवाज आला.

''नाव काय गं तुझं?'' राधाबाईंनी विचारलं.

''तुमी कोन बोलताय?'' पलीकडून आवाज आला.

''प्रश्न विचारू नकोस, नाव सांग तुझं.'' राधाबाईंनी ठणकावलं.

''माझं नाव पार्वती; पण कशाला?'' पलीकडून विचारणा.

''एकदा सांगितलं ना, प्रश्न विचारू नकोस म्हणून? फक्त उत्तर दे. वाजले किती?'' राधाबाईंनी अधिकारवाणीनं विचारलं.

''का? तुमाकडं घड्याल न्हाई?'' पलीकडून प्रश्न आला.

''पुन्हा सांगते - प्रश्न विचारू नकोस, फक्त उत्तर दे.''

''वाजले किती?'' राधाबाईंनी पुन्हा ठणकावलं.

''साडेदहा वाजलेत,'' पलीकडचं उत्तर.

''नीट घड्याळ बघ. नक्की किती वाजलेत?'' राधाबाई.

''अं-अं. पावणेअकरा.'' पलीकडून उत्तर आलं.

''बंटीला दूध दिलंस?'' राधाबाईंचा प्रश्न.

''बाळाचं नाव 'बंटी' हाय ते तुमाला कसं कळलं?'' पुन्हा पलीकडून विचारणा.

''भुतानं माझ्या कानात सांगितलं. त्याचा विचार तू करू नकोस. मला उत्तर दे - बंटीला दूध दिलंस?'' राधाबाईंनी पुन्हा प्रश्न केला.

''न्हाई अजून,'' पलीकडून उत्तर आलं.

‘‘ताबडतोब दे. दुधाची वेळ साडेदहाची आहे. माहीत आहे ना तुला?’’ राधाबाई डाफरल्या.

‘‘व्हय, पन तुमाला कसं कळलं?’’ पलीकडचा आवाज.

‘‘भुतानं सांगितलं म्हटलं ना एकदा? सांगितलं तेवढं कर,’’ असं म्हणून राधाबाईंनी फोन बंद केला.

पलीकडून वैतागून फोन आपटला गेल्याचं बघून राधाबाई हसल्या आणि पुढचं दृश्य बघू लागल्या. समोरच्या बाईनं, काही न समजल्यासारखं, हात हवेत उडवले आणि जवळच ठेवलेल्या भांड्यातलं दूध बाटलीत भरू लागली. राधाबाईंनी पुन्हा कॉर्डलेसचं बटण दाबलं. सामोरच्या बाईनं एकवार फोनकडे बघितलं आणि पुन्हा फोन उचलला.

‘‘हॅलोऽऽ’’

‘‘हॅलो काय? बंटीला थंड दूध पाजणार आहेस? दूध थोडं कोमट कर. त्यात थोडी साखर घालून चमच्यानं ढवळ आणि मग बाटलीत भरून बंटीला पाज,’’ राधाबाईंनी भराभर सूचना दिल्या.

‘‘पन तुमी कोन हाय?’’ पलीकडचा प्रश्न आला.

राधाबाईंनी काही न बोलता फोन कट केला आणि त्या पुढचं दृश्य बघू लागल्या.

समोरची बाई काही न समजून फोनकडे बघत असल्याचं पाहून राधाबाईंना गंमत वाटली. त्या बाईनं पुन्हा एकदा हात हवेत उडवले आणि दुधाचं भांडं घेऊन आत गेली. तेवढ्यात बंटी आपल्याकडे पाहून हसतोय, असा भास राधाबाईंना झाला.

बाई दोन मिनिटांत परत आली आणि भांड्यातलं दूध बाटलीत भरू लागली. राधाबाईंनी तत्काळ हातातल्या कॉर्डलेसचं रिडायल बटण दाबलं आणि फोन पलीकडून उचलला जाताच डायरेक्ट बोलल्या, ‘‘अगं दुधातून गरम वाफा येत आहेत. दूध जरा थंड कर आणि मग बंटीला पाज. गरम दुधानं नरडं भाजेल ना बंटीचं,’’ असं म्हणून राधाबाईंनी फोन कट केला.

समोरच्या बाईनं इकडेतिकडे आणि फोनकडे बघून पुन्हा हात हवेत उडवले आणि राधाबाईंच्या सूचना तंतोतंत अमलात आणल्या. हे पाहिलं मात्र, राधाबाईंना हसू आवरेना.

हसता हसता राधाबाईंनी आत बसलेल्या नानांना हाक मारली, ‘‘अहो, ऐकलंत का? जरा बाहेर बाल्कनीत या बरं.’’

‘‘काय झालं?’’ नाना आतून ओरडले.

‘‘त्या मल्लिकाला सोडून आधी बाहेर या, मग सांगते.’’

राधाबाईंचा हा मल्लिकाबाण मात्र बरोबर लागू पडला आणि ‘‘काय म्हणताय,’’ असं विचारत नाना बाल्कनीत आले.

‘‘मी म्हणतेय, की स्वयंपाक तयार आहे. तुम्ही जेवून घ्या आणि मग बाल्कनीत येऊन माझ्या जागी बसा,’’ असे आदेश नानांना दिले. पडत्या फळाची आज्ञा घेऊन नाना जेवायला गेले.

अचानक राधाबाईंचं लक्ष समोरच्या खिडकीकडे गेलं आणि झटक्यात त्यांनी कॉर्डलेसचं रिडायल बटण दाबलं. समोरून फोन उचलला जाताच आस्थेनं चौकशी केल्याप्रमाणे त्या बोलल्या, ‘‘पार्वतीबाई, तुम्ही जेवलात ना?’’

‘‘व्हय, जेवले की...’’ पार्वतीनं उत्तर दिलं.

‘‘पोटभरून जेवलीस ना?’’ पुन्हा राधाबाईंनी आस्थापूर्वक विचारलं.

‘‘व्हय की. पॉट भरून जेवले,’’ पार्वती म्हणाली.

आता मात्र राधाबाईंच्या सुरात जरब आणि चीड होती.

‘‘अगं भवाने, मग बंटीच्या दुधाची बाटली कशाला तोंडाला लावलीस?’’ त्या पार्वतीवर खेकसल्या.

‘‘नाही... मी... म्हंजे मला...’’ पार्वती चाचरली. पार्वतीला असं चाचरताना पाहून राधाबाईंना फारच गंमत वाटली.

‘‘मांजरी मेली! लाज नाही वाटत बाळाचं दूध प्यायला? याद राख पुन्हा असं केलंस तर! माझ्याशी गाठ आहे. सांगून ठेवते,’’ असा सज्जड दम राधाबाईंनी पार्वतीला भरला. हे ऐकून फोन ठेवताना पार्वतीची उडालेली भंबेरी पाहून राधाबाई खदाखदा हसू लागल्या. पोटभर जेवून ढेकर देत येता येता, त्यांना एकाकी हसताना पाहून नानांनी विचारलं, ‘‘काय हो, वेडबीड लागलं की काय?’’

हसू आवरत राधाबाई म्हणाल्या, ‘‘वेड मला नाही; पण तिला नक्कीच लागणार आहे.’’

‘‘तिला? तिला कुणाला?’’ काही न कळून नानांनी विचारलं. राधाबाईंनी समोर बाळाजवळच्या बाईकडे अंगुलीनिर्देश केला आणि म्हणाल्या, ‘‘तीऽऽ त्या बाळाजवळ बसलेली बाई आहे ना... तिला.’’ जबरदस्तीनं नानांच्या हाताला धरून त्यांना आपल्या खुर्चीत कोंबत राधाबाईंनी फर्मान सोडलं, ‘‘इथे बसा आणि मी जेवण करून परत येईपर्यंत त्या समोरच्या बाळावर आणि बाईवर नीट लक्ष ठेवा. आणि मुख्य लक्ष बाळावर ठेवायचं, बाईवर नाही, हे नीट ध्यानात ठेवा,’’ असं म्हणून त्यांनी दुर्बीण नानांच्या हातात घुसवली आणि स्वत: भोजनार्थ अंतर्धान पावल्या.

घाईघाईनं जेवण उरकून राधाबाई पुन्हा बाल्कनीत आल्या. नानांच्या हातातली दुर्बीण खसकन ओढून घेऊन त्यांनी आपल्या डोळ्यांना लावली आणि समोर एक दृष्टिक्षेप टाकून आग लागल्यासारख्या ओरडल्या, ‘‘अहो, तो फोन द्या... आधी माझ्याकडे तो फोन द्या!’’

काही न कळून नानांनी फोन त्यांच्या हातात दिला आणि विचारलं, ‘‘काय झालं तरी काय असं ओरडायला?’’

‘‘काय झालं म्हणून काय विचारता? अहो शू करून बाळाचा लंगोट ओला झालाय आणि ती भवानी ढाराढूर झोपलीये. तुम्हाला सांगितलं होतं ना लक्ष ठेवायला!’’

असं म्हणत राधाबाई फोनचं रिडायल बटण दाबत होत्या. रिंग वाजत होती, पण समोरून फोन उचलला जात नव्हता. शंका येऊन त्यांनी नानांना विचारलं, ‘‘तुम्ही एवढ्यात कुणाला फोन केला नव्हता ना?’’

‘‘होय, महाबोलेंना फोन केला होता; पण कुणी उचललाच नाही,’’ नाना म्हणाले.

‘‘जळ्ळं तुमचं लक्षण ते!’’ असं पुटपुटत राधाबाईंनी पुन्हा बोर्डवर बघून पोंक्ष्यांचा नंबर डायल केला. समोरच्या बाईनं फोन उचलून कानाला लावताच त्या खेकसल्या, ‘‘काय गं, तुला झोपा काढायला कामावर ठेवलंय का? बाळाचा लंगोट ओला झालाय. तो आधी बदल, नाहीतर बंटीला सर्दी होईल ना.’’

फोनच्या आवाजानं अर्धवट झोपेतून जागी झालेल्या पार्वतीनं वैतागून विचारलं, ‘‘पन तुमी कुठून बोलताय आणि हाय तरी कोन?’’

‘‘मी तुझी सासू बोलतेय,’’ राधाबाई चिडून बोलल्या.

‘‘पन माझी सासू तर कवाच वर गेलीय,’’ पार्वती बावळटपणानं बोलली.

‘‘मग वरूनच बोलतेय, असं समज. आता बोलण्यात वेळ न दवडता बंटीचा लंगोट आधी बदल,’’ असं म्हणून राधाबाईंनी फोन कट केला आणि आदेशाचं पालन होतंय की नाही, ते पाहू लागल्या. राधाबाईंचं हे नाटक बघून नाना मात्र चांगलेच बावचळले.

राधाबाईंनी चालवलेल्या या नाटकाला शरद पोंक्षेंच्या घरात मात्र वेगळंच वळण लागलं होतं.

स्मिता संध्याकाळी ऑफिसमधून घरी आल्यावर पार्वतीनं तिला अगदी निक्षून सांगितलं, ‘‘बाई, मला ही तुमची नोकरी करायला जमायचं नाय. उद्यापास्नं तुमी बाळाला सांभाळायला दुसरी बाई ठिवा.’’

हे ऐकलं मात्र, स्मिता एकदम चाटच पडली. मोठ्या कष्टानं ही बाई तिनं कशीबशी मिळवली होती. आता ही जर काम सोडून गेली, तर उद्यापासून बाळाला कोण सांभाळणार? तिच्या पोटात गोळाच आला.

‘‘अगं, पण असं झालं तरी काय?’’ स्मितानं अगतिक होऊन विचारलं. हे ऐकलं मात्र, पार्वती एकदम फिस्कारली, ‘‘वर मलाच इचारताय व्हय, झालं  तरी काय म्हणून? एवढा भरवसा नव्हता माझ्यावर तर दुसरी बाई ठिवायची व्हती कामाला.’’

‘‘अगं, पण तुझ्यावर भरवसा आहे म्हणूनच अख्खं घर तुझ्या विश्वासावर टाकून गेलो होतो ना आम्ही?’’ अधिकच अगतिक होऊन स्मिता म्हणाली.

‘‘व्हय, घर गेलात सोडून माझ्यावर, पन माझ्या मागं शिआयडी लावून दिला,’’ पार्वती पुन्हा फिस्कारली.

‘‘सीआयडी?’’ स्मितानं आश्चर्यानं विचारलं.

‘‘व्हय... शीआयडी. ह्या बोर्डावर लिवल्यापरमानं अगदी टाईमशीर फोन येतोय बगा. बंटीची दुधाची येळ झाली - त्याला दूध दे. त्याचा लंगोट वला झालाय, त्यो बदल. बंटीला औषध दे. अशा सतराशे ऑर्डरी येत्यात फोनवरनं,’’ पार्वती तणतणली.

‘‘अगं, पण आम्ही कुणालाच सांगितलं नाही, तुझ्यावर वॉच ठेवायला,’’ स्मितान स्पष्ट केलं.

‘‘अगं बया... मंग त्यो भुताटकीचा परकार हाय का काय म्हनावं? न्हाय बाई, मी काही असल्या भुताटकीच्या घरात काम करनार न्हाय,’’ असं म्हणून पार्वती तणतणत निघून गेली.

हा प्रकार ऐकला आणि स्मिता चांगलीच विचारात पडली. ‘बापरे! म्हणजे कुणाचं तरी बारीक लक्ष आहे आपल्या घरावर; पण कुणाचं? तिनं स्वत:लाच प्रश्न विचारला. रात्री शरद घरी आल्यावर तिनं सगळी हकिगत त्याला सांगितली आणि टीव्ही सीरियलमधल्या बायकांसारखी त्याच्या छातीवर डोकं ठेवून रडायला लागली.

‘‘अगं, पण इतकं सीरियस होण्यासारखं काय आहे त्यात? आपल्या बंटीला काही नुकसान तर पोचवलं नाही ना तिनं?’’ शरद समजूतदारपणे म्हणाला.

‘‘अजून नाही, पण शरद, त्या बाईच्या सांगण्यावरून मला तर वाटतं, की फोनवाली बंटीची अगदी बारीकसारीक हालचाल प्रत्यक्ष बघत असावी; पण कुठून? आणि कशी? शरद, खरं सांगते, मला तर फार काळजी वाटायला लागलीय आणि भीती पण वाटतेय. संधी मिळताच तिनं बंटीला काही केलं तर?’’ असं म्हणून स्मिता परत टीव्हीतल्या बायकांसारखी...

‘‘हे बघ, तसं काही होणार नाही. ही गोष्ट मी, माझा पोलीस इन्स्पेक्टर मित्र अविनाश आहे ना, त्याला सांगतो. पोरं पळवणारी टोळी पकडण्याच्या कामात तो एकदम तरबेज आहे,’’ असं म्हणून अविनाशनं तिला शांत केलं आणि पोलीस ठाण्याला जाण्यासाठी तो बाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी सकाळचं चहापाणी आणि दुपारचं स्वयंपाकपाणी उरकून राधाबाई दुर्बीण आणि फोन घेऊन बाल्कनीत स्थानापन्न झाल्या. समोर खिडकीतून बघतात तो कालच्या बाईऐवजी दुसराच कुणीतरी बाप्या! राधाबाईंनी समोरच्या बोर्डावर बघून नंबर डायल केला. फोन त्या बाप्यानंच उचलला.

‘‘हॅलूऽऽऽ’’

‘‘हॅलूऽऽऽ काय? अरे, बाळाला सांभाळणारी ती पार्वती कुठे

तडफडली?'' राधाबाई त्याच्यावर डाफरल्या.

''ती गेली नोकरी सोडून,'' बाप्या बेफिकिरीनं म्हणाला.

''नोकरी सोडून गेली? मग बाळाला कोण सांभाळणार? त्याचं दूध, पाणी, औषध कोण बघणार?'' राधाबाईंनी त्याच्यावर सरबत्ती केली.

''मी हाय ना. तेच्यासाठीच मला नोकरीवर ठेवलाय न्हवं?'' बाप्यानं खुलासा केला.

''जळ्ळं तुझं लक्षण ते! तू काय मेल्या बाळाला सांभाळणार? तुझ्या त्या तानाजीसारख्या जाडजूड मिश्या बघून घाबरून जाईल बाळ,'' राधाबाईंनी शेरा मारला.

''पन तुमी कोन बोलताय?'' बाप्याचा प्रश्न.

''तुझी सासू बोलतेय मी. थांब. मी आलेच तिकडे,'' असं म्हणून राधाबाई तरातरा जिना उतरून समोरच्या घरात प्रविष्ट झाल्या, आणि थेट बाळाजवळ जाऊन त्याचा ओला झालेला लंगोट सोडू लागल्या.

''कोण? राधाकाकू तुम्ही?'' तो बाप्या आश्चर्यानं किंचाळला.

''हे बघ, माझी चौकशी मग कर. आधी बाळाला बदलायला लंगोट दे.'' आणि अचानक त्यांच्या लक्षात येऊन, त्या बाप्याला म्हणाल्या, ''पण तू मला अगदी नावानिशी कसा ओळखतोस?''

''म्हणजे काय? तुम्ही मला नाही ओळखलंत?'' बाप्यानं उलट प्रश्न केला.

''छे! तुझ्यासारख्या जाडजूड मिश्या असलेली माणसं मला अजिबात आवडत नाहीत,'' राधाबाई नाक उडवून म्हणाल्या.

तेव्हा कुठे आपला वेषांतराचा प्रकार अविनाशच्या लक्षात आला आणि हसत हसत त्यानं आपली मिशी ओरबाडून काढली.

''अहो काकू, मी अविनाश. तुमच्या नंदूचा मित्र. ओळखलंत?'' राधाबाईंनी आश्चर्यानं अविनाशकडे बघितलं आणि चीत्कारल्या, ''अव्या तू? आणि पोलिसातली नोकरी सोडून इथे काय करतोयस तू? आणि हे वेषांतर कशासाठी?''

आणि मग अविनाशनं इथे राहणारा शरद पोंक्षे हा आपला मित्र आहे, तो काल पोलीस ठाण्यात येऊन भेटला, वगैरे सगळी तपशीलवार हकिगत

राधाबाईंना सांगितली आणि राधाबाईंनी पण बाल्कनीत बसून केलेली करामत अविनाशला सांगितली.

''अच्छा! म्हणजे ती फोन करून पार्वतीला सूचना देणारी सीआयडीबाई तुम्ही होतात तर!'' असं अविनाशनं म्हणताच दोघं खळखळून हसले आणि ते असे हसत असतानाच बाजूच्या खोलीत लपून हे नाटक बघत असलेली स्मिता आणि शरद ही जोडी पण बाहेर येऊन त्यांच्या हसण्यात सामील झाली.

हसता हसता स्मिता म्हणाली, ''पण काकू, तुमच्या फोनला घाबरून आमची पार्वती मात्र नोकरी सोडून पळून गेली. आता बंटीला कोण सांभाळणार?''

''अगं, काही काळजी करू नकोस. नातवंडांना खेळवण्याची माझी हौस अजून शिल्लक आहेच. पार्वती गेली तर जाऊ दे. आजपासून ही राधाआजी सांभाळेल या बंटीला.'' बोलता बोलता राधाबाईंनी बंटीकडे नजर वळवली आणि म्हणाल्या, ''बघ बघ, हसतोय बघ कसा लब्बाड!'' असं म्हणून त्यांनी बंटीला छातीशी धरलं.

बाळाला आजी मिळाल्याचा आनंद शरद आणि स्मिताच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता आणि तो बघून अविनाशनं राधाबाईंना एक कडक पोलिसी सॅल्यूट ठोकला.

**(अथश्री, जुलै-सप्टें. २०१२)**

# नाक दाबलं की...

टाळ्यांच्या कडकडाटात माधवरावांनी शाल आणि श्रीफल सत्कार स्वीकारला आणि त्याचबरोबर आप्पासाहेब गोगटेंकडून पाच लाखांचा चेक स्वीकारताना त्यांना भरून आलं. कारण 'गोगटे ॲन्ड सन्स' कंपनीत आयुष्यभर नोकरी करून पै पै करून त्यांनी साठविलेल्या फंड आणि ग्रॅच्युइटीचा तो चेक होता. 'एक सालस, प्रामाणिक आणि सचोटीचा कर्मचारी' असं त्यांचं कौतुक करून गोगटे साहेबांनी सन्मानपूर्वक त्यांना तो चेक प्रदान केला होता. कंपनीची चाळीस वर्षे नेकीने सेवा करून माधवराव आज सेवानिवृत्त झाले होते. नोकरीतून पायउतार होऊन कंपनीच्या पायऱ्या उतरताना त्यांचे पाय जड झाले होते; पण त्याचबरोबर कंपनीचा एक पेन्शनर म्हणून कंपनीशी त्यांचं नातं अतूट राहणार होतं, हा दिलासा त्यांना सुखावत होता.

या कंपनीत येण्यापूर्वी ते गोगटे उद्योग समूहाच्या मुंबई कार्यालयात नोकरी करीत होते. पण पाच वर्षांनी नागपूर येथे कंपनीची शाखा सुरू झाली आणि एक अनुभवी, हुशार कर्मचारी म्हणून माधवरावांची या नवीन कार्यालयात बदली झाली होती. आणि गेली तब्बल पस्तीस वर्षे या कार्यालयात कार्यक्षमतेनं आणि सचोटीनं सेवा करून माधवराव आज मानानं सेवानिवृत्त झाले होते.

खरं तर या निरोप समारंभातच त्यांना पेन्शनचा पहिला चेक देण्याचं आप्पासाहेब गोगटेंच्या मनात होतं; पण मुंबई कार्यालयातून माधवरावांच्या सुरुवातीच्या पाच वर्षांची कागदपत्रं न आल्यामुळे त्यांची पेन्शन थोडी

रखडणार होती. पण ते काम दोनतीन महिन्यात होईल, असं आश्वासन आप्पासाहेब गोगट्यांनी त्यांना दिलं होतं.

आप्पासाहेब गोगट्यांच्या सांगण्यावरून खास कंपनीच्या गाडीनं माधवरावांना घरी सोडलं. माधवराव घरात आले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंनी हसून त्यांचं स्वागत केलं.

हुश्य करून माधवराव कोचावर बसले. सावित्रीबाईंनी आत जाऊन तत्परतेनं पाण्याचा तांब्या भरून आणला आणि स्वत: पाणी फुलपात्रात भरून पुढे केलं. माधवरावांनी गटगटा पाणी पिऊन तृप्ततेचा ढेकर दिला.

''कसाकाय झाला निरोप समारंभ?'' सावित्रीबाईंनी उत्सुकतेनं विचारलं.

''छान झालं! भाषणात गोगटेसाहेबांनी माझी खूपच स्तुती केली. श्रीफल आणि ग्रॅच्युइटीचा चेक देऊन माझा सत्कार केला,'' असं सांगून माधवरावांनी सत्काराची शाल सावित्रीबाईंच्या खांद्यावर घालून चेक त्यांच्या हातावर ठेवला.

''इश्श्य... हे काय भलतंच'' असं म्हणून सावित्रीबाई लाजल्या.

''अहो भलतंच नाही. खरं तर हा सत्कार तुमचा आहे. तुमच्या वतीनं मी तो स्वीकारला इतकंच,'' असं म्हणून माधवरावांनी सावित्रीबाईंना जवळ घेण्याच्या उद्देशानं हात पुढे केले पण 'बाबा, आम्ही आहोत बरं का इथं', असा गिल्ला करत त्यांची तीन मुलं हसत पुढं आली आणि सावित्रीबाईंनी मिस्किलपणे माधवरावांकडे बघत तोंडाला पदर लावला.

माधवरावांची ही तीन गुणी मुलं-मोठा विवेक कॉम्प्युटर सायन्स घेऊन ग्रॅज्युएट झालेला, मधली विनिता नुकतीच बी.कॉम. झालेली तर धाकटा विजय यंदा बारावीला होता.

माधवरावांना सेवानिवृत्त झाल्याची तशी मुळीच चिंता किंवा खंत नव्हती. कारण मोठा विवेक आता त्यांच्या हाताशी आला होता. त्याच्या मदतीनं ते विजयचं पुढचं शिक्षण पूर्ण करू शकणार होते आणि विनिताचे लग्नसुद्धा ते थाटात करणार होते. शिवाय त्यांची पेन्शन आणि फंड त्यांच्यासाठी होतेच. अशा अगदी सुखमय वातावरणात निवृत्त झाल्यामुळे ते स्वत:ला भाग्यवान समजत होते.

त्यांनी अगदी प्रेमानं मुलांना जवळ घेतलं आणि येताना खास

त्यांच्यासाठी आणलेली अंजीरबर्फी त्यांच्या हातावर ठेवली. बर्फी खाता खाता विवेकचं लक्ष आईच्या हातात असलेल्या चेककडे गेलं. त्यानं आईच्या हातातला तो चेक जवळजवळ हिसकावूनच घेतला आणि वाचून 'वॉव? फाइव्ह लॅक्स', असं तो किंचाळला. त्याच्या चेहऱ्यावरचा तो आश्चर्यमिश्रित आनंद पाहून माधवराव आणि सावित्रीबाईंना कृतार्थ वाटलं.

''बाबा, यातले तीन लाख तुम्ही मला द्यायचे,'' विवेक अधिकारवाणीनं म्हणाला.

''तुला कशाला इतके पैसे?'' माधवरावांनी हसत विचारलं.

''मला कॉम्प्युटरमधल्या पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला जायचंय,'' विवेक लाडिक हट्टाने म्हणाला.

''अरे, पण विनिता आता लग्नाला आलीय. विजयचं शिक्षण व्हायचंय - त्यासाठी नकोत का पैसे?'' सावित्रीबाई मध्येच म्हणाल्या.

''हो आणि तुला अमेरिकेला कशाला जायला हवं? इथं खूप चांगल्या संधी आहेत आता या फिल्डमध्ये,'' माधवराव समजावणीच्या सुरात म्हणाले.

''अहो, पण मी अमेरिकेतला कोर्स करून आलो तर खूप पैसे कमावता येतील. मग मी तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण करीन. माझी स्वत:ची कंपनी असेल. विजय त्या कंपनीत माझा पार्टनर असेल. मग विनिताचं लग्न पण आपण शाही पद्धतीने लावून देऊ. तिच्यासाठी बंगला-गाडीवाल्यांचं स्थळ बघू,'' विवेक उत्साहाने सांगत होता.

''अरे, पण हे सगळं मिळण्यासाठी तू जर आम्हाला सोडून दूर जाणार असशील तर हे काही नकोच आम्हाला,'' माधवराव म्हणाले.

''हो बाई, तुम्ही सगळे आम्हाला या म्हातारपणी आता जवळ हवे आहात,'' सावित्रीबाई भावनावश होऊन म्हणाल्या.

''अगं आई फक्त दोन वर्ष! हां हां म्हणता दोन वर्ष निघून जातील. मग आहोतच की आपण एकत्र,'' पुन्हा विवेक आश्वासक सुरात म्हणाला.

''अरे पण, हे पैसे मला...

पण त्यांना मधेच तोडून विवेक म्हणाला, ''कबूल आहे पैसे तुमचेच आहेत. पण आता लगेच कशाला हवेत तुम्हाला? तात्पुरते मला द्या. मग दामदुप्पट परत करीन मी.''

‘‘पण मला काही हे पटत नाही,’’ माधवरावांनी आपली नाराजी व्यक्त केली.

‘‘कळलं! इतरांचे आई-बाप कर्ज काढून आपल्या मुलांना शिकवतात. पण तुम्हाला मात्र स्वतःच्या पैशांचा मोह सोडवत नाही. स्वतःच्या मुलावर विश्वास नाही. इथं मुलांनी एखादी भिकारडी नोकरी करून तुमच्या संसाराला हातभार लावावा, हीच तुमची अपेक्षा. तुम्ही स्वार्थी आई-बाप आहात,’’ असं रागानं बोलून ताड् ताड् करून विवेक संतापानं निघून गेला.

माधवराव आणि सावित्रीबाई अवाक् होऊन स्तब्ध झाले. काय बोलावं हे न समजल्यानं विनिता आणि विजय नि:शब्द होऊन त्यांच्याकडे पाहातच राहिले, सुन्नपणे निघून गेले.

थोड्या वेळानं माधवराव आणि सावित्रीबाई भानावर आले.

सावित्रीबाईंनी पदरानं आपले डोळे पुसले आणि म्हणाल्या, ‘‘मी काय म्हणते... होऊद्या त्याच्या मनासारखं. दोन वर्षांचा तर प्रश्न आहे.’’

✧ ✧

आणि विवेक अमेरिकेला गेला. दोन वर्षे होऊन गेली. मधल्या काळात बरंच पाणी पुलाखालून गेलं. सुरुवातीला विवेकचे नियमितपणे फोन यायचे. हळूहळू फोन बंद झाले, आणि मग फोन येणंच बंद झालं. विवेक तिथेच एका फार मोठ्या कंपनीत अधिकारी झाला. तिथल्याच एका मुलीबरोबर लग्न करून त्यानं तिथेच आपला संसार थाटला. माधवरावांनी त्यांच्या परतीची आशाच सोडली. माधवरावांची पेन्शनसुद्धा अजून सुरू झाली नव्हती, कारण मुंबई कार्यालयाची त्यांच्या पेन्शनची कागदपत्रच गहाळ झाल्याचं त्यांना सांगण्यात आलं. जवळ असलेल्या पुंजीवर आणि इकडेतिकडे किडूकमिडूक काम करून माधवराव कसाबसा आपल्या संसाराचा गाडा ढकलत होते. विनिता कुठेतरी नोकरी करून वडिलांना हातभार लावायला बघत होती; पण दुर्दैवाने तिला नोकरी मिळत नव्हती. विजयचं शिक्षण अर्धवट राहिलेलं. विवेककडून काही मदत तर सोडाच; पण साधी विचारपूस सुद्धा होत नव्हती.

माधवरावांचे पेन्शनसाठी ऑफिसचे खेटे संपत नव्हते. बुडत्याला काडीचा आधार म्हणून ते एका मारवाड्यात पेढीवर तुटपुंज्या पगारावर हिशेब लिहायचं

काम करीत होते.

एक दिवस असेच भर दुपारी ते रस्त्यातून चालले असताना घेरी येऊन रस्त्यातच आडवे झाले. नशीब थोर म्हणून उजव्या बाजूनं येणाऱ्या बस ड्रायव्हरनं करकचून ब्रेक लावला आणि ते मृत्यूच्या दाढेतून वाचले. लोकांनी उचलून त्यांना फूटपाथवर आणलं. एकानं बाजूच्या हॉटेलातून पाणी आणून त्यांच्या तोंडावर शिंपडले. शुद्धीवर आले तशी हळूहळू गर्दी पांगली. साधारणपणे त्यांच्याच वयाच्या एका गृहस्थानं त्यांना खांद्याला धरून जवळच्या हॉटेलात नेलं. गरम गरम चहा मागवून त्यांना पाजला. आणि माधवरावांना थोडी हुशारी आली. 'एकाएकी अशी घेरी कशी आली?' त्या गृहस्थानं आस्थेनं विचारलं.

'दोन दिवसांपासून पोटात अन्नाचा कण नाही,' असं खोल आवाजात माधवराव म्हणाले. त्या गृहस्थानं प्रथम त्यांना हॉटेलात खाऊ घातलं. पुन्हा चहा पाजला आणि माधवरावांकडे अधिक चौकशी केली, तेव्हा त्यांना माधवरावांची सर्व कर्मकहाणी समजली, त्यांची अगतिकता लक्षात आली. ते म्हणाले, 'माझ्या ओळखीचे एक महाराज आहेत. ते संतमार्गी आणि परोपकारी आहेत. तुमची इच्छा आणि विश्वास असेल तर आपण त्यांना भेटू. ते तुमच्या समस्येवर काही इलाज सांगतील.'

'पण अंगारे-धुपारे, जादूटोणा, करणी असल्या गोष्टी ते करत नाहीत. मुख्य म्हणजे ते कुणाकडून एक पैसाही घेत नाहीत. चला, तुम्ही माझ्याबरोबर!' असं म्हणून गृहस्थ उठले.

'माफ करा, पण हॉटेलाचं बिल द्यायला...' माधवराव असं म्हणताच 'त्याची तुम्ही काळजी करू नका,' असं म्हणून त्यांनी बिल दिलं आणि दोघं बाहेर पडले.

✧ ✧

माधवराव आणि ते गृहस्थ दोघही एका जुन्या चाळीचा जिना चढत होते.

''माफ करा; पण मी तुमचं नावसुद्धा विचारलं नाही,'' जिना चढताना माधवराव म्हणाले.

‘‘श्रीधर जोशी माझं नाव; पण ते महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं आहे ते तुमच्या समस्येवर इलाज सापडणं,’’ असं बोलत दोघं एका बंद दारासमोर आले. जोशींनी कडी वाजवली. एका धीरगंभीर पण प्रसन्न चेहेऱ्याच्या माणसानं दार उघडलं. ‘या जोशीबुवा’ असं म्हणून हसत त्यांनी स्वागत केलं. दोघंही आत गेले.

आत मोठ्या जाड सतरंज्या टाकल्या असतील, त्यावर महाराजांचे भक्तगण बसले असतील, समोर मोठा देव्हारा असेल, देव्हाऱ्यात पुष्पमाला मांडीत, स्वामींची तसबीर असेल; समोर दोन मोठ्या समया तेवत असतील; देव्हाऱ्यासमोर, धूप-उदबत्त्यांचा धूर पसरला असेल; फळाफुलांचा, पेढ्यांचा खच पडला असेल. अशी माधवरावांची कल्पना होती. पण प्रत्यक्षात तसं काहीही नव्हतं. आत दोन साध्या फोल्डिंगच्या खुर्च्या होत्या. समोर एक सेटी होती. भिंतीवर ज्ञानेश्वर, विवेकानंद, रामदास यांचे फोटो होते. कोपऱ्यात एक छोटा टीव्ही होता.

दोघं आत जाऊन खुर्चीवर बसले. महाराज सेटीवर बसले. ‘बोला जोशीबुवा, कसं येणं केलंत आज?’ महाराजांनी विचारलं.

‘सांगतो, आधी तुमची ओळख करून देतो. हे माधवराव करमरकर आणि माधवराव हे नाना शिरगोपीकर. आम्ही यांना नाना महाराज असं म्हणतो,’ जोशींनी ओळख करून दिली. माधवरावांनी नम्रपणे त्यांना नमस्कार केला.

मग जोशींनी नानामहाराजांना माधवरावांची सगळी कर्मकहाणी सांगितली. मुख्य म्हणजे त्यांची पेन्शन रखडल्यामुळे कशी दुरावस्था झाली आहे, ते सांगितलं.

नानामहाराजांनी सर्व नीट ऐकून घेतलं आणि नमस्कार करून डोळे मिटून घेतले. खोलीत गंभीर शांतता पसरली. नानामहाराज ध्यानस्थ झाले होते. सुमारे अर्ध्या तासानं त्यांनी डोळे उघडले, तेव्हा माधवरावांना त्यांच्या डोळ्यात एक वेगळंच तेज दिसलं. क्षणभर थांबून नानामहाराज बोलायला लागले.

‘‘मी काही काळ गुरूमाऊलीच्या चरणी लीन झालो होतो. आणि या ध्यानावस्थेत एकच नाव सारखं माझ्यासमोर येत होतं आणि ते नाव म्हणजे

गजानन गोगटे. हे नाव तुम्हाला परिचित आहे का?'' त्यांनी माधवरावांना विचारलं.

पण माधवरावांना काही केल्या आठवेना. नाना महाराज म्हणाले, ''बघा, स्मरणशक्तीला ताण द्या आणि आठवा. हे नाव नक्कीच तुम्हाला परिचित असले पाहिजे. नव्हे या नावाशी तुमचा घनिष्ठ संबंध असला पाहिजे. त्याशिवाय तुमच्या संदर्भात हे नाव सारखं माझ्यासमोर येणार नाही.''

माधवरावांनी आपल्या स्मरणशक्तीला पुन्हा ताण दिला. त्यांना आप्पासाहेब गोगटे आठवले, तात्यासाहेब गोगटे आठवले, बाळासाहेब गोगटे आठवले. ही सगळी नावं गोगटे समूहाच्या मालकांचीच होती. पण त्यात गजानन गोगटे कोण? कोण? कोण? आणि अचानक त्यांना आठवलं. यस्! हाच तो गजानन! अण्णासाहेब गोगट्यांचा मुलगा. गजानन गोगटे.

त्या वेळी ते मुंबई ऑफिसमध्ये काम करीत होते. एक दिवस 'गोगटे उद्योग समूहा'चे मालक अण्णासाहेब गोगटे यांनी माधवला केबिनमध्ये बोलावलं. त्या वेळी आण्णासाहेबांसमोर एक तरुण, हुषार, चुणचुणीत दिसणारा असा देखणा मुलगा बसला होता. आण्णासाहेब त्यांना म्हणाले, 'मि. करमरकर, हा गजानन - माझा मुलगा. यानं नुकतंच आपले शिक्षण पूर्ण केलं आहे. हा जरी कंपनीचा भावी मालक असला, तरी त्यानं कंपनीच्या कामकाजाची मुळापासून माहिती करून घ्यावी अशी इच्छा आहे; आणि म्हणून आजपासून मी त्याला तुमच्या हाताखाली देत आहे. तेव्हा त्याला आपल्या कामकाजाचं ट्रेनिंग द्यायला तुम्ही सुरुवात करा. पण लक्षात ठेवा, ट्रेनिंग देत असताना हा आपल्या मालकाचा मुलगा आहे, ही भावना मुळीच ध्यानात येऊ देऊ नका. आपल्या इतर स्टाफपैकीच तो एक आहे असं समजा. आजपासून तो कंपनीचा पगारी नोकर म्हणून तुमच्या हाताखाली काम करील,' असं सांगून आण्णासाहेबांनी त्याला माधवरावांच्या ताब्यात दिलं होतं. आज त्या गोष्टीला पस्तीसएक वर्षं झाली होती. यस्! हाच तो गजानन गोगटे!

''आठवलं महाराज, आमचे थोरले मालक आण्णासाहेब गोगटेंचा मुलगा गजानन गोगटे. आम्ही काही दिवस एकत्र काम केलं होतं. त्या वेळी आमची खूप घनिष्ट मैत्री झाली होती. माझ्याकडे त्यानं काम शिकायला सुरुवात केली

होती. म्हणून गमतीनं तो मला करमरकर गुरुजी म्हणायचा. तोच हा गजानन गोगटे. पण या गोष्टीला आता पस्तीत वर्षे होऊन गेलीत.''

''असू द्या, या गजानन गोगटेला जाऊन भेटा. तो तुमची सगळी कामं मार्गाला लावील. शुभम् भवतु।'' असं म्हणून नानामहाराजांनी दोघांना निरोप दिला.

श्रीधर जोशींनी माधवरावांना अगदी घरापर्यंत आणून सोडलं. माधवराव 'नको नको' म्हणत असताना काही नोटा बळेबळेच त्यांच्या खिशात कोंबल्या. मुंबईला जाण्यासाठी उपयोगी पडतील, असे म्हणून माधवराव उच्चारित असलेले आभाराचे शब्द न ऐकताच ते निघून गेले. माधवरावांनी घडलेली सर्व हकिगत सावित्रीबाईंनी सांगितली. 'अहो, पण ते गजानन गोगटे म्हणजे कंपनीच्या मोठ्या मालकांचे चिरंजीव. ते आता इतक्या वर्षांनी तुम्हाला ओळख तरी देतील का? आणि आता तर ते स्वत:च कंपनीचे मालक झाले असतील. मग तर तुम्हाला ते भेटतील की नाही ही पण मला शंकाच आहे.' हकिगत ऐकून सावित्रीबाई म्हणाल्या. ''असू दे! पण महाराजांनी सांगितलं आहे. जाऊन प्रयत्न करायला काय हरकत आहे?'' असं म्हणून माधवरावांनी मुंबईला जायची तयारी केली. सावित्रीबाईंनी हातावर दही देऊन त्यांना निरोप दिला.

''कुणाला भेटायचंय आपल्याला?'' रिसेप्शनिस्टनं माधवरावांना विचारलं.

''गजानन गोगटेंना,'' माधवरावांनी सांगितलं.

''कुणाला म्हणालात?'' रिसेप्शनिस्टनं भुवया वर ताणून पुन्हा विचारलं.

''गजानन गोगटेंना,'' माधवराव पुन्हा म्हणाले.

''म्हणजे भाऊसाहेबांना का?'' तिनं पुन्हा विचारलं.

''कोण भाऊसाहेब?'' माधवरावांनी विचारलं.

''अहो, कोण भाऊसाहेब काय? 'गोगटे ॲन्ड सन्स'चे मालक,'' रिसेप्शनिस्टनं जरा तोऱ्यातच सांगितलं.

माधवरावांनी अंमळ विचार केला आणि म्हणाले, ''हो, हो, त्यांनाच भेटायचंय.''

''काय काम आहे?'' पुन्हा विचारणा झाली.

‘‘जरा काम होतं,’’ माधवराव म्हणाले.

‘‘हे बघा, काही ऑफिशिअल काम असलं तर समोरच्या केबिनमध्ये देशपांडे साहेबांना भेटा,’’ रिसेप्शनिस्ट म्हणाली.

‘‘पण मला गजानन गोगटेंनाच, आय मीन भाऊसाहेबांनाच भेटायचंय,’’ माधवराव निग्रहानं म्हणाले.

‘‘तुम्ही आधी ॲपॉइंटमेंट घेतली आहे काय?’’ रिसेप्सनिस्टनं विचारलं.

‘‘नाही, पण...

‘‘मग ॲपॉइंटमेंटशिवाय नाही तुम्ही त्यांना भेटू शकत. ती आधी घ्या आणि मग त्यांना भेटायला या,’’ रिसेप्शनिस्ट म्हणाली.

‘‘पण तुम्ही त्यांना विचारून आणि माझं नाव सांगून तर पहा,’’ माधवरावांनी नम्रपणे पण आग्रहाने सांगितलं.

‘‘काय कटकट आहे,’’ असं म्हणून रिसेप्शनिस्टनं इंटरकॉम उचलून एक बटण दाबलं.

‘‘हॅलो, सर, कुणी माधवराव करमरकर नावाचे गृहस्थ आले आहेत. तुम्हालाच भेटायचं म्हणत आहेत... नाही... काम काय आहे, ते सांगतच नाहीत. तुमच्याशीच बोलीन असं म्हणत आहेत... ठीक आहे सर,’’ असं म्हणून तिनं रिसीव्हर ठेवला. पहिल्या माळ्यावर दोन नंबरच्या केबिनमध्ये जा, असं तिनं माधवरावांना सांगितलं.

माधवरावांनी तिचे आभार मानले आणि पहिल्या माळ्यावर, दोन नंबर केबिनच्या दारासमोर येऊन उभे राहिले. केबिनचं दार ढकलण्यापूर्वी मनोमन महाराजांचं स्मरण केलं आणि अर्धवट दार ढकलून म्हणाले, ‘‘मे आय कम इन सर?’’

भाऊसाहेबांनी समोरच्या फाईलमधून डोकं वर न काढताच विचारलं, ‘यस्! व्हॉट कॅन आय्...’ असं म्हणताना त्यांनी वर बघितलं आणि काही क्षण बघतच राहिले; आणि अचानक ‘ओह... करमरकर गुरुजी!’ असं म्हणत झटक्यात आपल्या जागेवरून उठले आणि धावत केबिनच्या दारापर्यंत येऊन त्यांनी माधवरावांना आपल्या मिठीत घेतलं. काही क्षण दोघांच्या तोंडातून शब्द फुटेना. माधवरावांच्या डोळ्यांतून मात्र घळघळा अश्रू वाहू लागले. भेटीचा पहिला आवेग ओसरल्यावर भाऊसाहेबांनी माधवरावांना

खुर्चीकडे नेऊन त्यांना बसवत म्हणाले, ''किती वर्षांनी भेटतोयस माधव,'' त्यांचेही डोळे पाणावले. मग बेल मारून त्यांनी रिसेप्शनिस्टला बोलावून घेतलं. ती आल्यावर म्हणाले, ''हे माधव करमरकर, या कंपनीत कामकाजाचे पहिले धडे मी त्यांच्याकडूनच घेतले. पस्तीस वर्षं झाली या गोष्टीला. यांच्या हाताखाली मी शिकलो म्हणून मी यांना त्या वेळी गमतीनं करमरकर गुरुजी म्हणायचो.'' यावर रिसेप्शनिस्टनं कौतुकानं माधवरावांकडे बघून त्यांना वाकून नमस्कार केला.

''आता आम्हा दोघांना मस्तपैकी कॉफी पाठवून दे आणि आजच्या माझ्या सगळ्या अपॉइंटमेंट्स् कॅन्सल कर. मी सांगेपर्यंत कोणालाही माझ्याकडे पाठवू नकोस,'' असं सांगून तिला निरोप दिला. अनवधानानं आणि अज्ञानानं माधवरावांना प्रतीक्षा करायला लावल्याबद्दल क्षमायाचना करून रिसेप्शनिस्ट निघून गेली.

''भाऊसाहेब, तुम्ही, अरे काय बोलतोयस तू माधव! अरे, गजानन म्हणायचास तू मला.''

''हो, पण आता तुम्ही मालक...''

''छे छे! भलतंच! अरे मी मालक झाले; पण इतरांसाठी. तुझ्यासाठी मी तोच गजानन आहे. शिष्य! तू मला सरळ गजानन म्हण, पूर्वीसारखा. खूप खूप आनंद झाला बघ तुला भेटून. आमचे अण्णा तुझी नेहमी आठवण काढायचे. असो! तुला कशी काय आठवण झाली या मित्राची?''

आणि माधवरावांनी आपण नागपूरच्या ऑफिसमधून रिटायर्ड झाल्यावर फंडाचे पैसे मुलाला कसे दिले, तो अमेरिकेतून परत आलाच नाही, कागदपत्रं गहाळ झाल्यामुळे अजून पेन्शन मिळाली नाही, मुलीचं लग्नं पैशाअभावी रखडले आहे; मुलांचे शिक्षण अर्धवट झाले आहे, अमेरिकेतला मुलगा विचारत नाही, ही सगळी हकिगत गजाननाला सांगितली.

त वरून ताकभात कळणाऱ्या हुषार गजाननाच्या सगळा प्रकार लक्षात आला. विवेक अमेरिकेत कुठल्या कंपनीत कामाला आहे? त्यानं विचारलं, अमेरिकेतल्या हॅरिसन कंपनीत तो मोठ्या पगारावर काम करीत असल्याचं माधवरावांनी सांगितलं.

''ओ के!'' असं म्हणून गजाननं इंटरकॉम उचलून एक बटण दाबलं

आणि फोनवर म्हणाले, ‘‘मि. देशपांडे, ताबडतोब माझ्या केबिनमध्ये या.’’ थोड्याच वेळात देशपांडे आले. भाऊसाहेब म्हणाले, ‘‘मि. देशपांडे, हे माझे परममित्र मि. माधवराव करमरकर. हे पस्तीस वर्षापूर्वी आपल्या कंपनीत काम करीत होते. आपली नागपूर शाखा सुरू झाल्यावर आण्णासाहेबांनी एक हुशार आणि कर्तबगार कर्मचारी म्हणून त्यांची बदली नागपूरला केली.

‘‘दोन वर्षांपूर्वी ते तिथून रिटायर्ड झालेत. पण पस्तीस वर्षांपूर्वी ते इथं काम करत असतानाचे त्यांचे सर्व्हिस पेपर्स गहाळ झाल्यामुळे अजून त्यांची पेन्शन सुरू झालेली नाही. सो डू दि नीडफुल ॲट वन्स, आणि एका आठवड्यात त्यांची पेन्शन सुरू झाल्याचा रिपोर्ट माझ्या टेबलावर हवा. सो गो ॲन्ड स्टार्ट वर्किंग ऑफ धिस.’’

‘यस् सर!’ असं म्हणून देशपांडे गेले.

‘‘थँक्यू! आणि तुझा वेळ घेतल्याबद्दल सॉरी,’’ असं म्हणून माधवराव जाण्यासाठी उठले. ‘‘हे बघ, तुझ्या या थँक्यू आणि सॉरीसारख्या शिव्या मी अजिबात ऐकून घेणार नाही. आणि निघालास कुठं? तुझ्या वहिनीला भेटणार नाहीस? अरे, तुमची प्रत्यक्ष भेट झाली नसली तरी मी तुझ्याबद्दल तिला इतकं सांगितलंय की तू येऊन परस्पर निघून गेलास हे जर तिला कळलं तर मला फाडून खाईल. आणि माझ्या नातवंडांना भेटशील की नाही?’’ असं म्हणून भाऊसाहेबांनी घरी मोबाईल लावला. ‘‘हे बघ वृंदा, मी त्या माधव करमरकरबद्दल बोलतोना नेहमी, तो नागपूरहून आलाय, आम्ही दोघं जेवायला घरी येतोय. हो हो! मुक्कामाला तो आपल्याकडेच राहणार आहे,’’ असं सांगून भाऊसाहेबांनी मोबाईल ऑफ केला, आणि हसत आणि कौतुकानं ते माधवरावांकडे पाहात राहिले.

आणि पुढच्याच आठवड्यात माधवरावांना त्यांची पेन्शन एक तारखेपासून सुरू झाल्याचं कंपनीचं पत्र आलं. सोबत मागील थकबाकीचा चेक पण जोडलेला होता. माधवरावांनी मनोमन, श्रीधर जोशींचे, महाराजांचे आणि गजानन गोगटेंचे आभार मानले. प्रत्यक्ष ते तसं करुच शकत नव्हते, कारण ही माणसं त्या पलीकडची होती.

अमेरिकेतल्या हॅरिसन कंपनीतला फोन जोरात खणखणला, रिसेप्शनिस्टनं तो घेतला.

‘‘हॅलो, मे आय स्पीक टू हॅरी?’’

‘‘हू इज स्पीकिंग प्लीज?’’

‘‘आय ॲम गजानन फ्रॉम इंडिया.’’

‘‘वन मिनिट प्लीज,’’ असं म्हणून तिनं हॅरीच्या इंटरकॉमचं बटण दाबलं. तिला काही नाव नीट समजत नव्हतं. आतून फोन उचलल्यावर ‘समबडी गॅजॅन फ्रॉम इंडिया वॉट्स यू’ असं म्हणून फोन ठेवून दिला.

‘‘हॅलो...’’ हॅरीनं फोन घेतला.

‘‘हू-ज इट?’’ पलीकडून विचारलं गेलं?

‘‘आय एम हॅरिसन स्पीकिंग’’

‘‘ए... हऱ्या, लेका नारायण हरी म्हण की! नारायण हरी नावाची लाज वाटते म्हणून लेका कंपनीच नाव हॅरिसन ठेवलंस ते ठीक आहे. पण, माझ्याशी बोलताना पण हॅरिसन!’’

‘‘कोण गजानन? अरे, तुझा फोन आहे असं वाटलं नव्हतं म्हणून - एनी वे, बोल काय म्हणतोस?’’

‘‘अरे, तुझ्या कंपनीत विवेक करमरकर म्हणून आपला कुणी इंडियन कामाला आहे का?’’

‘‘हो, आहे ना. व्हेरी क्लेव्हर बॉय - तर त्याचं काय?’’ आणि मग नारायण हरी व गजाननचं बोलणं बराच वेळ चाललं होतं.

✧ ✧

‘‘सर, आपण मला बोलावलंत?’’ विवेकनं अदबीनं हॅरीला विचारलं.

‘‘हं... बसा... मि. विवेक, आपली ही कंपनी एका इंडियन आणि त्यातूनही एका मराठी माणसाची आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे ना?’’

‘‘यस सर, मला ते चांगलंच ठाऊक आहे. आणि म्हणून अमेरिकेत नोकरी करू इच्छिणाऱ्या फक्त मराठी माणसांनाच आपण नोकरी देतो, हेसुद्धा आम्हाला ठाऊक आहे सर.’’

‘‘आणि अशा मुलांकडून इंडियात, महाराष्ट्रात असलेल्या त्यांच्या पालकांना, आईवडिलांना मदत व्हावी या उद्देशाने आपल्या कंपनीनं एक नियम केला आहे. तो पण तुम्हाला ठाऊक असला पाहिजे.’’

‘‘हो. ठाऊक आहे सर.’’

‘‘काय आहे तो नियम -

‘‘तो नियम असा आहे की, अशा मुलांनी आपल्याला मिळणाऱ्या पगाराच्या दहा टक्के इतकी रक्कम आपल्या आईवडिलांना पाठवावी,’’ विवेकनं सांगितलं.

पण हे टाळण्यासाठी आपल्याला आईवडीलच नाहीत, अशी खोटी माहिती तुम्ही कंपनीला दिलीत.’’

‘‘सॉरी सर, पण मी...’’

‘‘डोन्ट टॉक रबिश... अरे ज्या आईवडिलांनी तुमचं पालनपोषण करण्यासाठी, तुमची आजारपणं काढण्यासाठी, तुमची शिक्षणं पूर्ण करण्यासाठी, तुम्ही सुखी राहावं, म्हणून जन्मभर खस्ता खाल्या त्या आईवडिलांना पैसे पाठवायला लागू नयेत म्हणून चक्क तुम्ही त्यांना जिवंतपणीच मारलंत? शेम ऑन यू! तुमच्यासारखी मुलं असण्यापेक्षा नसलेली बरी!’’

‘‘सॉरी सर, पण मी थोड्या दिवसांनी...’’

‘‘काय? थोड्या दिवसांनी काय? तुम्हीच मारलेल्या आईबापांना तुम्ही पुन्हा जिवंत करणार होता की काय? अजून तुम्ही खोटं बोलत आहात. आणि खोटं बोलणारी माणसं मला अजिबात आवडत नाहीत. आजपासून मी तुम्हाला कामावरून काढून टाकलंय आणि अमेरिकेत तुम्हाला दुसरीकडे कुठेच नोकरी मिळणार नाही, याकडे मी जातीनं लक्ष देईन. नाऊ गेट आउट!’’

हे ऐकून मात्र विवेक हादरला. त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागलं. तो हॅरिसनच्या अक्षरश: पायावर पडला आणि क्षमायाचना करू लागला. ‘मला नोकरीवरून काढू नका. माझी बायको-मुलं उपाशी मरतील,’ असं सांगू लागला.

‘‘जो विचार तू स्वत:च्या बायको-मुलांबद्दल करतोयस तो विचार जन्मदात्या आईवडिलांबद्दल का केला नाहीस? नो एक्स्क्यूट, गेट आऊट!’’ हॅरिसन संतापानं त्याच्या अंगावर ओरडला.

विवेकनं पुन्हा पुन्हा विनवणी केल्यावर हॅरी म्हणाला की, ‘‘तू

आतापासून तुझ्या पगारातील दहा टक्के आईवडिलांना पाठवणार आहेस. अर्थात ती रक्कम नियमानं कंपनी डायरेक्ट तुझ्या आईवडिलांना पाठवीलच. पण इथं नोकरी लागल्यापासून तुला जो पगार मिळालाय त्याची दहा टक्के रक्कम तू ताबडतोब आईवडिलांना पाठव; तर आणि तरच तुझी नोकरी टिकेल. नाहीतर अमेरिकेत तुला स्थान नाही हे लक्षात ठेव!''

पुढच्याच महिन्यात माधवरावांना अमेरिकेतून पाच लाख रुपयांचा ड्राफ्ट आला आणि त्याचबरोबर यापुढे मी नियमितपणे पैसे पाठवीन, असं पत्रही आलं. आतापर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं याबद्दल विवेकनं त्यांची क्षमाही मागितली होती. हे सर्व झालं कसं? या मुलाला ही उपरती झाली कशी? हा प्रश्न माधवराव आणि सावित्रीबाईंना पडला.

ही गोष्ट गजानन गोगटेला सांगितलीच पाहिजे, म्हणून माधवराव खास मुंबईला गेले आणि विवेकमध्ये हा आश्चर्यकारक बदल झाल्याबद्दल गजाननकडे त्याचं तोंड भरून कौतुक केलं. तेव्हा गजानन त्यांना म्हणाला, ''माधव, अरे हल्लीच्या मुलांना सहजासहजी आपल्या कर्तव्याची जाणीव होत नाही. त्यासाठी त्यांचं नाक दाबावं, तेव्हा तोंड उघडतं. मी त्याचं नाक दाबण्याचं काम केलं इतकंच!'' आणि रहस्याचा भेद झाल्यानं माधवराव खळाळून हसले.

**(अर्थमंच, दिवाळी २००९)**

# खलनिग्रहणाय

‘‘आणि या वर्षीच्या विशेष पोलीस राष्ट्रपती पदकासाठी निवड झाली आहे मुंबई पोलीस दलातील इन्स्पेक्टर श्री. चंद्रकांत दुखंड यांची’’ - अशी उद्‌घोषणा निवेदकाने केली मात्र, संपूर्ण राष्ट्रपती भवन टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले.

सुवर्णपदक खुद्‌द राष्ट्रपतींचे हस्ते स्वीकारण्यास शिस्तबद्ध, धीम्या गतीने राष्ट्रपतींच्या दिशेने जात असताना इन्स्पेक्टर दुखंडे यांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. या संदर्भातल्या घटनांचा सगळा चित्रपट त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकू लागला.

‘‘चंदू, चार नंबर टेबल, एक किंगफिशर माईल्ड दे’’ - शेट्टीने गल्ल्यावरून ऑर्डर सोडली. फ्रीजमधून बर्फाळ वाफांतून एक थंडगार बाटली काढून, दुतर्फा टेबलांच्या रांगातून अंग चोरून वाट काढत, चंदू चार नंबरच्या टेबलाकडे, कसाबसा सरकण्याचा प्रयत्न करीत होता.

अचानक त्याचा पाय कशाला तरी अडला आणि तोल जाऊन, चंदू हातातल्या बाटलीसह धप्पदिशी जमिनीवर, अगदी तोंडावर आपटला. मस्तकात कळ जात असतानाच ‘मादर...’ अशी, त्याला आठवतही नसलेल्या आईचा उद्धार करणारी एक सणसणीत शिवी त्याच्या कानांत शिरली. ‘‘अरे अंधा हो गया क्या? आंखे फूट गयी क्या तेरी?’’ असं म्हणत, गल्ल्यावरचा माणूस त्याच्याकडे झेपावला आणि त्याने अशी एक भडकावली की कृत्रिम रीतीनं, भरदिवसा बारमध्ये केलेल्या अंधारात, त्याच्या डोळ्यासमोर ताऱ्यांचा चकचकाट झाला. ‘‘अब ये नुकसान क्या तुम्हारा

मरा हुआ बाप भरके देगा?'' आईबरोबरच शेट्टीने, त्याच्या मेलेल्या बापाचा पण उद्धार केला आणि पुन्हा एकदा त्याच्या कानाखाली खाडकन् आवाज काढून त्याच्या डोळ्यासमोर तारे जमीपें आणले.

सोडून द्यावं सगळं आणि जावं पुन्हा कोकणात मामाकडे... असा एक विचार त्याच्या मनात डोकावला. खरं तर तो अविचारच होता, कारण मामाच्या घरी तरी त्याच्या नशिबात दुसरं काय वाढून ठेवलं होतं? तिथं शेट्टीच्या जागी मामी होती इतकंच. आणि मामानं तर तलाठ्याला खाऊपिऊ घालून कोकणातल्या त्याच्या घरावर आणि दोन एकराच्या तुकड्यावर कधीच मालकी हक्क शाबीत केला होता.

म्हणजेच गावात काय आणि मुंबईत काय, तो बेघर आणि बेवारसच होता. गावकऱ्यांची खोटी सहानुभूती झेलत बसण्यापेक्षा बाळू सदावर्तेबरोबर पळून जाऊन त्याने गावाला कायमचा रामराम ठोकला होता. मुंबईत येऊन बाळूबरोबरच्या या बारमध्ये कामाला राहिला होता. याप्रमाणे त्याच्या पोटाचा आणि छपराचा प्रश्न सुटल्यामुळे त्याने गावाकडच्या सगळ्या आठवणी मातीत गाडून टाकल्या होत्या. नाही म्हणायला सड्यावरच्या सुताराची कमळी कधीतरी हळूच त्याच्या स्वप्नात यायची आणि चंदू झोपेतच खद्खदा हसायचा, एखाद्या लहान बाळासारखा.

शेट्टीचा मार आणि शिव्या खात, चंदूला बारमध्ये वर्ष झालं. आपल्या अंगच्या उपजत गुणांनी आणि हुषारीने, बघता बघता चंदू शेट्टीच्या गळ्यातला ताईत झाला. तो आधीच्या सर्वांना ओव्हरटेक करून हेडवेटर झाला होता. त्याची ग्रेड आता बाळू सदावर्तेच्या वरची होती. वर्षात चंदू खूपच धीट झाला होता. बारच्या ग्राहकांवर त्याची अशी छाप पडली होती की त्या बारला लोकं चंदूचा बार म्हणून ओळखू लागले. विशेष म्हणजे बारमध्ये काम करीत असूनही चंदू दारूच्या थेंबालाही स्पर्श करीत नसे आणि ग्राहकाची टीप साभार परत करीत असे. त्याच्या बोलण्याने आणि वागण्याने तो मालकाचा आणि ग्राहकाचा आवडता बारबॉय झाला होता.

चंदूच्या आयुष्यात तो दिवस वेगळाच उगवला होता. चिर्रऽऽऽ असा करकचून ब्रेक लावल्याचा आवाज झाला आणि एक टॅक्सी दारातच उभ्या असलेल्या चंदूच्या अगदी जवळच थांबली. बारबाहेरच्या पानावरच्या

ठेल्यावरून, गिऱ्हाईकासाठी सिगारेट घेण्यासाठी थांबलेला चंदू त्या आवाजाने मोठ्याने दचकला. टॅक्सीतून एक बोकडदाढी असलेला माणूस बाहेर आला आणि त्याच्या पाठोपाठ पांढरा स्वच्छ पायघोळ कुरता आणि पठाणी लेंगा परिधान केलेला व पान खाऊन तोंड लालभडक झालेला दुसरा माणूस बाहेर आला. डोक्यावरच्या विणलेल्या गोल टोपीवरून, तो अल्पसंख्याक जमातीचा असल्याचे लगेच कळून येत होते.

''खुर्शिद, तू टॅक्सी थोडी आगे लेकर रुकना और टॅक्सी का इंजन बंद नही करना'' - टोपीवाल्याने टॅक्सीवाल्याला फर्मावले. 'जी उस्मानभाई' असे म्हणून टॅक्सीवाला पुढे सरकला. टॅक्सी थोडी पुढे जाताच टोपीवाल्याने बोकडदाढीवाल्याला जवळ बोलावले आणि अगदी त्याच्या कानाशी लागून म्हणाला, ''अहमद, देख, बराबर इस बारके उपरका रूम। दरवाजेपर सारंग नामका बोर्ड है। हुशारीसे काम लेना। मै आऊंगा तो तीन बार दरवाजा खट्खटाऊंगा, समझा?'' ''जी उस्मानभाई'' असं म्हणून दाढीवाला बारच्या दाराच्या बाजूलाच असलेला जिना चढू लागला आणि टोपीवाला सरळ बारमध्ये घुसून काऊंटरच्या जवळच एका टेबलवर, रस्ता नीट दिसेल अशा पोझिशनमध्ये बसला. चंदू हे सर्व पाहात होता आणि ऐकतही होता.

हे सगळं पाहून आणि ऐकून चंदूच्या मनात वेगळीच घंटी वाजली. ''इस बारके बराबर उपरका रूम, दरवाजेपर सारंग नाम का बोर्ड, तीन बार दरवाजा खट्खटाऊंगा...'' ही सगळी वाक्ये पुन:पुन्हा चंदूच्या डोक्यात थैमान घालू लागली. बारच्या वर राहणारे सारंग म्हणजे चंदूचं पेटंट आणि परमनंट ग्राहक होते. पण ते तर कुणा नातेवाईकाच्या लग्नासाठी इंदोरला गेले होते आणि आठ दिवस तरी परत येणार नव्हते, असं त्यांनी परवाच चंदूला सांगितलं होतं. मग हा बोकडदाढीवाला वर गेला तो... एक भयंकर विचार चंदूच्या मनात विजेसारखा चमकून गेला आणि चपळाईने चंदू बारमध्ये शिरला. पानाच्या ठेल्यावरून आणलेली सिगारेट घाईघाईने चार नंबर टेबलवरच्या गिऱ्हाईकाला दिली आणि चपळाईने चिलर बॉक्सकडे जाऊन, एक थंडगार बाटली काळ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत टाकली व वाऱ्याच्या वेगाने तो बारच्या बाजूच्या जिन्याकडे धावला.

सारंगच्या दरवाजाकडे त्याने नजर टाकली. कुलूप उघडले होते. चंदूने

क्षणभर विचार केला आणि दरवाजा तीन वेळा खटखटवला. काही क्षण शांततेत गेले आणि आतून दरवाजा उघडला गेला. दार किलकिले करून आतला माणूस चंदूवर खेकसला, ''क्या है?'' असं म्हणून तो पुन्हा दार लावणार म्हणून झटक्यात चंदूने बिअरची बाटली पुढे केली. ''नीचेसे साबने भेजा है,'' तो म्हणाला. ''ठीक है'' असं म्हणून आतल्या माणसाने बाटली ताब्यात घेतली आणि झटकन दरवाजा लावून घेतला. क्षणभर चंदू दरवाजाकडे बघत राहिला. आपली शंका बरोबर असल्याची त्याची खात्री झाली. त्याने हळूच दाराला बाहेरून कडी घातली आणि जलदगतीने जिना उतरून बारमध्ये शिरला आणि त्याने काऊंटरवरच्या शेट्टीच्या कानात काहीतरी सांगितलं. होय होय... नाही... नाही... अशी मान हलवता हलवता शेट्टीने जवळच बसलेल्या टोपीवाल्याकडे हळूच बघून घेतले, आणि दोघांचे काहीतरी फायनल ठरले. चंदूने काऊंटरवरचा फोन पुढे ओढला आणि एक नंबर फिरवला. फोन बराच वेळ वाजत होता, पण कुणी उचलत नसल्याचे, चंदूने त्याच्याकडेच बघत असलेल्या शेट्टीला सांगितले. पलीकडून बऱ्याच वेळाने फोन उचलला गेला आणि जवळ बसलेल्या शेट्टीलाही ऐकू जाणार नाही इतक्या हळू आवाजात चंदू बोलू लागला...

ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग... पोलीस स्टेशनातल्या फोनची घंटी खणखणत होती; पण फोनकडे लक्ष द्यायला कुणाला सवड नव्हती. ''अहो सावंत, उचला की तो फोन,'' एका कोपऱ्यातून वाघमारे ओरडला.

''जाऊ द्या हो, कुणाचं तरी कुत्रं हरवलं असेल नाहीतर बायको कुणाबरोबर तरी पळून गेली असेल. बस म्हणावं बोंबलत,'' असं म्हणून सावंतनं वाघमारेला पाणी लावलं. इतक्यात इन्स्पेक्टर नाडगौडांनी रुबाबात पोलीस स्टेशनात प्रवेश केला. खणखणत्या फोनकडे कोणीच लक्ष देत नाही असं पाहून त्यांनीच फोन उचलला आणि कानाला लावला.

''हॅलोऽऽ इन्स्पेक्टर नाडगौडा स्पीकिंग... कोण? चंदू... हां बोल चंदू... असं? हं... हं... बरं... अच्छा?... काय सांगतोयस! म्हणजे प्रकरण भलतंच सीरियस आहे म्हणायचं... बरं... बरं... व्हेरी गुड... हा आलोच मी,'' असं बोलून नाडगौडांनी फोन ठेवला आणि ओरडले, ''हवालदार वाघमारे... आपलं स्क्वॉड घेऊन ताबडतोब जीपमध्ये बसा.'' अशी ऑर्डर देऊन त्यांनी

स्टेशन डायरीत काहीतरी नोंद केली आणि त्वरेने जीपमध्ये बसून ड्रायव्हरला खूण करताच जीप सुसाट निघाली.

जीप चांदनी बारच्या दारात थांबते न थांबते तोच नाडगौडा जंप मारून बारच्या दिशेने झेपावले. त्यांच्या मागोमाग इतर स्टाफने पण दणादण खाली उड्या मारल्या.

बारमध्ये काऊंटरजवळच बिअर पीत बसलेल्या त्या टोपीवाल्याच्या चाणाक्ष नजरेने ही सगळी हालचाल टिपली मात्र, विजेचा झटका बसल्याप्रमाणे तो उठून उभा राहिला आणि जीव खाऊन बाहेरच्या दिशेला धावला. दारात, नाडगौडांशी बोलत असलेल्या चंदूला, जवळजवळ धडक देऊनच तो बाहेर पडला आणि उभ्या असलेल्या टॅक्सीकडे धावला.

'तो बघा... तो बघा पळाला' अशी चंदूने ओरड केली. नाडगौडा त्याच्या मागोमाग जोरात धावलेसुद्धा. पण टॅक्सी बाजूला गल्लीत दिसेनाशी झाली होती.

वेळ न घालवता चंदू नाडगौडांच्या कानाशी लागला आणि त्यांच्यासह बारच्या बाजूलाच असलेला जिना चढू लागला. नाडगौडांनी इशारा करताच मागोमाग त्यांचा स्टाफसुद्धा जिना चढू लागला.

'सारंग' या नावाचा बोर्ड असलेल्या दारासमोर चंदू थांबला. त्याने नाडगौडांच्या कानात काहीतरी सांगितले. "ओ.के." असं म्हणून नाडगौडा चंदूच्या इशाऱ्याप्रमाणे, बाहेरची हालचाल आत समजणार नाही, अशा पद्धतीने एका बाजूला दबा धरून बसले आणि स्टाफला दुसऱ्या बाजूला तसेच बसवले. चंदू दारासमोर उभा राहिला आणि दारावर तीन थापा मारल्या. काही क्षण शांततेत गेले. चंदूने पुन्हा तीन थापा दारावर मारल्या आणि ते आतून उघडले गेले. आतल्या माणसाने दार किलकिले करून बाहेर बघितले. समोर चंदू दिसताच दाढीवाला खेकसला :

"अब क्या है?"

"वो खाली बोतल!" चंदू नरमाईने म्हणाला.

"मै तुम्हारी बोतल लेके भाग जानेवाला हूँ क्या? ठेर देता हूँ," असे म्हणून बाटली आणण्यासाठी तो वळला आणि नाडगौडा चित्त्याच्या चपळाईने, स्टाफसह आत घुसले आणि दाढीवाल्याच्या काही लक्षात

येण्यापूर्वीच त्याला झडप घालून बगलेत जेरबंद केले.

चंदूच्या चाणाक्षपणामुळे एक दरोडा पडतापडता वाचला होता. एक आरोपी फरार झाला होता. पण अनेक प्रकरणात वॉन्टेड असलेला अहमद ऊर्फ बाबू आयताच पोलिसांना सापडला होता.

या शौर्याबद्दल खुद्द पोलीस कमिशनर कानेटकर यांनी, चंदूला कार्यालयात बोलावून त्याचा सत्कार केला होता. सत्काराचे वेळी खुद्द कानेटकर साहेबांनी त्याला विचारले होते, ''काय चंदू, पोलिसात नोकरी करणार का?'' आणि चंदूने तत्काळ होकार भरला होता.

आणि खुद्द पोलीस कमिशनरांचे शिफारशीने चंदूला सन्मानाने पोलिसात भरती करून घेण्यात आले होते.

चंदू जात्याच हुषार आणि कामसू होता. पोलिसाची नोकरी करता करता त्याने आपले अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केले. डिपार्टमेंटच्या परीक्षा दिल्या. त्या अव्वल दर्जाने पास करून त्याने कॉन्स्टेबल ते इन्स्पेक्टर हे टप्पे पार केले होते. एक सच्चा, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी असा त्याचा डिपार्टमेंटमध्ये आणि जनमानसात लौकिक होता. अनधिकृत आणि काळे धंदे करणारे, चंदूचे नाव ऐकताच चळाचळा कापू लागत. चंदू इन्स्पेक्टर - कसे कुणास ठाऊक अगदी बिअरबार ते इन्स्पेक्टर या प्रवासात 'चंदू' हे नाव त्याला कायमचे चिकटले. खरं तर चंद्रकांत दुखंडे या नावाचा तो शॉर्टफॉर्म होता. सामान्यपणे विचार केला तर पांडू, बंडू, चंदू ही नावं अगदीच साधी शेळपट वाटतात. पण चंदूने मात्र आपल्या धाडशी कृत्यांनी या नावाला एक वजन प्राप्त करून दिलं होतं. अगदी साधा शिपाई असल्यापासून त्याने 'चंदू' या नावाचा दरारा, दबदबा निर्माण केला होता.

त्या वेळी त्याची पोस्टिंग डोंगरी पोलीस स्टेशनला होती. आपल्या सेक्शनमध्ये रात्रभर पेट्रोलिंग ड्युटी करूनसुद्धा चंदू फ्रेश होता. वायरलेस व्हॅनमध्ये बसलेला त्याचा इतर स्टाफ मात्र, कधी एकदा ड्युटी संपते आणि घरी जाऊन पडतो, याची वाट बघत होता. वायरलेस गाडी चारनळ भागात उभी होती. समोरच्याच हॉटेलातून चंदूने सर्वांसाठी चहा मागवला होता. पोऱ्या चहा आणतोय की नाही हे पाहण्यासाठी चंदूने नजर सहज हॉटेलकडे वळवली आणि बाजूच्या गल्लीत त्याला काहीतरी संशयास्पद हालचाल

दिसली. त्याच्या आंतरमनाने त्याला काही वेगळ्याच सूचना दिल्या. हळूहळू चंदू त्या गल्लीच्या दिशेने सरकू लागला आणि त्या गल्लीच्या अगदी नाक्यावर असलेल्या पानाच्या ठेल्यावर उभा राहून त्याने एक कलकत्ता, एकसोबीस, पक्की सुपारी, लवंग इलायची अशी पानाची ऑर्डर दिली. पानवाला भैया, हॉटेलवाला इराणी तसेच वायरलेस व्हॅनमधला त्याचा स्टाफ हे सर्वजण आश्चर्याने चंदूकडे पाहात होते. कारण चंदू  नेहमी, अधूनमधून जरी तिथे येत असला तरी त्याला पान घेताना किंवा खाताना कुणीच, कधीही बघितले नव्हते.

आश्चर्य करीतच भैय्याने पान बनवायला घेतले. इतक्यात एक पांढरी शुभ्र मारुती गाडी तिथं आली.  'तो' गाडीतून उतरला. पांढरा स्वच्छ पायघोळ कुडता, पठाणी लेंगा, डोक्यावर विणलेली सफेद गोल टोपी आणि पान खाऊन ओठ लालभडक - असा तो माणूस मारूतीमधून उतरला आणि थेट गल्लीतल्या एका घरात घुसला. चंदू जरी त्याला पाठमोरा उभा होता तरी पानाच्या ठेल्याच्या आरशात त्याला तो स्पष्ट दिसला होता.  चंदूच्या डोक्यात कुठंतरी घंटी वाजली. 'कोण बरं हा माणूस?' चंदू विचार करू लागला. चक्क डोक्यावरची कॅप काढून चंदूने कराकरा डोके खाजवले. पांढरा पायघोळ कुर्ता.. पठाणी लेंगा.. डोक्यावर विणलेली टोपी.. पान खाऊन तोंड लाल.. कोण.. कोण.. आणि अचानक विजेचा झटका बसावा तसं चंदूला ते आठवलं. येस.. उस्मानभाई.. उस्मानभाईच हा.. बारा वर्षापूर्वी बिअर बारमधून पळालेला. यस! हाच हाच तो! पानाच्या ठेल्याच्या आरशात, तो गल्लीच्या कुठल्या घरात घुसला हे चंदूने बरोबर बघितले होते. तो झटक्यात त्या घरात जायला निघाला. 'अरे, साहब पान.. पान,' असे पानवाला ओरडत होता, पण चंदूचे तिकडे लक्षच नव्हते.

घराचे दार बंद असल्याने आत काय चालले आहे हे कळायला काही मार्गच नव्हता. चंदूने घराच्या चौफेर नजर फिरवली. घराच्या डाव्या बाजूला एक दीड फुटाची मोकळी जागा होती आणि तिथं गटार होतं. त्याच बाजूला तीन-चार फुटांवर एक छोटी गजांची खिडकी होती. घाणीची पर्वा न करता चंदू गटाराच्या चिंचोळ्या जागेतून आत घुसला आणि गटाराच्या अरुंद कठड्यावर, कसाबसा उभा राहून खिडकीतून आत पाहू लागला.

आत आत्ता आलेला उस्मानभाई आणि इतर चारजण होते. उस्मानभाई बोलत होता आणि इतर चारजण मन लावून ऐकत होते..

''देखो, इसबार बिलकूल गलती नही होनी चाहिये। बम्बई और दिल्ली सभी धमाके एकसाथ, मतलब एक साथही होने चाहिये. झहीर, तुम और आब्बास दिल्ली संभालोंगे। ईसाक, तुम और मुन्ना बम्बई संभालोंगे और काम होने के बाद चार महिनोंतक हम एक दूसरे को नही मिलेंगे. ठीक है?'' ''जी उस्मानभाई''- चौघे एकसाथ म्हणाले आणि चंदूला आपली शंका खरी असल्याची खात्रीच झाली. ''दिल्ली-बम्बई एकसाथ धमाका'' हे शब्द त्याच्या डोक्यात थैमान घालायला लागले. काय बरं कट असेल यांचा?.. आणि अचानक चंदूच्या डोक्यात वीज कडाडली. बापरे?... म्हणजे मुंबई आणि दिल्लीत पुन्हा एकदा?... पुढचे बोलणे तो नीट लक्ष देऊन ऐकू लागला.

उस्मानभाई बोलत होता- ''जहीर और इसाक, तुम दोनो अपनी अपनी घडी एक दुसरेसे ठीक मिलाओ. दिल्ली में संसद भवन और बम्बईमें विधानभवन, दिल्ली और बम्बई के रेल स्टेशन, एकही साथ उडाना चाहिये. अगर जरा भी गलती हुई तो...'' माय गुडनेस! म्हणजे दिल्ली आणि मुंबईवर पुन्हा एकदा... बापरे! चंदूच्या मनात विचारांचे वादळ उठले. हा संहार थांबवला पाहिजे. काहीतरी केले पाहिजे! काहीतरी केले पाहिजे!!

चंदूने कठड्यावरून हळूच खाली उडी मारली. खिशातला मोबाईल काढून वायरलेस व्हॅनमधल्या स्टाफला हळू आवाजात काही सूचना दिल्या आणि कमरपट्ट्यातले लोडेड रिव्हॉल्वर हातात घेऊन दरवाज्यात उभा राहिला. तोपर्यंत चार रायफलधारी हवालदार त्याच्या मागे येऊन उभे राहिले होते.

चंदूने सर्वजोर एकवटून घराच्या दरवाज्यावर धाड्दिशी एक लाथ मारली. दरवाजा कडकडा मोडून पडला आणि या अचानक आणि अनपेक्षित हल्ल्याने आतली मंडळी क्षणभर गांगरून गेली आणि नेमका याच त्यांच्या क्षणिक बेसावधपणाचा फायदा चंदूने घेतला. निमिषार्धात चंदूने उस्मानभाईकडे झेप घेतली आणि.. आणि, शिवाजीने अफजलखानाला जसा बगलेत जेरबंद केला होता, तसाच बगलेत उस्मानभाईला जेरबंद केला आणि त्याच्या कपाळावर रिव्हॉल्वरची नळी टेकवून, हात खिशाकडे नेणाऱ्या चौघांना

म्हणाला, ‘‘हँड्सअप! कोई भी अगर हथियार बाहर निकालने की जरा भी कोशिश करेगा तो मै मेरा यह पुरा का पुरा रिव्हॉल्वर उस्मानभाई के भेजेमें खाली कर दूंगा!’’

चंदूच्या या धमकीचा योग्य तो परिणाम झाला आणि त्या चारही जणांनी आपले हात वर केले होते, आणि तोपर्यंत चार हवालदारांनी चारही अतिरेक्यांच्या कंठावर आपल्या रायफली टेकवल्या होत्या.

अशा रीतीने दिल्ली आणि मुंबई उद्‌ध्वस्त करण्याचा, पाकिस्तानी अतिरेक्यांचा कट चंदूने मुळातच उखडून टाकला होता. आणि एक नाही, दोन नाही तर तब्बल बारा अतिरेकी अगदी जिवंतपणे मुंबई पोलिसांच्या ताब्यात आले होते. चंदूच्या या धाडसी कृत्यामुळे हजारो, लाखो भारतीयांचे प्राण आणि अब्जावधी रुपयांची साधनसंपत्तीची हानी वाचली होती; आणि याच कामगिरीसाठी चंदूला आज राष्ट्रपतींकडून सुवर्णपदक देण्यात आले होते.

राष्ट्रपतीपदक स्वीकारण्यासाठी शिस्तबद्ध, धीम्या गतीने, टाळ्यांच्या कडकडाटात, राष्ट्रपतींच्या दिशेने जात असताना हा सारा चित्रपट चंदूच्या डोळ्यांसमोर काही क्षणांत सरकून गेला.

राष्ट्रपतींच्या समोर जाताच चंदूने एक कडक सॅल्यूट राष्ट्रपतींना ठोकला. तेवढ्यातच पुढे आलेल्या तबकातून, लाल रंगाच्या रिबिनीत गुंफलेले चकाकते सोनेरी पदक आपल्या हातात घेऊन, राष्ट्रपतींनी सन्मानाने आणि अभिमानाने ते चंदूच्या गळ्यात घातले आणि राष्ट्रपती भवन पुन्हा एकदा टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले. कचाकच कॅमेऱ्याचे फ्लॅश उडाले. चॅनलवाल्यांचे व्हिडिओ कॅमेरे फिरले. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रे, टी.व्ही., रेडिओ सगळीकडे एकच नाव गाजत होते - इन्स्पेक्टर चंदू... इन्स्पेक्टर चंदू... इन्स्पेक्टर चंदू.

चंदू सगळ्या देशाच्या गळ्यातला ताईत बनला. हजारो-लाखो सत्काराची निमंत्रणं आणि राख्यांचा अगदी वर्षाव त्याच्यावर झाला.

आणि याच निमंत्रणपत्रांत एक निमंत्रण होतं त्याच्या कोकणातल्या गावाचं. ते निमंत्रण बघून चंदूचे डोळे चमकले. ते निमंत्रण चंदू टाळू शकतच नव्हता. सबंध गावातर्फे, आय.जी. म्हणजे इन्स्पेक्टर जनरल नाडगौडा यांचे हस्ते त्याचा सत्कार होता. चंदू इन्स्पेक्टर नाडगौडा यांना विसरणे शक्यच

नव्हते आणि दुसरी गोष्ट म्हणजे आता ते आय.जी.पी. म्हणजे त्याचे महावरिष्ठ होते. आणखी महत्त्वाचं म्हणजे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते रिटायर्ड कमिशनर ऑफ पोलीस श्री. कानेटकर.

वेशीतूनच वाजतगाजत, मोठ्या मिरवणुकीने चंदूला व्यासपीठाकडे आणले गेले. चंदू डोळे भरून आपला गाव पाहून घेत होता. शाळा, चावडी, पोष्ट-ऑफीस, एस.टी.स्टँड - सगळं अगदी जसंच्या तसं होतं.

व्यासपीठावर पोहोचल्याबरोबर चंदूने नाडगौडा आणि कानेटकर यांना कडक पोलिसी सॅल्यूट ठोकला आणि मग खाली वाकून चक्क त्यांच्या चरणांवर अश्रूंचा अभिषेकच केला. त्या दोघांचेही डोळे पाण्याने भरून आले होते. त्यांनी दोघांनी चंदूला वर उचलून घट्ट छातीशी घेतले. इतक्यात चंदूला गावच्या पोलीस पाटलाबरोबर येत असलेले मामा-मामी दिसले. चंदूने त्या दोघांनाही वाकून नमस्कार केला. नंतर व्यासपीठावर भाषणं झडत होती. सारखा टाळ्यांचा कडकडाट होत होता. बाळू सदावर्ते पुष्पहार घालण्यासाठी व्यासपीठावर आला तेव्हा चंदूने त्याला कडकडून मिठी मारली. हे सगळं चालू असताना चंदूची नजर गर्दीवरून भिरभिरत होती. आणि शेवटी त्याला गर्दीत एका बाजूला उभी असलेली सड्यावरच्या सुताराची कमळी दिसली. चंदूने नीट निरखून बघितले. तिच्या गळ्यात मंगळसूत्र नव्हते... आणि ती त्याच्याकडे बघून हसत होती.

**(कलामंच, दिवाळी २०१०)**

# वा र स

“आबासाहेब गोगटे यांचा ‘निवांत’ बंगला आज गजबजून गेला होता. उत्साहाने सळसळून गेला होता. हास्याच्या कारंजांनी भिजून चिंब झाला होता. प्रसंगच तसा उत्साही आणि आनंदी घडला होता. गोगटे उद्योग समूहाच्या इतिहासात एक सुवर्णयोग येऊ घातला होता. बातमी ऐकल्यापासून आबासाहेब आणि माईसाहेब यांच्या आनंदाला पारावर राहिला नव्हता. तब्बल बारा वर्षे म्हणजे एक तप त्यांनी या दिवसाची वाट पाहिली होती. हा दिवस कधी आपल्या भाग्यात येईल याची त्यांनी आशाच सोडली होती. पण अखेर ईश्वराने त्यांच्यावर कृपा केली होती. माईसाहेबांच्या नवस-सायासाला फळ आले होते. नातवाची इवलीइवली पावलं बंगल्यात दुडुदुडु धावणार होती. ‘निवांत’ बंगल्यात पाळणा कुरकुरणार होता. खेळणी येणार होती. रडण्याच्या ट्यंहा ट्यंहा सुरांची मंगल शहनाई वाजणार होती. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गोगटे उद्योग समूहाचा वारस याचि देही याचि डोळा ते पाहणार होते. त्याला आपल्या अंगाखांद्यावर खेळवणार होते. आणि म्हणूनच त्यांनी आज आपले सर्व नातेवाईक, मित्र, अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी ही जंगी पार्टी आयोजित केली होती. दिव्या-पताकांनी बंगला सजवून टाकला होता. पार्टीत नाना तऱ्हेचे खाद्यपदार्थ, उंची विदेशी मद्य, यांची नुसती रेलचेल होती. कुठे कुणाला काही कमी पडू नये याकडे आबासाहेब जातीने लक्ष पुरवित होते.

मुलगा राजेश आणि सून राजश्री यांना तर कुठे ठेऊ आणि नको असे माईसाहेबांना झाले होते. राजश्री ही गेल्या बारा वर्षातली त्यांची तिसरी सून

म्हणजे एकुलता एक मुलगा राजेश याची तिसरी बायको. पहिली मनोरमा त्यांच्या तोलामोलाची म्हणजे उद्योगपती आपटे यांची मुलगी होती. आठ वर्षात तिला मूलच झाले नाही म्हणून तिला घटस्फोट दिला आणि त्यांचेच भागीदार फडके यांची अरुंधती सून म्हणून घरी आणली. दोन वर्षांनी तिला मुलगी झाली, पण जन्मत:च ती गेली. दोन वर्षांनी तिला दुसरीही मुलगीच झाली, पण आपल्या उद्योगाचा वारसा एका मुलीकडे देण्याची आबासाहेबांची तयारी नव्हती म्हणून काहीतरी खुसपट काढून तिचा आणि राजेशचा घटस्फोट घडवून आणला. यात त्यांच्याइतकाच माईसाहेबांचा पण पुढाकार होता. तिसरी सून बघणे जरा कठीणच गेले. दोन घटस्फोट झालेल्या प्रौढ वराला मुलगी कोण देणार?

बंगल्यात दरवर्षी होणाऱ्या गणेशोत्सवात, पूजा करण्यासाठी भिडे गुरुजी आले होते. त्यांच्या बरोबर एक हुशार आणि चुणचुणीत मुलगी होती.

''गुरुजी, कोण ही मुलगी?'' तिला पाहून आबासाहेबांनी विचारले.

''माझी तीन नंबरची मुलगी,'' गुरुजींनी सांगितले.

''म्हणजे हिच्या आधीच्या पण दोन मुलीच आहेत की काय?'' आबासाहेबांनी शोधक स्वरात विचारले.

''नाही. मोठी दोन मुलं आहेत. ही तिसरी,'' गुरुजी म्हणाले.

मुलगी चलाख आणि कामसू दिसली. वडिलांना त्यांच्या कामात हरप्रकारे आणि चटपटीतपणे मदत करीत होती.

''बाळ, नाव काय तुझं?'' आबासाहेबांनी विचारले.

''राजश्री रामचंद्र भिडे,'' कसलीही भीड न बाळगता तिने नाव सांगितले.

''काय शिकलीस?'' आबासाहेबांचा पुढचा प्रश्न.

''कॉमर्सची पदवीधर आहे,'' ती म्हणाली.

तेवढ्यात गुरुजींची गणपती - पूजा आटोपली. त्यांनी आरतीसाठी सर्वांना पाचारण केले. टाळमृदुंगाच्या तालावर आरत्या सुरू झाल्या. राजश्रीने आपल्या मंजुळ आणि सुरेल आवाजात, लता मंगेशकर यांनी गायिलेल्या चालीत, 'सुखकर्ता दुखहर्ता' ही आरती म्हटली.

''बाळ, इकडे ये जरा.'' आरती झाल्यावर माईसाहेबांनी तिला जवळ बोलवून आपल्या शेजारी बसवून घेतले. ''आवाज छान आहे तुझा,'' तिच्या

पाठीवरून हात फिरवत त्या म्हणाल्या.

''थँक यू'' राजश्री नम्रपणे म्हणाली.

''राजश्री, तीर्थप्रसाद दे सर्वांना,'' गुरुजींनी तिला सांगितले.

''येते हं'' असे माईसाहेबांना म्हणून राजश्री उठली आणि पूजेच्या दिशेने गेली. नकळत माईसाहेबांनी आबासाहेबांकडे बघितले. राजश्रीने सर्वांना तीर्थप्रसाद दिला. आबासाहेबांनी आणि माईसाहेबांनी तिच्या डोक्यावर आपला हात ठेवला आणि तिच्या हातात एक भरजरी शालूचा बॉक्स दिला.

''हे काय? हे कशाला?'' राजश्री बावचळून म्हणाली.

''असू दे. गोगटेंकडून तुला भेट आहे ती,'' आबासाहेब प्रेमाने म्हणाले.

''पण एवढी? बाबा, बघा ना,'' गुरुजींकडे बघत राजश्री व्याकुळतेने म्हणाली.

''खरंच आबासाहेब, याची काय जरूर आहे? आणि हे फार होतंय,'' भिडे गुरुजी नम्रपणे म्हणाले.

''काही फार होत नाही. आणि हे आम्ही आमच्या सूनबाईंना देत आहोत,'' माईसाहेब प्रेमळ सक्तीच्या स्वरात म्हणाल्या.

''क... क... काय? स..स..सूनबाईला?'' राजश्री आणि गुरुजी, एकदम एकाच सुरात ओरडले.

''होय! आमच्या सूनबाईला,'' आबासाहेब आणि माईसाहेब तशाच एका सुरात ठासून म्हणाल्या.

''बाबा, तुम्ही काहीच बोलला नाहीत,'' घरी आल्या आल्या राजश्री गुरुजींना म्हणाली.

''काय बोलणार? त्यांनी बोलायची संधीच दिली नाही.'' गुरुजी म्हणाले.

''तरीपण तुम्ही लगेच होकार द्यायचा नव्हता,'' राजश्रीने आपली नाराजी प्रकट केली.

''पण वाईट काय आहे मुलामध्ये? चांगलं श्रीमंत खानदानी घराणं आहे. त्यांच्या पायाशी बसण्याची सुद्धा आपली लायकी नाही. राणीसारखं राज्य करशील,'' उमाबाई, राजश्रीची आई म्हणाली.

‘‘अग पण तुझ्या या राजाने दोन वेळा घटस्फोट घेतलाय. माझ्यापेक्षा दुप्पट वय आहे त्याचं,’’ राजश्री निक्षून बोलली.

‘‘असू दे! पण दिसायला अजून प्रथम वरासारखा आहे,’’ गुरुजी आग्रहाने म्हणाले.

‘‘बाबा, प्रथम वरासारखा दिसणं वेगळं आणि असणं वेगळं. दोन्हीतला फरक कळतोय का तुम्हाला?’’ राजश्री आर्जवाने म्हणाली.

‘‘तो फरक कळतोय मला. पण आपली परिस्थिती आणि त्यांची परिस्थिती, यातला फरक कळतोय का तुला? अगं, गरीब, दरिद्री घराणं आपलं. तुझ्या सुंदर आणि श्रीमंती दिसण्याला शोभेसं घर बघणं जमणार आहे का आपल्याला? माझं आणि तुझं नशीब थोर म्हणून हे स्थळ चालून आलंय. आणि संपूर्ण लग्न स्वखर्चाने करून देणार आहेत. आपल्याला नव्या पैशाचा खर्च नाही. तेव्हा नकार देण्याचा करंटेपणा करू नकोस,’’ गुरुजी जरा चिडूनच बोलले.

‘‘राजी बेटा, खरं आहे त्यांचं! आमचं आयुष्य मेलं गेलं दारिद्र्यात. निदान तुझं तरी आयुष्य श्रीमंतीत, सुखात जाऊ दे,’’ आईने पुस्ती जोडली.
‘‘अगं, पण आई, मी काय म्हणते...’’

‘‘बस! आता तू काही म्हणू नकोस. आम्ही तुला दिलेल्या स्वातंत्र्याचा आणखी गैरफायदा घेऊ नकोस. मुलीच्या जातीने जास्त फुशारक्या मारू नयेत. हे लग्न ठरलं म्हणजे ठरलं!’’ असं ठणकावून गुरुजी निघून गेले. राजश्रीने आईच्या कुशीत जाऊन आपला उमाळा जिरवला.

उंबरठ्यावरचे माप ओलांडून, ‘भिडे’ची ‘गोगटे’ झालेली राजश्री आत आली. माईसाहेबांना तिने वाकून नमस्कार केला. ‘‘आम्हाला तुझ्याकडून उत्तम नातू मिळो,’’ असा आशीर्वाद त्यांनी दिला. दिला म्हणण्यापेक्षा स्वत:च स्वत:ला घेतला म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. नाही म्हटलं तरी या आशीर्वादाने राजश्रीला थोडं टेन्शनच आलं.

सासरी आल्यावर राजश्रीचं खूप म्हणजे खूपच कौतुक झालं. आप्पासाहेबांनी हनिमूनसाठी त्यांना खास युरोप टूर भेट दिली होती. टूरवरून परत आल्यावर घरात प्रवेश करताच माईसाहेबांनी तिच्याकडे निरखून पाहिले होते आणि ‘‘हे काय, टूरवरून दोघेच परत आलात?’’ असे उद्गार काढले

होते. पण एरवी माईसाहेबांनी तिचे खूप लाड केले होते. तिचा प्रत्येक सण दणक्यात साजरा केला होता. प्रत्येक सणाला तिच्या माहेरी गिफ्ट पाठवल्या होत्या. भरजरी वस्त्रांनी आणि दागिन्यांनी तिला गौरीसारखे सजवले होते. दिवाळी संपतच नव्हती. ''श्रावण' तर महिनाभर साजरा झाला. बघता बघता वर्ष संपले. गणपती आले.

''माईसाहेब, याच गणपतीच्या दिवसात तुम्ही राजश्रीला मागणी घालून सून करून घेतलेत. वर्ष झालं,'' गुरुजी पूजा करता करता म्हणाले.

''हो. वर्ष झालं. पण ज्या गणपतीची आम्ही वाट पाहतोय तो अजून आलाच नाही,'' समईत तेल घालीत असलेल्या राजश्रीकडे बघत माईसाहेब म्हणाल्या.

''येईल येईल! गणपती, गौर, काहीतरी नक्कीच येईल,'' गुरुजी हसत म्हणाले.

''अहं, गौर नाही, आम्हाला गणपतीच हवा,'' माईसाहेब निग्रहाने म्हणाल्या.

''बरं तथास्तु!'' राजश्रीकडे पाहात गुरुजींनी हसत आशीर्वाद दिला. समईत तेल घालता घालता राजश्री झटक्यात उठून आत गेली. ''लाजली वाटतं!'' गुरुजी हसत म्हणाले.

आणि यानंतर दोन गणपती आले आणि गेले; पण गुरुजींचा आशीर्वाद काही फळाला आला नाही. राजश्रीच्या होणाऱ्या कौतुकात मात्र उतरत्या भाजणीप्रमाणे, प्रतिदिनी वीजकपातीसारखी कपात होऊ लागली. माहेरी गिफ्ट जाणे बंद झाले. मागच्या सणाला घेतलेले शालू आणि साड्या नव्या म्हणून पुन्हा नेसाव्या लागल्या. माईसाहेबांना टेन्शन यायला लागलं आणि त्यांच्याहीपेक्षा जास्त टेन्शन राजश्रीला यायला लागलं.

नेहमीप्रमाणे आपल्या सुस्वर आणि मंजुळ आवाजात राजश्रीने, लता मंगेशकर चालीतील गणपतीची आरती म्हणायला सुरुवात केली. टाळमृदुंगाचा ध्वनी घुमायला लागला. राजश्रीने म्हटलेल्या 'त्या लता मंगेशकर' आरतीनेच गोगटे गणेशोत्सवाची सुरुवात व्हायची, हा गेल्या तीनचार वर्षांत प्रघातच पडून गेला होता. राजेशच्या हातात आरतीचे तबक होते. गुरुजी बाजूलाच उभे राहून घंटी-नादाची साथ देत होते. वादक तल्लीन होऊन टाळमृदुंग वाजवीत होते. आबासाहेब, माईसाहेब आणि त्यांचा भला मोठा गोतावळा

मन:पूर्वक टाळ्यांची साथ करीत होता. राजश्रीने 'हिरेजडित मुकुट शोभतो बरा' या ओळीसाठी टिपेचा स्वर लावला आणि अचानक 'ओक ओक' करत तोंडावर हात धरून, ती बाथरूमच्या दिशेने धावली. ''काय झालं काय झालं!'' एकच गिल्ला झाला. कोचात अडकलेल्या शालूची पर्वा न करता, पदर खेचून काढत, माईसाहेब तिच्या मागोमाग धावल्या. आबासाहेबांनी त्वरेने खिशातला मोबाईल काढून डॉ. पुरंदरेंना फोन लावला.

घोषात चाललेली आरती अचानक बंद पडली. घंटा, टाळ, मृदुंग, टाळ्या, सगळे आवाज एकदम बंद झाले. बंगल्यात सर्वत्र एक गंभीर शांतता आणि स्तब्धता भरून राहिली. सर्वांच्या चेहेऱ्यावर टेन्शन.. टेन्शन.. टेन्शन. भिडे गुरुजी आणि उमाबाई तर हवालदिल झाले. पाचच मिनिटांत, जवळच असलेले, डॉ. पुरंदरे आले आणि आपला स्टेथास्कोप सावरीत लगबगीने आत गेले. बाहेर मात्र टाचणी पडली तरी आवाज यावा इतकी शांतता! सगळ्यांचे लक्ष 'त्या' बंद दाराकडे लागले होते. अचानक दार उघडले गेले. माईसाहेब दारात प्रकट झाल्या आणि आनंदाने ओरडल्या, ''अरे, वाजवा वाजवा. आरती दणक्यात होऊ द्या. गणपती पावलाय. राजश्रीच्या पोटी गोगटे घराण्याचा वारस जन्माला येतोय. होऊ द्या. आरती दणक्यात होऊ द्या!'' माईसाहेबांनी अशी घोषणा करताच राजेश तीरासारखा आत धावला. टाळ मृदुंगाच्या आवाजाने बंगला दणाणून गेला. आबासाहेब आणि माईसाहेब यांनी तर, त्या तालावर दोन्ही हात उंचावून भांगडा करायला सुरुवात केली. बंगला दिव्यांनी उजळून निघाला. पार्टी धमाल रंगली.

'बागेतील डोहाळजेवण आपण म्हैसूरच्या वृंदावन गार्डनमध्ये करायचं. हवं तर निमंत्रितांना विमानाने घेऊन जाऊ. तेवढीच आपली एक फॅमिली ट्रिप होईल,' माईसाहेबांनी मनोमन ठरवलेला बेत उत्साहाने जाहीर केला. ''बरं बाईसाहेब सुनेबरोबरच सासूचे पण डोहाळे पुरवू. मग तर झालं?'' आबासाहेबांनी हसत हसत दुजोरा दिला. ''मग? गोगटे इंडस्ट्रीजचा भावी मालक आहे तो,'' असं म्हणत, चकाकत्या पांढऱ्या शुभ्र पर्समधून आपला गोल्डन मोबाईल काढला आणि डॉ. पुरंदरेंचा नंबर प्रेस केला.

''बोला बाईसाहेब. काय हुकूम?'' पलीकडून डॉ. पुरंदरेंनी विचारणा केली.

''आज आपला, सोनोग्राफी करण्याचा प्रोग्राम ठरलाय ते लक्षात आहे ना?'' माईसाहेबांनी काळजीच्या स्वरात विचारले. ''म्हणजे सगळं काही ठीकठाक आहे याची खात्री केलेली बरी.'' आपली काळजी त्यांनी अधिक स्पष्ट केली.

''ऑफ कोर्स, ऑफ कोर्स! कधी येताय?'' पुरंदरेंनी विचारले.

''निघतोच आम्ही आत्ता. चलाहो.'' असं आबासाहेबांना म्हणून त्यांनी राजश्रीच्या रूमच्या दिशेने कूच केले. आबासाहेबांनी हसतच कौतुकाने मान हलवली.

आबासाहेबांची शेवरलेट पुरंदरे क्लिनिकच्या दारात पोहोचताच, दोन परिचारिका लगबगीने पायऱ्या उतरून खाली आल्या आणि राजश्रीला दोन्ही बाजूंनी धरून पुन्हा पायऱ्या चढू लागल्या. ''आय ॲम ओके! धरून नेण्याची गरज नाही,'' राजश्री म्हणाली.

''नाही कशी? एव्हरी केअर शुड बी टेकन. 'गोगटे इंडस्ट्रीज'चा वारस आहे तो,'' माईसाहेब आग्रहपूर्वक म्हणाल्या.

''हो; आणि बारा वर्षांनी येणारा,'' आबासाहेबांनी री ओढली.

क्लिनिकच्या दारात खुद्द डॉ. पुरंदरे स्वागताला हजर होते. परिचारिकांनी राजश्रीला तपासणी रूममध्ये नेले. आबासाहेब आणि माईसाहेब यांना आपल्या केबिनमध्ये बसवून, डॉ. पुरंदरे तपासणी रूमकडे गेले.

''सोनोग्राफी झाली?'' डॉक्टर केबिनमध्ये परत येताच, अधीरतेने माईसाहेबांनी विचारले.

''यस्! बाळ आणि आई, दोघांची तब्येत उत्तम आहे. नो प्रॉब्लेम,'' डॉ. पुरंदरे आश्वासक सुरात म्हणाले. तेवढ्यात राजश्री पण पदर सावरत तेथे येऊन बसली.

''राजश्री, बेटा जरा बाहेर जाऊन बसशील? मला डॉक्टरांशी जरा बोलायचंय,'' माईसाहेब प्रेमळपणे म्हणाल्या. काहीच न बोलता राजश्री उठली आणि बाहेर गेली. ती जाताच, माईसाहेबांनी शेजारीच बसलेल्या आबासाहेबांना हळूच कोपराने ढोसले आणि कुजबुजत्या स्वरात म्हणाल्या, ''विचाराना!''

''हो हो विचारतो. जरा धीर धरा.'' अशा अर्थाने आबासाहेबांनी मान

हलवली आणि जरासे चाचरतच डॉक्टरांना म्हणाले, ‘‘डॉक्टरसाहेब, त्याचं काय आहे... म्हणजे ही असं म्हणत होती की... तीन महिन्यांनी...’’

‘‘अहो, तीन महिन्यांनी काय म्हणता आबासाहेब? प्रत्येक महिन्याला तपासणी केली पाहिजे,’’ डॉक्टर हसत म्हणाले.

‘‘हो. प्रत्येक महिन्याला काय? हवी तर प्रत्येक दिवसाला, प्रत्येक तासाला करू. पण यांना वेगळंच विचारायचंय,’’ असं म्हणून माईसाहेबांनी पुन्हा आबासाहेबांना कोपराने ढोसले.

‘‘हो! म्हणजे मला असं विचाराचंय की गर्भात...’’ आबासाहेबांनी वाक्य अर्धवट तोडले.

‘‘आलं लक्षात. तुमची काय अपेक्षा आहे?’’ डॉक्टरांनी समजून विचारले.

‘‘आम्हाला नातू हवाय,’’ आबासाहेबांनी पटकन सांगून टाकले.

‘‘आणि नात असेल तर?’’ डॉक्टरांनी उलट विचारले.

‘‘पाडून टाका,’’ माईसाहेब झटकन म्हणाल्या.

‘‘सॉरी! हे काम मी नाही करू शकत. कायद्याने तो गुन्हा आहे,’’ डॉक्टर समजावणीच्या सुरात म्हणाले.

‘‘ओके! नो प्रॉब्लेम,’’ आबासाहेब सहज म्हणाले.

ते असं म्हणताच, माईसाहेबांनी पुन्हा त्यांना कोपराने ढोसले.

‘‘डॉक्टरसाहेब, तुम्हाला या क्लिनिकवर आणखी एक मजला चढवायचा आहे, असं तुम्ही एकदा मला म्हणाला होता,’’ सहज आठवल्यासारखे आबासाहेब म्हणाले.

‘‘हो; पण सध्या कॉस्ट खूप वाढलीय. मटेरियल, मजूर, सगळंच महाग झालंय,’’ डॉक्टर म्हणाले.

‘‘काय हे डॉक्टरसाहेब... मग आम्ही कशाला आहोत? हवीत ती माणसं बुक करून कामाला सुरुवात करा,’’ अ‍ॅटेचीमधून चेकबुक काढीत आबासाहेब म्हणाले.

‘‘नाही... काम सुरू करू; पण...’’ डॉक्टर बोलताना जरा चाचरलेच. मासा गळाला लागल्याचे आबासाहेबांच्या अनुभवी नजरेने बरोबर हेरले.

‘‘हं बोला. कधी काम सुरू करताय? त्याप्रमाणे चेकवर तारीख

टाकतो,'' धोरणीपणानं आबासाहेब म्हणाले.

''आज रात्रीच,'' एवढंच डॉक्टर म्हणाले.

''काय म्हणाले डॉक्टर? ठीक आहे ना सगळं? काही प्रॉब्लेम नाही ना?'' घरी येताच राजश्रीने अधीरतेने विचारले.

''अगं हो हो! किती प्रश्न विचारशील एकदम? सगळं काही ठीक आहे. रात्री पुन्हा बोलावलंय.'' माईसाहेब, जरा तुटकच म्हणाल्या.

''का? काही सीरियस आहे का?'' राजश्रीने काळजीच्या स्वरात विचारले.

''तसं काही नाही ग! एक इंजेक्शन द्यायचं होतं; पण त्यांच्याकडे ते रेडीली अव्हेलेबल नव्हतं म्हणून रात्री बोलावलंय, माईसाहेब कॅज्युअली म्हणाल्या.

रात्री जेवणे झाल्यावर, आबासाहेब आणि माईसाहेब, राजश्रीला घेऊन क्लिनिकमध्ये हजर झाले. पण सकाळप्रमाणे, स्वागताला परिचारिका नाहीत की डॉक्टर नाहीत. राजश्रीला हे जरा खटकलेच. क्लिनिकमध्ये पाऊल ठेवताच, डॉक्टरांनी तिला तपासणी रूममध्ये जाण्यास सांगितले. त्यांची सकाळची वागणूक आणि आत्ताची वागणूक यात तिला चांगलाच फरक जाणवला. ते काही तणावाखाली आहेत असे तिला वाटले.

''काही सीरियस तर नाही ना?'' तिने घाबरून डॉक्टरांना विचारले.

''नथिंग! एव्हरथिंग इज ओके. तुम्ही आत जाऊन झोपा. मी आलोच.'' डॉक्टर म्हणाले.

''घाबरू नकोस. आम्ही दोघे आहोतच इथे,'' माईसाहेब म्हणाल्या.

त्यांनी असं का बोलावं हे काही तिला समजले नाही. ती मुकाटपणे आत गेली आणि तपासणी टेबलावर पडून राहिली. डोळे मिटून घेतले.

थोड्याच वेळात तिथे दोन परिचारिका आल्या. ''झोप लागली वाटतं,'' एकजण तिच्याकडे पाहून पुटपुटली.

''तू पाणी गरम कर. तोपर्यंत मी कापूस काढते,'' दुसरी म्हणाली. काम करता करता त्या बोलत होत्या. ''काय तरी बाई हल्लीचे हे श्रीमंती नखरे! तरुणपणी यांना मुलं नको असतात. तारुण्य कमी होतं म्हणे यांचं,'' पहिलीने शेरा मारला.

‘‘होना! सासू-सासऱ्यांना हवंय आणि हिला नको म्हणे,’’ पहिली.

‘‘अगं नाही. तेच तर घेऊन आलेत हिला,’’ दुसरी.

राजश्रीने कान टवकारले. या दोघी कुणाबद्दल बोलत आहेत हे काही तिला कळेना. ती डोळे मिटून गुपचूप ऐकत राहिली.

‘‘पण मी म्हणते, आता मुलं नको असायला काय झालं? लग्नाला चांगली तीन वर्षे झालीत म्हणे,’’ पहिली म्हणाली. राजश्रीने कान अधिकच टवकारले.

‘‘तरुण मुलींचे हे नखरे असतात एकेक. पण मी म्हणते, मोठ्यांना कळतं की नाही?’’ दुसरी म्हणाली.

‘‘अगं सुनांच्या पुढे हल्ली सासवाचं काही चालत नाही. गप्प बाई, ऐकलं तिनं तर आपल्यावर शेकायचं,’’ असं म्हणून त्या बोलायच्या थांबल्या.

आता मात्र राजश्रीला राहवेना. डोळे उघडून तिने सरळच त्यांना विचारले. ‘‘कुणाबद्दल बोलताय तुम्ही हे?’’

हे ऐकून दोघी चपापल्या. तरी पण एकीने बोलण्याचे धाडस केलेच. ‘‘माफ करा; पण तुमच्याबद्दल बोलतोय आम्ही बाईसाहेब. अहो, देवानं चांगलं दान टाकलंय पदरात तर का पाडायला निघालात?’’

‘‘मी? आणि माझं बाळ पाडायला निघालेय? कोण म्हणालं असं?’’ काही न समजून राजश्रीने उलट प्रश्न केला.

‘‘हेच! बाहेर बसलेले तुमचे सासू-सासरे. आत्ताच तुम्हाला मुलं नकोय म्हणे!’’

हे ऐकताच राजश्री ताडकन टेबलावरून खाली उतरली आणि त्या खोलीतून तरातरा बाहेर पडून डॉक्टरांच्या केबिनमध्ये घुसली.

‘‘माझं ॲबॉर्शन करण्यासाठी तुम्ही मला इकडे आणलंय?’’ तिने सरळच माईसाहेबांना प्रश्न विचारला. अनपेक्षितपणे तिचा तो प्रश्न कानावर पडल्यामुळे क्षणभर माईसाहेब किंचित गांगरल्या. डॉक्टर आणि आबासाहेब बघतच राहिले. इतक्यात, मेडिकल फॉर्मवर सही करण्यासाठी बोलावून घेतलेला शेखर तिकडे येऊन थडकला. माईसाहेब त..त..प..प.. करीत कशातरी म्हणाल्या, ‘‘अहं.. तसं नाही.. पण.. म्हणजे.. राजेशच म्हणाला की तुला...’’

‘‘काय हो? मी कधी काय म्हणाले होते तुम्हाला?’’ राजेशकडे वळून

राजश्री म्हणाली.

''नाही... म्हणजे अगं...''

राजेशला तसाच फाफललेल्या स्थितीत सोडून राजश्री माईसाहेबांकडे वळून म्हणाली, ''पण याबद्दल मला एका शब्दाने विचारायची गरज वाटली नाही तुम्हाला?''

''तुला काय विचारायचं? गोगटे घराण्याचे निर्णय भिक्षुकांच्या मुलींना विचारून होत नसतात,'' असं म्हणून त्यांनी फॉर्म राजेशपुढे केला आणि म्हणाल्या, ''कर बाबा सही त्याच्यावर.''

राजेशने सही करण्यासाठी खिशातून पेन काढलं आणि तो सही करणार इतक्यात राजश्रीने झडप घालून तो फॉर्म आपल्याकडे ओढून घेतला आणि संतापाने थरथर कापत राजेशकडे बघून ती म्हणाली, ''पण हे मूल का नकोय तुम्हाला?''

''कारण तुझ्या गर्भात मुलगी आहे. आम्हाला घराण्याचा वारस म्हणून मुलगी नकोय, मुलगा हवाय,'' राजेशला काही बोलू न देता माईसाहेब म्हणाल्या.

हे ऐकलं मात्र, राजश्री क्षणभर स्तिमितच झाली. तिच्या तोंडून शब्दच फुटेना. बापरे! काय भयंकर माणसं आहेत ही. स्वार्थासाठी सरळसरळ एका निष्पाप जीवाची हत्या करायला चाललेत हे. आणि हे म्हणे खानदानी श्रीमंत. अरे कसले श्रीमंत? भिकारडे, नीच, नराधम आहात तुम्ही. राजश्रीचं मन आक्रंदून उठलं.

''पण मला हे मूल हवं होतं आणि मुलगी आहे म्हटल्यावर तर मी तिला जन्म देणारच. कसं तुम्ही माझं अबोर्शन करता ते बघतेच मी. अरे, माणसं नाहीत तुम्ही, राक्षस आहात राक्षस! आणि डॉक्टरसाहेब, तुम्हाला तर देव मानतो आम्ही, जीवनदाते मानतो. आणि तुम्हीसुद्धा एका निष्पाप जीवाची गर्भातच हत्या करायला निघालात? शेम ऑफ यू! परमेश्वर तुम्हाला कधीच क्षमा करणार नाही,'' असं बोलून ती निघाली. इतक्यात माईसाहेबांनी डॉक्टरांना खूण केली. डॉक्टरांनी स्टाफला खूण करताच तिथे उभ्या असलेल्या दोनतीन परिचारिकांनी तिला घट्ट जखडलं नि तापसणी रूमकडे खेचत नेऊ लागल्या. राजेश आणि आबासाहेबांनी पण त्यांना हातभार लावला. चांगलीच

झटापट झाली. राजश्रीच्या अंगात कुठून एवढे बळ आले कुणास ठाऊक; पण एक हिसडा मारून ती निसटली आणि त्या चारपाच जणांच्या हातावर तुरी देऊन तेथून धूम पळाली. धडधड करून उड्या मारतच ती क्लिनिकच्या पायऱ्या उतरली आणि धावतच जाऊन समोरच उभ्या असलेल्या रिक्षात शिरली. ''जल्दी चलो!'' इतकंच ती रिक्षावाल्याला म्हणाली आणि रिक्षा भरधाव निघाली. तोपर्यंत गोगटे कंपनी, डॉक्टर आणि परिचारिका, वेगाने जाणाऱ्या रिक्षाकडे पाहातच राहिले होते.

भिडे गुरुजी उद्याच्या पूजेसाठी लागणारे साहित्य एकत्र करीत होते. ''आम्ही एक सुपारीसुद्धा देणार नाही. सगळं सामान तुम्हीच आणायचं,'' असे यजमानाने बजावून सांगितले होते. त्यामुळे खारका, बदाम, विड्याची पाने हे सर्व साहित्य ते पिशवीत भरत होते. उमाबाई स्वयंपाकघरात झाकपाक करीत होत्या. इतक्यात 'खाडखाड' अशी दाराची कडी वाजली. 'इतक्या रात्री कोण आलं असावं' असा विचार करीत ''बघाहो, कोण आलंय ते,' असं फर्मान गुरुजींनी आत सोडलं. ''बघते'' असं म्हणत आणि पदराला तोंड पुसत उमाबाई बाहेर आल्या आणि दार उघडले.

दार उघडताच राजश्री त्यांच्या अंगावर झेपावली आणि 'आई' असा हंबारडा फोडून, त्यांच्या कुशीत शिरून ढसाढसा रडू लागली.

''अगं काय झालं? काय झालं राजी?'' तिच्या पाठीवरून हात फिरवीत त्या विचारू लागल्या.

''अहो... अहो ऐकलंत का? जरा बाहेर या, राजी आलीय. ही बघा कशी करतेय,'' अशी साद त्यांनी आत बसलेल्या गुरुजींना घातली.

''आलो आलो!'' म्हणत घाईनेच गुरुजी बाहेर आले. आणि ते दृश्य बघून ''काय झालं? राजी अग रडतेस का?'' असं घाबरून विचारू लागले. दोघांनी धरून तिला आत आणले आणि खुर्चीवर बसवले. उमाबाई धावत पाणी आणायला आत पळाल्या. गुरुजी ''उगीउगी'' असं म्हणत तिच्या पाठीवरून हात फिरवित होते. उमाबाई पाण्याचे तांब्याभांडे घेऊन आल्या. तोपर्यंत राजश्रीचे रडणे थोडे नियंत्रणात आले होते. ''आधी पाणी पी, मग बोल,'' उमाबाई म्हणाल्या. पाणी पिऊन झाल्यावर रडतच तिने आपली हकिगत सांगितली. ''मला नाही जायचं त्या घरी परत.'' हुंदके देतच तिने

आपला निर्णय सांगितला. ते ऐकून गुरुजी आणि उमाबाई दोघेही स्तब्ध झाले.

''हे बघ राजी, लग्न झालेल्या मुलीने असा वेडा विचार करायचा नसतो,'' उमाबाई शांतपणे व समजुतीच्या स्वरात म्हणाल्या.

''हो बेटा! आता तू शांतपणे झोप. सकाळी मी येईन तुझ्याबरोबर आणि बोलेन आबासाहेबांशी,'' गुरुजी तिच्या पाठीवर थोपटत म्हणाले.

''काय बोलणार तुम्ही त्यांच्याशी? अहो, माझ्या पोटच्या गोळ्याला, जन्माआधीच ठार मारायला निघाले होते ते राक्षस! मी त्या घरी परत जाणार नाही म्हणजे नाही,'' ती निक्षून म्हणाली.

''आणि जोपर्यंत तू हे ॲबॉर्शन करून घेत नाहीस तोपर्यंत आम्ही पण तुला घरात घेणार नाही,'' उघड्या दारातून तिचे बोलणे ऐकत येत असलेल्या माईसाहेब तितक्याच आग्रहाने म्हणाल्या. त्यांच्या पाठोपाठ आबासाहेब आत आले. लगबगीने उठून गुरुजींनी दोन खुर्च्या त्यांच्यासाठी मांडल्या. ''बसा,'' ते हात जोडून म्हणाले.

''बसायला नाही आलो आम्ही. बजावायला आलो आहोत. हिने जर आमचे ऐकले नाही तर तुमच्या मुलीला आणि तुम्हाला आमचं घर कायमचं बंद!'' असं बोलून आबासाहेब आणि माईसाहेब आल्या पाऊली परत गेले.

''ऐकलंस ना पोरी, तुझ्या या नसत्या हट्टापायी, एवढं मोठं घर तुटतंय आपल्याला,'' गुरुजी अगतिकपणे म्हणाले.

''नसता हट्ट? याला, याला तुम्ही नसता हट्ट म्हणता? बाबा, अहो माझ्या लेकराचा खून करायला निघाले होते हे नराधम. आणि माझ्या वागण्याला तुम्ही नसता हट्ट म्हणताय?'' राजश्री उसळून म्हणाली.

''असा वेडेपणा करू नकोस बाळे. एकदा मुलगी सासरी गेली की तेच तिचं घर. तिथून ती ताटीवरूनच बाहेर पडायची, असं आपलं धर्मशास्त्र सांगतं,'' उमाबाई समजावण्याच्या सुरात म्हणाल्या.

''कुठलं धर्मशास्त्र असं सांगत सांग बघू. मुलगी म्हणजे माणूस नाही? तिला भावना नाहीत? मतं नाहीत? अगं, धर्माच्या नावाखाली स्त्रियांना गुलाम करायचा पुरुषांचा डाव आहे हा. अग्निपरीक्षा फक्त सीतेनेच द्यायची? शिळा होऊन फक्त अहिल्येनेच पडायचं? आणि त्या गेल्यावर, संपल्यावर, सती सती म्हणून पुरुषांनी त्यांचं पोकळ, निरर्थक गुणगान करायचं! नाही आई.

या भंपक आणि भोंगळ रूढी, परंपरांविरुद्ध स्त्रियांनी आता आवाज उठवला पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. आणि मी तो करणार. त्या घरी मी जाणार नाही म्हणजे नाही,'' राजश्री निकराने म्हणाली.

''नाही राजश्री, एकदा मुलगी लग्न करून सासरी गेली की ती माहेराला मुकली. या घरात पुन्हा तुला थारा नाही,'' गुरुजी निक्षून म्हणाले. हे ऐकून राजश्री अवाक् झाली. आपले वडील हे बोलत आहेत यावर तिचा विश्वास बसेना.

''काय बोलता हे तुम्ही बाबा. अहो, मग मी जाऊ तरी कुठे?'' राजश्री काकुळतीने म्हणाली.

''कुठेही जा! नदी, नाले, विहिरी, डोंगर, कपारी, कुणीही तुला पोटात घेईल; पण या घरात तुला स्थान नाही,'' गुरुजी संतापाने बोलले.

''अहो, काय बोलता तुम्ही हे?'' उमाबाई कळवळून बोलल्या आणि बोलता बोलता आलेला हुंदका आवरण्यासाठी त्यांनी पदराचा बोळा तोंडात कोंबला.

वातावरण कमालीचं नि:शब्द झालं. कुणीच काही बोलेना. राजश्री शांतपणे उठली. धीम्या गतीने उघड्या दाराकडे जाऊ लागली. ''राजी... राजश्री... बेटा राजी...'' अशी आर्त साद उमाबाईंनी घातली; पण तोपर्यंत राजश्री दृष्टीआड गेली होती, दिसेनाशी झाली होती.

'आम्हाला नात नको, नातू हवाय. मुलगी नको, मुलगा हवाय. घराण्याला वारस हवाय. मुलीचं लग्न झालं की ती माहेराला मुकली. सासरच्या घरातून ती तिरडीवरूनच बाहेर पडायची. कुठेही जा. नदी, नाले, विहिरी तुला पोटात घेतील. या घरात तुला स्थान नाही.' ही सगळी वाक्यं चालता चालता राजश्रीच्या डोक्यात पिंगा घालत होती. ती कुठे चालली होती ते तिलाच कळत नव्हते. नदी, नाले, विहिरी...

नाही जाणार मी नदी, नाले, विहिरीवर... नाही देणार मी जीव... नाही करणार मी आत्महत्या... का म्हणून मी मरायचं.. का म्हणून माझ्या उदरात अंकुरलेल्या या बाळाच्या जिवावर उठायचं... मुलगी असली म्हणून काय झालं... अरे मूर्खांनो - जगन्माता आहे ती... जन्म देणाऱ्या आईच्या जिवावर उठला आहात तुम्ही... पण मी नाही असं करणार. मी असं केलं तर तो

त्या नराधमांचा विजय होईल. मुलींचे बळी घेण्याची त्यांना चटक लागेल. हे लांडगे, कोल्हे मुलींच्या रक्ताला सोकावतील... नाही घेणार मी हिचा जीव... मी हिला जन्म देईन... हिच्यावर जीव लावीन... हिच्यासाठी हाडाची काडं करीन... शिकविन... मोठी करीन... खूप मोठी करीन... विचारांच्या त्या गदारोळात तिला भोवळ आली. सावरायचा प्रयत्न करीत असतानाच ती भेलकांडून, धाड्दिशी कोसळली.

ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग मध्यरात्रीच्या त्या शांततेत गाढ झोपलेला 'निवांत' बंगला, टेलिफोनच्या या कर्कश्श आवाजाने खडबडून जागा झाला. माईसाहेबांनी झोपल्या झोपल्या हात लांब करून रीसिव्हर उचलला. ''हॅलो... कोण बोलतंय?''

''मी गुरुजी बोलतोय.''

''गुरुजी, अहो मध्यरात्र झाली. ही काय वेळ आहे का फोन करायची?'' माईसाहेबांनी चिडून विचारले.

''अंऽ अंऽऽ माईसाहेब, राजश्री आलीय का तिकडे?'' गुरुजींनी चाचरत विचारले.

''ती कशाला येईल मरायला इकडे?'' माईसाहेब तिरसटपणे बोलल्या.

''नाही हो! इथून ती निघून गेली म्हणून विचारलं,'' गुरुजी म्हणाले.

''गेली तर येईल परत,'' माईसाहेब त्रासून म्हणाल्या.

''नाही हो! आम्ही पण खूप बोललो तिला. फार मानी आहे मुलगी. नाही येणार परत,'' गुरुजी हताशपणे म्हणाले.

''मग तुमची ती मानी मुलगी, गेली असेल कुठे तरी मानाने जीव द्यायला. झोपा तुम्ही. आणि पुन्हा आमची झोपमोड करू नका. नसता वैताग मेला,'' असं म्हणून माईसाहेबांनी खाडकन् फोन आदळला.

''काय म्हणाल्या माईसाहेब?'' उमाबाईंनी अधीरतेने विचारले.

''तिकडे नाही गेली ती,'' गुरुजी निराशेने म्हणाले.

''अगं बाई! मग गेली कुठे ही पोर एवढ्या रात्री?'' उमाबाई छाती दडपून म्हणाल्या.

''याचा विचार तिला इतकं तोडून बोलण्यापूर्वी करायचा होता,'' गुरुजी तणतणले. ''काय तर म्हणे सासरहून मुलीची तिरडीच...'' घशात

अडकलेल्या आवंढ्यामुळे गुरुजी वाक्य पुरे करू शकले नाहीत.

''आणि तुम्ही काय कमी बोललात? नदी, नाले, विहिरी... बाई गं, पोर तिकडंच तर... अहो.. तू तू मी मी काय करत बसलात इथ? उठा आणि पोरीला शोधून आणा आधी,'' उमाबाई घाबरून म्हणाल्या. गुरुजी पण लगबगीने उठले. कसातरी शर्ट गळ्यात अडकवला आणि कोपऱ्यातल्या चपला पायात सरकवून घाईने घराबाहेर पडले.

'जागतिक मेडिकल कौन्सिल'च्या खास निमंत्रणावरून, 'वैद्यकीय व्यवसाय आणि स्त्री भ्रूणहत्या' या विषयावरच्या परिसंवादात भाग घेण्यासाठी, डॉ. स्वामी नागपूरहून पुण्याला आले होते. ''हत्या हे पाप आहे. भ्रूणहत्या हे महापाप आहे आणि स्त्री भ्रूणहत्या हे घोर पाप आहे,'' असे जोरकस प्रतिपादन आपल्या भाषणात करून त्यांनी परिषद जिंकली होती. ''केवळ पैशासाठी हे काम करणारे डॉक्टर्स तर वैद्यकीय व्यवसायालाच नाही तर मानवतेला कलंक आहेत. मी त्यांचा जाहीर धिक्कार करतो,'' असं त्यांनी म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला होता.

डॉ. स्वामींचे हे बोलणे केवळ टाळ्यांसाठी नव्हते, तर या क्षेत्रात ते भरीव कार्य करीत होते. अशा नाडलेल्या आणि नाकारलेल्या स्त्रियांसाठी त्यांनी नागपूरला एक आश्रम चालवला होता. अनेक अनाथ आणि निराधार स्त्रियांना त्यांनी या आश्रमात आधार दिला होता. गरजवंत स्त्रियांना आधार देणाऱ्या या आश्रमाचे नावसुद्धा त्यांनी 'आधार' असेच ठेवले होते. या आश्रमात ते स्त्रियांना केवळ आधारच देत नव्हते, तर त्यांना आणि त्यांच्या मुलामुलींना उत्तम शिक्षण देऊन, स्वत:च्या पायावर उभे करण्याचे कार्य करीत होते.

परिषद संपवून, नागपूरची गाडी पकडण्यासाठी ते रेल्वे स्टेशनकडे चालले होते. वास्तविक पाहता, आयोजकांनी त्यांची विमान प्रवासाची सोय केली होती. पण गरज नसताना, आयोजकांना अनावश्यक खर्चात पाडणे त्यांच्या तत्त्वात बसत नव्हते.

स्टेशनमध्ये शिरताना, अचानक एक मुलगी भेलकांडून खाली पडताना, त्यांना दिसली. आपल्या साहाय्यकासह ते त्वरेने तिकडे धावले. साहाय्यकाने

अॅटॅचीमधून एक पाण्याची बाटली काढली आणि डॉक्टरांकडे दिली. डॉक्टरांनी बाटलीतले पाणी तिच्या चेहेऱ्यावर शिंपडले. तिने डोळे उघडताच तिला बाजूच्या भिंतीला टेकून बसवले आणि प्यायला पाणी पुढे केले. ती काहीतरी बोलणार इतक्यात ते म्हणाले, ''अहं, बोलू नकोस. आधी पाणी पी.'' ती पाणी पीत असतानाच, साहाय्यकाला बाजूच्या टपरीवरून चहा आणण्यास सांगितले. तिचे पाणी पिऊन होईपर्यंत साहाय्यक चहा घेऊन आला. पुन्हा ती काही बोलणार इतक्यात ते म्हणाले, ''आधी तू चहा घे. मग बोलूया आपण.'' तिने हळूहळू चहा पिऊन संपवला. गरम गरम चहा पोटात गेल्यावर तिला बरे वाटले.

''नाव काय तुझं?'' ती स्थिर झाल्यावर डॉक्टरांनी विचारले.

''राजश्री रामचंद्र भिडे.''

''इतक्या मध्यरात्री एकटी कुठे निघालीस?''

डॉक्टरांच्या या प्रश्नाने मात्र राजश्रीचा बांध फुटला. रडत रडत ती उठू लागली.

''कितवा महिना?'' डॉक्टरांनी अचानक विचारले.

ती चपापली, ''तुम्हाला कसं...''

तिचे वाक्य अर्धवट तोडीत साहाय्यक म्हणाला, ''हे डॉक्टर स्वामी. एक निष्णात स्त्री-रोग तज्ज्ञ आहेत. नागपूरला त्यांचे एक मोठे हॉस्पिटल आहे. एक महिला आश्रम पण आहे. मी त्यांचा साहाय्यक डॉक्टर गुप्ता. तेव्हा तुम्ही तुमची हकिगत त्यांना निश्चिंतपणे सांगा.'' डॉक्टर स्वामी. सकाळीच हे नाव कुठेतरी वाचल्याचे तिला आठवले. ती निश्चिंत झाली. तिने आपली सगळी हकिगत त्यांना सविस्तर सांगितली. डॉक्टरांनी ती शांतपणे ऐकून घेतली आणि म्हणाले,

''मग? आता काय जीव द्यायला निघाली होतीस?''

''नाही. मला माझ्या उदरात वाढत असलेल्या जीवाला जन्म द्यायचाय, वाढवायचंय, मोठं करायचंय,'' ती निर्धारपूर्वक म्हणाली.

''गुड कॉन्फिडन्स! ब्रेव्ह गर्ल! माझ्या बरोबर नागपूरला येणार?'' डॉक्टरांनी अचानक विचारले.

राजश्री विचार करू लागली. सासरी किंवा माहेरी परत जायचे नाही

हा तर तिचा ठाम निर्धार होता. तिला कुठे तरी आश्रय हवाच होता. नशिबाने तो योग्य आणि चांगल्या ठिकाणी मिळत होता. नकार देण्याचे काही कारणच नव्हते.

''फार उपकार...''

''अहं'' तिचे बोलणे अर्धवट तोडीत डॉक्टर म्हणाले. ''उपकाराची भाषा बोलायची नाही. तू आता माझ्या आश्रमात येणार म्हणजे माझी मुलगीच झालीस. मुलीने वडिलांचे उपकार मानायचे नसतात. चल. झालं गेलं गंगेला मिळालं असं समज आणि आजपासून नवीन आयुष्याला सुरुवात कर. नवीन आयुष्यासाठी तुझं नाव पण आपण नवीन ठेवू, 'राजलक्ष्मी' - आवडलं?''

''छान आहे!'' प्रसन्नपणे नवीन आयुष्य आणि नवीन नाव राजश्रीने स्वीकारले. 'राजलक्ष्मी' छान आहे. नवीन नावाची मनातल्या मनात तिने पुन्हा उजळणी केली.

'राजलक्ष्मी, ती बघ, पूर्वदिशेने येणारी नव्या दिवसाची, रोज नव्याने येणाऱ्या सूर्याची, नवी किरणं, गुलाबी रंगाची उधळण करीत, नव्या आयुष्यात तुझं स्वागत करीत आहेत, चल!'' असं म्हणून त्यांनी आपल्या हाताचा आधार देऊन तिला उठवले आणि स्टेशनमध्ये शिरले. नागपूर गाडी लागलेलीच होती.

गुरुजींनी राजश्रीची खूप शोधाशोध केली. सर्व नातेवाईक, मित्रमंडळी, तिच्या मैत्रिणी - अगदी नागपूरला राहणाऱ्या तिच्या आतेभावाकडे सुद्धा चौकशी केली. शेवटी पोलिसात तक्रार नोंदवली. त्यांच्याबरोबर सगळी हॉस्पिटल्स, दवाखाने, शवागरंदेखील पालथी घातली; पण राजश्रीचा कुठेच पत्ता लागला नाही.

आबासाहेबांकडे पण पुन्हा पुन्हा फोन लावण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचा आवाज ऐकताच पलीकडून फोन कट होऊ लागला. भावनेच्या भरात तिने कुठेतरी जाऊन आत्महत्या केली असावी, असा ठाम समज त्यांनी करून घेतला. आपल्या हाताने आपण आपली सोन्यासारखी पोरगी गमावून बसलो, याचा दोघांनाही खूप खूप पश्चात्ताप झाला. पण आता काय उपयोग? गाडी स्टेशनातून कधीच निघून गेली होती.

गाडी पुणे स्टेशनात शिरली आणि स्वागतासाठी हातात हार घेऊन उभी असलेली मंडळी, लगबगीने इच्छित डब्याकडे सरसावली.

'विजया राजलक्ष्मी झिंदाबाद... विजया राजलक्ष्मी झिंदाबाद!' अशा घोषणा करीत लोक त्या डब्याकडे झेपावले. त्यांना आवर घालणे पोलिसांना फारच कठीण जात होते. तो जमाव बघून आणि घोषणा ऐकून राजलक्ष्मी भरून पावली. आपल्या मुलीचा, विजयाचा तिला सार्थ अभिमान वाटला. विजयाने, वडिलांच्या जागी तिचेच नाव लावल्यामुळे 'विजया राजलक्ष्मी' अशा नावाने पण ती आपल्या मुलीशी एकरूप झाली होती. राजलक्ष्मी... राजलक्ष्मी... असा विजयाच्या नावाबरोबरच तिच्या नावाचा होणारा जयघोष ऐकून तिला भरून आले. पंचवीस वर्षापूर्वी कोणत्या अवस्थेत तिने हे पुणे सोडले होते आणि कोणत्या अवस्थेत ती पुन्हा पुण्यात पाऊल ठेवीत होती....

होय! तब्बल पंचवीस वर्षांनी राजश्री पुन्हा पुण्यात येत होती. त्या वेळी पोटात असलेल्या विजयाचे प्राण वाचविण्यासाठी, ती दिशाहीन वाट चालत असताना, नियतीने तिची डॉक्टर स्वामींशी गाठ घालून दिली. त्यांच्याच 'आधार' आश्रमात तिला आश्रय मिळाला. आश्रमात पडतील ती कामे आपुलकीने आणि प्रेमाने करून, तिने सर्वांची मने जिंकून घेतलीच; शिवाय आपल्या सुशील आणि विनयशील वागणुकीने ती आश्रमाची लाडकी राजीताई झाली. आश्रमात तिने विजयाला जन्म दिला. लहानपणापासून आश्रमाने आणि डॉक्टर स्वामींनी, विजयावर खूप जीव लावला. आपल्या हसऱ्या आणि गोड स्वभावाने विजया संपूर्ण आश्रमाची लाडकी नात झाली होती.

आश्रमात विजयाला उत्तम संस्कार आणि शिक्षण मिळाले. जात्याच हुशार असल्याने शाळा-कॉलेजात ती नेहमीच पहिल्या पाचात राहिली. दहावीला ती बोर्डात चौथी तर बारावीला पहिली आली होती. खेळात पण ती प्रवीण होती. रनिंग आणि बॅडमिंटन या खेळात तिने मिळविलेल्या बक्षिसांनी आश्रमाची एक खोली भरली होती. तिचे हे अंगभूत खेळ, गुण पाहून डॉक्टरांनी खास प्रशिक्षक नेमून तिची तयारी करून घेतली होती. मेडिकल कॉलेजात तर ती खेळात आणि अभ्यासात सुद्धा गोल्ड मेडल

विजेती होती. अशी सगळी हुशारी आणि प्राविण्य ईश्वराने तिला भरभरून दिले होते. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरचे अनेक पुरस्कार आणि मानसन्मान तिला प्राप्त झाले होते.

आणि आज तर तिने राज्याच्या आणि देशाच्या मुकुटात तिहेरी शिरपेच खोवला होता. ऑलिम्पिक स्पर्धेतून ती बॅडमिंटनमधली एकेरी आणि दुहेरी सामन्यातली दोन सुवर्णपदके आणि आठशे मीटर रनिंगचे एक सुवर्णपदक, अशी तीन सुवर्ण पदके घेऊन आली होती. नागपूरला जाता जाता दिल्ली आणि मुंबईचे सत्कार स्वीकारून आज ती पुण्यात आली होती. पुण्यातल्या आजच्या सत्काराची दोन खास वैशिष्ट्ये म्हणजे आजच्या समारंभाला खुद्द राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील उपस्थित राहणार होत्या आणि सत्कार समारंभ सुप्रसिद्ध उद्योगपती आबासाहेब गोगटे यांनी आयोजित आणि प्रायोजित केला होता. हा विलक्षण योगायोग पाहून नियती एका बाजूला उभी राहून खदखदा हसत होती. कारण याच आबासाहेबांचा, त्यांच्या चौथ्या सुनेपासून झालेला नातू, उडाणटप्पू आणि नालायक निपजला होता.

माळाफुलांनी आणि रंगीबेरंगी आकर्षक कमानींनी सुशोभित केलेला, पुण्याच्या बालेवाडी स्टेडियमचा परिसर माणसांनी फुलून गेला होता, 'विजया राजलक्ष्मी झिंदाबाद' अशा घोषणांनी दुमदुमून गेला होता. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील पुण्याच्याच असल्याने खास या समारंभासाठी हजर राहिल्या होत्या.

बॅडमिंटन आणि रनिंग रेस स्पर्धेत ऑलिम्पिकमधून तीन सुवर्णपदके जिंकून सबंध विश्वात आपल्या देशाचा झेंडा फडकवणारी 'वीर भारतकन्या' असा त्यांनी विजयाचा गौरव केला होता.

राष्ट्रपतींच्या बाजूलाच बसलेले, आयोजक आणि प्रायोजक, उद्योगपती आबासाहेब गोगटे यांनी जेव्हा विजयाचे गुणगान गाऊन, तिच्या सत्काराची घोषणा केली तेव्हा विजयाने आपले मनोगत व्यक्त करण्याची इच्छा प्रकट केली आणि स्टेडियमवर जाऊन ती बोलू लागली.

''राष्ट्रपती महोदया आणि सन्माननीय व्यासपीठ, एकाच वेळी एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत, तीन सुवर्णपदके जिंकल्याबद्दल माझे अनेक सत्कार झाले आणि होतील. पण पुण्यातल्या या सत्काराचे मला विशेष महत्त्व आहे. कारण मुळची मी पुण्यातली. माझी आई राजलक्ष्मी पुण्यातली.''

हे ऐकताच जमावात एकच कुजबूज सुरू झाली. पुणेकरांची मने अभिमानाने आणि आनंदाने उचंबळून आली. व्यासपीठावर बसलेल्या आबासाहेबांनी सुद्धा नकळत आपली कॉलर जरा सावरली.

''अरे वाऽ! पुण्याची म्हणे ही,'' प्रेक्षकातला कुणीतरी म्हणाला.

''पण कुणाची कोण? आणि आपल्याला कसं माहीत नाही?'' दुसरी कुजबूज.

''आम्ही तर ही बॉर्न अंड ब्रॉट अप नागपूरची, असं ऐकून आहोत,'' कुणीतरी तिसरा.

''अरेच्या! आत्ता आठवलं!! आमच्या शेजारच्या, भालकरांच्या वाड्यात राहायची, आमच्याकडे रोज आमच्या चिमीशी सागरगोटे खेळायला यायची.'' तेवढ्यात कुणीतरी फुशारकी मारून घेतली. विजयाचे भाषण सुरूच होते.

''माझी आई राजलक्ष्मी पुण्याचीच. अतिशय कठीण परिस्थितीत माझ्या आईने मला जन्म दिला; वाढवले, शिकवले, चांगले संस्कार दिले. माझ्या या आजच्या यशाचे खरे श्रेय माझ्या आईचेच आहे. आणि म्हणून उद्योगपती आबासाहेब यांनी केलेला हा सत्कार, प्रेक्षकात बसलेल्या माझ्या आईने स्वीकारावा अशी माझी तिला प्रार्थना आहे.''

विजयाने हे वाक्य उच्चारले मात्र, स्टेडियम टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेला. कित्येकांचे डोळे पाणावले. इतके प्रचंड मोठे यश मिळविणाऱ्या या मुलीच्या ठायी अशी मातृभक्ती असावी, याचे सर्वांना कौतुक वाटले. आबासाहेबांनी सुद्धा मनोमन कौतुकाची आणि शाबासकीची थाप तिच्या पाठीवर मारली. प्रेक्षकात बसलेली राजलक्ष्मी जागची उठेना. तेव्हा डॉक्टर स्वामींनी बळेबळेच तिला उठवले आणि व्यासपीठाकडे नेऊ लागले. अशी ती व्यासपीठाकडे जात असताना सतत टाळ्यांचा कडकडाट सुरू होता.

राजलक्ष्मीला व्यासपीठाकडे येताना बघताच, आबासाहेबांनी आणि माईसाहेबांनी तिला ओळखले. अरे, ही तर आपल्या भिडे गुरुजींची राजश्री! केवढा मोठा सन्मान आज तिला मिळतोय. आणि तोसुद्धा तिच्या मुलीमुळे, जिला आपण गर्भातच...

‘‘‘क्षमा, क्षमा कर आम्हाला राजश्री, क्षमा कर!’’ राजश्री व्यासपीठावर चढताच, सगळी जनलज्जा, भीड, प्रतिष्ठा आणि प्रसंग विसरून, आबासाहेब राजलक्ष्मीच्या अर्थात राजश्रीच्या पायावर हात जोडून कोसळले. हे काय चालले आहे ते लोकांना काहीच कळेना. खुद्द राष्ट्रपती अवाक् झाल्या. स्वत:ला सावरून, आबासाहेब पोडियमवर गेले आणि माईकवर बोलू लागले :

*‘‘लोकहो, तुम्हा सर्वासमक्ष आणि राष्ट्रपतींच्या अर्थात संपूर्ण देशाच्या साक्षीने, मी आज विजया आणि राजलक्ष्मी या मायलेकींची जाहीर क्षमा मागतो, माफी मागतो. मला स्वत:ला माझी लाज वाटतेय! कसला प्रतिष्ठित आणि कसला उद्योगपती मी? मी एक भणंग आणि या देशात जगायला नालायक नागरिक आहे, अशी मी स्वत:ची जाहीर निर्भत्सना करतो. सबंध देशाची मान आणि शान उंचावणाऱ्या या मुलीचा मी आजोबा आहे, हे सांगताना आज माझी मान लाजेने आणि शरमेने खाली जात आहे.’’*

हे ऐकले मात्र, सबंध स्टेडियम, काही न कळून, स्तब्धतेने आणि आश्चर्याने बघतच राहिले. आबासाहेब पुढे जे बोलले ते ऐकून मात्र, स्टेडियमने डोळे विस्फारले.

‘‘ज्या मुलीने इतका मोठा पराक्रम करून, ‘भारतकन्या’ हा मानाचा राष्ट्रीय किताब मिळवला, त्याच मुलीला, केवळ मुलगी म्हणून, गर्भात असतानाच मी ठार करायला निघालो होतो. का तर घराण्याला वारस हवा म्हणून, घराण्याचा नावलौकिक व्हावा म्हणून! मला नातू हवा होता. आणि म्हणूनच या मुलीला गर्भातच ठार करण्याचे घोर पाप करायला मी निघालो होतो. राजश्रीने, माझ्या सुनेने, त्या तीन महिन्याच्या गर्भाला माझ्यापासून दूर पळवून नेले आणि आज पंचवीस वर्षांनी नुसते घराण्याचेच नाही तर देशाचे, राष्ट्राचे भूषण बनवून, माझ्या समोर उभे केले आहे. धन्य ती कन्या आणि धन्य तिला जन्म देणारी ती आई !!

‘‘मुलगा पाहिजे, मुलगी नको, या भावनेने मी अंध झालो होतो. इथे उपस्थित असलेल्या आपल्या राष्ट्रपती एक स्त्री आहेत. या देशाच्या पंतप्रधान एक स्त्री होत्या. इतकेच काय पण मला जन्म देणारी माझी आईसुद्धा एक स्त्रीच होती, याचेसुद्धा मी भान ठेवले नाही. नका, मायबापहो, माझ्यासारखा

मूर्खपणा, नीचपणा तुम्ही करू नका. आई, बहीण, पत्नी, अशा कितीतरी रूपांनी स्त्रियांनी हे जग तारलंय, सुखी केलंय. स्त्री विना पुरुषच नाही तर सारं जग अपूर्ण आहे. हत्या हे पाप आहे. भ्रूणहत्या हे घोर पाप आहे, तर स्त्री भ्रूणहत्या हे महापाप आहे, याची सतत जाणीव ठेवा.

''योगायोगाने आज राष्ट्रपती येथे हजर आहेत. त्यांना मी नम्र प्रार्थना करतो की स्त्री भ्रूणहत्या करणाऱ्या माझ्यासारख्या नराधमांना दयाक्षमा तर देऊ नकाच; पण विनाविलंब फासावर लटकवावा असा कायदा करा आणि त्या कायद्याचा पहिला बळी मलाच ठरवा,'' असं म्हणून ते राष्ट्रपतींसमोर जाऊन, हात जोडून उभे राहिले.

''थांबा, आम्ही पण या गुन्ह्यातले त्यांचे भागीदार आहोत. आम्हाला पण तीच शिक्षा मिळायला हवी,'' असं म्हणत माईसाहेब आणि राजेश व्यासपीठाकडे धावले.

सोसायटीने केलेल्या भाड्याच्या ट्रकमधून हा सोहळा बघायला आलेले गुरुजी आणि उमाबाई दूर कुठे तरी प्रेक्षकात बसले होते. आबासाहेबांचे भाषण ऐकून त्यांना पण खऱ्या प्रकाराची कल्पना आली. तेसुद्धा व्यासपीठाकडे धावले. पोलीस बंदोबस्त धुडकावून ते व्यासपीठावर चढले आणि माईक ताब्यात घेऊन गुरुजी बोलले...

''आम्हीसुद्धा या मुलीचे करंटे आजी-आजोबा आहोत. सासरचा छळ न सोसून आमची मुलगी माहेरी आश्रयाला आली होती; पण आम्ही रूढी-परंपरांची कारणे देऊन तिला धुत्कारले. लोकहो, ध्यानात ठेवा. लग्न झाले की मुलगी माहेराला मेली. सासरच्या घरातून ती ताटीवरूनच बाहेर पडणार, ही समजूत आणि परंपरा खोटी आहे. लग्न झाल्यावर सुद्धा माहेर हे तिचेच घर असते. त्या घरी मुलाइतकाच तिचाही हक्क असतो. मुलीला माहेर नाकारून, अप्रत्यक्षपणे आम्हीसुद्धा या गुन्ह्यात सामील आहोत. म्हणून आम्हालाही तीच शिक्षा व्हायला हवी,'' असं म्हणून गुरुजी आणि उमाबाई माईसाहेबांच्या रांगेत जाऊन उभे राहिले.

प्रतिष्ठितांच्या राखीव रांगेतून, एक माणूस धावत व्यासपीठाकडे जाऊ लागला. पोलिसांनी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना न जुमानता, ''मला सोडा. माझं नाव डॉक्टर पुरंदरे; पण मी डॉक्टर नाही तर

कसाई आहे. या मुलीचा जीव मीच घेणार होतो; खरा गुन्हेगार मी आहे,'' असं ओरडत, पोलिसांचे कडे तोडून ते व्यासपीठावर चढले आणि गुरुजींच्या रांगेत जाऊन उभे राहिले.

राष्ट्रपती बोलण्यासाठी माईकसमोर आल्या. त्यांना ऐकण्यासाठी लोकांचे जीव कानात गोळा झाले. आपल्या धीरगंभीर पण खड्या आवाजात राष्ट्रपती बोलू लागल्या :

*''लोकहो, 'स्त्री' भ्रूणहत्या विरोधात सरकारने कायदा केला आहेच. त्याबद्दल सरकार जागरूक आहे; त्याबाबत प्रचार आणि प्रसार माध्यमांतून सातत्याने लोकशिक्षण करीत आहे. तरीसुद्धा काही अशिक्षित, अडाणी आणि स्वार्थी मंडळी रूढी-परंपरा, वारस, घराण्याचा नावलौकिक, वंशाचा दिवा, असल्या भोंगळ आणि भंपक कल्पनांच्या आहारी जाऊन स्त्री भ्रूणहत्या करीत आहेत. काही नादान डॉक्टरमंडळी पैशासाठी या कृष्णकृत्याला मदत करीत आहेत. अशा डॉक्टरांचा मी देशाच्या वतीने जाहीर धिक्कार करीत आहे.*

*''स्त्री भ्रूणहत्येविरुद्ध, कायदेशीर उपाययोजना सरकारमार्फत सुरू असल्या तरी लोकांनी स्वत: होऊन 'मुलगा-मुलगी' हे भेद समाजातून काढून टाकायला हवेत. खोट्या-जुन्या रूढी, परंपरा, खोटे समज गाडून टाकायला हवेत. परमेश्वराने जे ताटात वाढून दिले आहे ते गोड मानून घ्यायला शिकायला हवे. खेदाची बाब ही आहे की गर्भ मुलाचा की मुलीचा, हा काना-वेलांटीचा फरक सर्वस्वी पुरुषावर अवलंबून असतो, हे आता शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाले आहे; पण दोष मात्र आपण स्त्रीलाच देतो. तेव्हा अशा अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन आपण उद्याचा भारत घडवू या. जय हिंद !!''*

राष्ट्रपतींनी आपले भाषण संपवले आणि बँडवर जन-गण-मनची धुन वाजायला लागली.

# आनंद

"वा ! अपर्णावहिनी, भजी एकदम मस्त झालीत. आमच्याकडे अशी कधीच होत नाहीत बघा!" असं शेखरनं म्हणताच अपर्णावहिनी भलत्याच सुखावल्या. पण तिथंच उभी असलेली शेखरची पत्नी शीला मात्र फणकारून आणि डोळे वटारून शेखरवर एकदम फिस्कारली, "काय? काय म्हणालात? पुन्हा एकदा बोला पाहू?" आणि हे ऐकताच स्वत:च्या बायकोबद्दल, इतर बायकांसमोर असं बोलण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल शेखरने मनातल्या मनात स्वत:लाच शिव्या घातल्या आणि सावरून घेण्यासाठी पटकन म्हणाला, "नाही, म्हणजे मला असं म्हणायचं होतं की... आपल्या डाव्या हाताची तर्जनी त्याच्या नाकासमोर नाचवीत त्याच चढ्या आवाजात शेखरची बंद झालेली बोलती पुढे सुरू करण्यासाठी शीला म्हणाली, "तेच... तेच विचारतेय मी! काय म्हणायचं होतं तुम्हाला?" हे ऐकून शेखरने चाचरतच आपले म्हणणे पुढे रेटले, "म्हणजे हेच गं की, तशी भजी तू पण छानच करतेस गं... म्हणजे कांद्याची, बटाट्याची, गळक्याची वगैरे... पण वांग्याची भजी आपल्याकडे कधी होतच नाहीत ना... म्हणून..."

"मग बोलायचंत कधी तरी मला की तुम्हाला वांग्याची भजी खायचे डोहाळे लागलेत म्हणून," शीला पुन्हा शेखरवर फिस्कारली.

प्रकरण जास्त वाढायला नको म्हणून यजमानपदाचं कर्तव्य समजून श्रीकांतनं हस्तक्षेप केला आणि म्हणाला, "हे बघ शेखर आणि शीला, आपण आपल्या बंगल्यात माझ्या प्रमोशनची पार्टी एंजॉय करण्यासाठी

जमलोय, सो नो भांडण... काय अय्यरसाहेब?'' तोंडात एकदम दोन गुलाबजाम कोंबलेला अय्यर श्रीकांतच्या बोलण्याची री ओढण्यासाठी लगबगीने पुढे सरकत असतानाच टेबलाखाली खेळत असलेल्या दोन लहान मुलांपैकी एकजण झटकन अचानक बाहेर आला आणि त्याला अडखळून अय्यर पुढच्या टेबलावर झेपावला आणि त्याचा हात लोणच्याच्या बरणीवर पडून सगळे लोणचे त्याच्या पांढऱ्याशुभ्र लुंगीवर सांडले आणि ती लालेलाल झाली.

''अय्यो! वाट्टूळ केलं की वो माज्या लुंगीचं! जीवन, तुझंचकी हे पोरगं... काय...''

''उत्तम!'' असं अय्यरच्या मागेच उभा असलेला जीवन म्हणाला.

''अरे उत्तम काय म्हणतं... अं... उत्तम काय म्हणतं? माझं लुंगीचं लोणचं झालं आणि तू उत्तम म्हणतं?... आं...'' अय्यर पटकन मागे वळून जीवनवर किंचाळलाच. ''सॉरी मिस्टर अय्यर. तुमची लुंगी खराब झाली, त्याला मी उत्तम नाही म्हणालो. मी माझ्या मुलावर ओरडलो. त्याचं नाव उत्तम...'' जीवनच्या खुलाशावर अय्यर पुन्हा त्याच स्वरात किंचाळला, ''उत्तम नायरे, खराब, वाईट असं नाव ठिवायचं होतं की रे! त्यानं माझं सगळं लुंगी खराब, वाईट्ट करून टाकलं बघ.''

''सॉरी... व्हेरी सॉरी मि. अय्यर,'' जीवनने पुन्हा माफी मागितली.

''आता सॉरी म्हणून काय उपयोग? मी आधीच सांगत होते, याला बरोबर नको घेऊया म्हणून... पण तुमचाच हट्ट त्याला बरोबर आणायचा,'' जीवनची पत्नी जानकी फणकारली. आता हे दुसरं भांडण उद्भवायला नको म्हणून परत एकदा यजमान श्रीकांतने हस्तक्षेप केला.

''असू द्या हो जानकी वहिनी - आणलं बरोबर तर काय झालं?''

''बघितलंत ना तुम्ही काय झालं ते? पार्टीचा विचका केला कार्ट्यानं,'' जानकी पुन्हा सणसणली.

''अगं काय बोलतेस तू हे जानकी, मुलं नाहीत तर पार्टीत मजा कसली?'' असं म्हणून श्रीकांतची पत्नी, अपर्णाने बावरलेल्या उत्तमला प्रेमानं जवळ घेतलं.

''बरोबर आहे! खोड्या मुलं नाही तर काय आपण करणार?'' श्रीकांतने

अपर्णाची री ओढली.

‘‘तुमचं काय जातंवो असं बोलायला? तुमाला तर मूलच होत नाही ना?’’ आतापर्यंत शांत असलेल्या मिसेस अय्यरांनी आपली हजेरी लावली.

मिसेस अय्यरांचं हे बोलणं मात्र श्रीकांत आणि अपर्णाच्या मनाला चांगलंच टोचलं. पार्टीतली इतर मंडळी पण मिसेस अय्यरांचं हे बोलणं ऐकून एकदम स्तब्ध झाली. इतक्यात शीलाच्या मांडीवरचा प्रणव जोरजोरात रडू लागला. ‘‘घ्या! राजश्री उठले. म्हणजे माझ्या खाण्याचे झाले तीनतेरा’’ शीला शेखरकडे पाहात म्हणाली. यजमानीणपदाला जागून अपर्णा जणू काहीच झालं नाही असं भासवत शीलाला म्हणाली, ‘‘शीला, प्रणवला दे माझ्याकडे. मी त्याला गप्प करते. तुझं खाणं होऊ दे आरामात.’’

‘‘नको, असू दे माझ्याच जवळ,’’ असं म्हणून शीला थोपटायचा बहाणा करून मांडीवरच्या प्रणवला जरा घुश्श्यातच धपाटे घालू लागली. हे सगळं बघणारा शेखर थोड्या अजिजीनंच शीलाला म्हणाला, ‘‘अगं असं काय करतेस? देना प्रणवला अपर्णा वहिनींकडे. तुला आरामात खाता येईल. तोपर्यंत अपर्णावहिनी सांभाळतील त्याला.’’

‘‘नको. असू देत माझ्याच जवळ,’’ शीला निकरानं म्हणाली.

‘‘अगं हा कसला हट्ट तुझा? अपर्णावहिनी नीट सांभाळतील त्याला,’’ शीलावर थोडंसं कातावूनच शेखर बोलला.

‘‘ती काय खाक सांभाळणार? लग्न होऊन तब्बल दहा वर्षे झालीत तरी अजून कूस कोरडीच. मुलं सांभाळण्याचा अनुभव फक्त एका आईलाच असू शकतो!’’

हा घाव मात्र अपर्णा सहन करू शकली नाही. तिचे डोळे भरून आले. घायाळ मनाने ती आत निघून गेली. सगळी पार्टी पुन्हा एकदा स्तब्ध झाली. कुणीच काही बोलेना. शेवटी या शांततेचा भंग करीत शेखरच शीलाला म्हणाला, ‘‘शीला, तू अपर्णावहिनींना असं बोलायला नको होतंस,’’ असं म्हणून तो श्रीकांतजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ‘‘सॉरी. श्रीकांत व्हेरी सॉरी’’ पण यावर काहीच न बोलता श्रीकांत गुपचूप आत निघून गेला.

श्रीकांत ऑफिसचे काम करण्यात इतका गढला होता की शेखर कधी

येऊन समोर बसला हे त्याला कळलेच नाही. काहीतरी आठवून शिपायाला बोलवायला म्हणून त्याने मान वर केली तर समोर शेखर! ‘‘अरे, तू केव्हा आलास?’’ पण त्याच्या ह्या प्रश्नाला उत्तर न देता शेखर एकदम अजिजीनं म्हणाला, ‘‘सॉरी... श्रीकांत आय ॲम व्हेरी सॉरी... रिअली सॉरी...’’ असं म्हणत श्रीकांतसमोर शेखरने खरोखरच हात जोडले.

‘‘छोडो यार! तू एवढं सीरियस का होतोस? आणि काय खोटं बोलली शीला? आई झाल्याशिवाय मुलं सांभाळण्याचा अनुभव नसतोच कुणाला,’’ श्रीकांतने शेखरला चुचकारले.

‘‘श्रीकांत, मला एक गोष्ट सांगायचीय तुला!’’

‘‘मग बोलना...’’

‘‘इथं नको - संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर कँटीनमध्ये भेटू नक्की,’’ असं म्हणून शेखर केबिनचं दार उघडून निघून गेला. श्रीकांत त्या दिशेने बघतच राहिला.

दोघेही ऑफिसर्स मेसमध्ये गरम-गरम वाफाळलेला चहा पीत बसले होते. ‘‘हं... बोल शेखर... काय सांगायचं होतं तुला?’’ घोट घेत घेत श्रीकांतनं विचारलं.

‘‘श्रीकांत, म्हणजे तू वाईट वाटून घेणार नसलास तर एक गोष्ट विचारू?’’ शेखर म्हणाला.

‘‘नो घडाभर तेल फॉर नमन. कम टू दि पॉइंट,’’ श्रीकांतने हसतच त्याला बढावा दिला.

‘‘श्रीकांत, मुलासाठी तू अपर्णा वहिनींची डॉक्टरी तपासणी का करून घेत नाहीस?’’ शेखरने सरळ प्रश्न केला.

‘‘का? अपर्णाचीच का? माझी का नाही? दोष माझ्यातही असू शकतो,’’ श्रीकांत म्हणाला.

‘‘तेच म्हणतोय मी. तुम्ही दोघंही तपासणी का करून घेत नाही? सॉरी... म्हणजे तू वाईट वाटून घेणार नसशील तर...’’

‘‘अरे वाईट काय वाटायचं त्यात? आम्ही दोघांनीही आधीच तपासणी करून घेतलीय. आम्हा दोघांतही दोष नाही. पण ईश्वराचीच इच्छा नाही, त्याला आपण काय करणार? एनी वे... माझ्याबद्दल इतकी आस्था

दाखवलीस त्याबद्दल...''

''नो... नो थँक्स बिझिनेस अ‍ॅट ऑल... अरे मैत्रीत कसले आभार,'' असं म्हणत शेखरने संपलेल्या चहाचा मग खाली ठेवला आणि काहीतरी सुचून एकदम म्हणाला, ''यार श्रीकांत, तुम्ही असं का नाही करीत? मला वाटतं तुम्ही एक छोटंसं बाळ दत्तक घ्यावं.''

''काय? मी दुसऱ्याचं मूल दत्तक घेऊ?'' श्रीकांत चमकून म्हणाला.

''काय हरकत आहे? एखाद्या अनाथ बाळाला दत्तक घेतलंस तर त्याचंही कल्याण होईल आणि तुम्हा दोघांचंही मन रमेल,'' शेखरने सुचवले.

श्रीकांतने थोडा विचार केला आणि म्हणाला, ''युवर प्रपोझल इज क्वाईट कन्सिडरेबल; पण असं बाळ मिळणार कुठे?''

''ते तू माझ्यावर सोड. गोव्यात एक अनाथ बालकाश्रम आहे. तिथं अगदी वीस दिवसांपासून चार महिन्यापर्यंतची मुलं मिळतात; पण त्या आधी तू अपर्णा वहिनींशी कन्सल्ट कर.''

''पण अपर्णा या गोष्टीला तयार होईल?'' श्रीकांत अर्धवट प्रकट आणि अर्धवट स्वत:शीच बोलला.

''नाही... नाही... नाही... या गोष्टीला मी अजिबात तयार नाही,'' अपर्णा निग्रहाने म्हणाली.

''काय हरकत आहे अपर्णा? आपल्या घरात एखाद्या छोट्याशा बाळानं खेळावं असं नाही वाटत तुला?'' श्रीकांतने समजावणीच्या सुरात विचारलं.

''वाटतं की; पण अनाथाश्रमातलं नाही,'' अपर्णा म्हणाली.

''का? अनाथाश्रमातल्या मुलात काय वाईट आहे?'' - श्रीकांत.

''सांगायचंच म्हटलं तर एक का आहे? कुणास ठाऊक त्या मुलाचे आईवडील कोण असतील, कुठल्या खानदानाचे असतील... कदाचित त्यांना खानदानच नसेल,'' अपर्णा नापसंतीनेच म्हणाली.

''हे बघ अपर्णा, लहान मूल म्हणजे परमेश्वराचं रूप असतं. त्याला ना कोणी खानदान असतं, ना धर्म, ना जात. अगं, या सगळ्या माणसानं निर्माण केलेल्या गोष्टी आहेत. ईश्वरानं निर्माण केलेला धर्म एकच - तो म्हणजे मानवता. आणि जाती दोनच. त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष. एका लहान बाळाचा या गोष्टींशी काहीही संबंध नसतो. ज्या संस्कारात ते वाढतं ते

संस्कारच त्याचा धर्म आणि जात असते. आपण जर चांगले संस्कार त्या बाळावर केले तर ते बाळसुद्धा एक चांगला सुसंस्कृत माणूस होईल,'' श्रीकांतने तिला समजावण्याचा प्रयत्न केला.

अपर्णाला श्रीकांतचे म्हणजे हळूहळू पटत होते. थोडा विचार करून ती म्हणाली, ''ठीक आहे... तू म्हणतोयस तर...''

''गलत... साफ चूक... केवळ मी म्हणतोय म्हणून होकार देऊ नकोस. हा जबरदस्तीचा मामला अजिबात नाही. मी तुझ्यापुढं एक प्रस्ताव मांडला आहे. तू त्याच्यावर समजदारीनं नीट विचार कर आणि मगच तुझा निर्णय सांग. या बाबतीत तू माझ्याशी शंभर टक्के सहमत असलीच तर आणि तरच ही गोष्ट आपण अंमलात आणणार आहोत. अदरवाइज नो! कारण मूल दत्तक घ्यायचं म्हणजे पोरखेळ नाही. ही एक मोठी जबाबदारी आहे. लाइफटाइम कमिटमेंट आहे. एका छोट्या जिवाच्या आयुष्याचा प्रश्न आहे. तेव्हा...''

''केला... श्रीकांत मी पूर्ण विचार केला. मी तुझ्याशी दोनशे टक्के सहमत आहे. बस्?'' अपर्णाने पूर्ण विचारान्ती होकार भरला.

''अपर्णा, किती समजूतदार आहेस तू. मी भाग्यवान, म्हणूनच मला तुझ्यासारखी बायको मिळाली,'' श्रीकांत अभिमानाने बोलला.

''आणि मी काय कमी भाग्यवान आहे? उगीच नाही मला तुझ्यासारखा गोड आणि प्रेमळ नवरा मिळाला'' असं म्हणून अपर्णाने आपले मस्तक श्रीकांतच्या छातीवर टेकवले.

''तुम्ही दोघंही भाग्यवान आहात, म्हणूनच तुम्ही या बाळाची निवड केलीत. फार गोड बाळ आहे.'' अपर्णाच्या हातातल्या बाळाकडे पाहात अनाथाश्रमाचे चालक दयाळजी म्हणाले.

''दयाळसाहेब, म्हणजे... तुमची हरकत नसेल तर या बाळाची पास्ट हिस्टरी तुम्ही आम्हाला सांगू शकाल?'' श्रीकांतकडे पाहात शेखरने दयाळजींना विचारले.

''अलबत! का नाही !'' दयाळजी त्वरित उद्‌गारले. एक फाइल श्रीकांतच्या पुढ्यात ठेवत ते म्हणाले, ''या फाईलमध्ये या मुलाची सगळी हकिगत नमूद आहे; पण तपशील तसा फारच कमी आहे.''

''म्हणजे?'' श्रीकांतने फाइल हातात घेत विचारले.

''म्हणजे असं की... थोडक्यात सांगतो... एक जीपगाडी पुण्याहून मुंबईला चालली होती. त्या जीपमध्ये दोन स्त्रिया, चार पुरुष, ड्रायव्हर आणि हे मूल होतं. दुर्दैवानं त्या जीपला मोठा अपघात झाला आणि ड्रायव्हरसकट सगळे जागच्या जागीच ठार झाले. जीपसुद्धा जळून खाक झाली, पण वाचलं ते फक्त हे मूल. म्हणतात ना, देव तारी त्याला कोण मारी.''

''ओह गॉड... आणि मग?'' श्रीकांतने उत्सुकतेने दयाळजींना विचारले.

''मग काय? पोलिसांनी खूपच प्रयत्न केले; पण जीपची किंवा जीपमधल्या एकाही माणसाची ओळख पटू शकली नाही. त्या अपघाताविषयी चौकशी करायला किंवा या मुलावर हक्क सांगायला पण कोणीही नातेवाईक किंवा सगेसंबंधी पुढे आले नाहीत. शेवटी पोलिसांनी त्याला या अनाथाश्रमात दाखल केले. त्या संबंधीची कागदपत्रे या फाईलमध्ये आहेत.''

ऐकून श्रीकांत खूप अस्वस्थ झाला. अपर्णाचे तर डोळेच भरून आले. 'एक्सक्यूज मी' असं म्हणून श्रीकांत अपर्णाला घेऊन एका बाजूला गेला.

''अपर्णा, आपण दुसरं एखादं मूल बघू. मला भीती वाटू लागली आहे,'' श्रीकांत अस्वस्थपणे म्हणाला.

''का? कसली भीती?'' अपर्णाने न समजून विचारले.

''नाही... या मुलाची अपशकुनी सावली आपल्या संसारावर पडली तर?'' श्रीकांतने आपली भीती व्यक्त केली.

''काय बोलतोयस तू हे श्रीकांत? अरे, तूच तर म्हणाला होतास ना... की लहान मूल परमेश्वराचं रूप असतं म्हणून... अरे, त्या ॲक्सिडंटमध्ये या बिचाऱ्या बाळाचा काय दोष? मला तर वाटतं की इतक्या मोठ्या अपघातातून देवानं या बाळाला वाचवलं ते केवळ माझ्याचसाठी. माझा तर या बाळावर फारच जीव जडलाय.'' असं म्हणून हातातल्या बाळाचा तिनं मटकन मुका घेतला.

अपर्णाचं हे बोलणं ऐकून श्रीकांत मनोमन खजील झाला आणि दोन्ही कान पकडून म्हणाला, ''सॉरी अपर्णा. आणि माझे विचार किती चुकीचे होते, हे दाखवून दिल्याबद्दल थँक्स!'' असं म्हणून दोघेही पुन्हा परत येऊन आपल्या जागेवर बसले. दयाळजी आणि शेखर त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहात होते.

''मग... या मुलाला दत्तक घेण्याचा तुमचा विचार पक्का आहे ना?'' दयाळजींनी विचारले.

''होय साहेब, दत्तक म्हणून आम्हाला हेच मूल हवं आहे,'' अपर्णा निश्चयपूर्वक म्हणाली.

''ठीक आहे; पण एक गोष्ट तुम्ही जरूर लक्षात घ्या. या अनाथाश्रमातली मुलं आम्ही कुणाही आल्या-गेल्यांना मुळीच देत नाही. मूल घेणाऱ्याचं खानदान, कौटुंबिक आणि आर्थिक स्थिती, सामाजिक स्थान, इत्यादि सगळ्या गोष्टींची तपासणी आणि पडताळणी करून आम्हाला त्याची नोंद ठेवावी लागते आणि आमचे पूर्ण समाधान झाल्यावर, मगच आम्ही मुलाचा कायदेशीर ताबा देतो.''

''अफकोर्स... अफकोर्स... पुरती तपासणी आणि स्क्रुटिनी करून तुमचं समाधान झालं तर यांना मुलाचा ताबा द्या,'' शेखर आदरपूर्वक दयाळजींना म्हणाला.

''ठीक आहे,'' असं म्हणून दयाळजींनी एक फॉर्म श्रीकांतपुढे ठेवला. ''हा फॉर्म तुम्ही भरा आणि पंधरा दिवसांनी मूल न्यायला या,'' असे दयाळजी म्हणेपर्यंत श्रीकांतने फॉर्म भरायला सुरुवातसुद्धा केली होती.

''दयाळसाहेब, या मुलाची बर्थ डेट काय हो?'' फॉर्म भरता भरता श्रीकांतने विचारले.

''ते तर आम्हाला पण माहीत नाही. तुमच्यासाठी, तो या आश्रमात दाखल झाल्याची तारीखच त्याची बर्थडेट समजा,'' दयाळजींनी सुचवले.

''पण या बाळासाठी आम्ही आजच फॉर्म भरतोय. मग आजचीच बर्थडेट धरायला काय हरकत आहे?'' अपर्णा म्हणाली.

''जशी तुमची इच्छा!'' दयाळजींनी सहमती दर्शविली.

''गुड आयडिया. आपण आजच्याच दिवशी त्याचा वाढदिवस साजरा करू आणि त्याचे बारसे पण आजच करू. त्याचे नाव ठेवू आनंद,'' श्रीकांतने सुचविले.

सगळे कायदेशीर सोपस्कार पार पाडून 'आनंद' श्रीकांत-अपर्णाच्या संसारात आला आणि खरोखरच त्यांचा संसार आणि जीवन आनंदी झाले. बाळाची कामे करण्यात वर्ष कधी सरले ते समजलेच नाही. आनंदचा पहिला

वाढदिवस अपर्णाने थाटात - अगदी शानदार पद्धतीने साजरा केला. किती पाहुणे, किती लहान मुले, किती खेळणी आणि विविध भेटी! आनंदची खोली अगदी  खच्चून भरून गेली.

''अभिनंदन! आनंदचं वाढदिवसाबद्दल अभिनंदन आणि श्रीकांत-अपर्णा तुम्हा दोघांचंही अभिनंदन,'' अशी गर्जना करीतच शेखरने प्रवेश केला.

''आनंदचा वाढदिवस म्हणून त्याचं अभिनंदन ठीक आहे; पण आमचं कशाबद्दल?'' अपर्णानं विचारले.

''अरे, आपका भी ये हक बनता है मॅडम! अहो, तुम्ही दोघांनी एका अनाथ मुलाला घरी आणलंत आणि त्याला इतका लळा लावला, इतकं प्रेम दिलंत की कदाचित त्याच्या सख्ख्या आईवडिलांनी सुद्धा...''

''शेखर एक मिनिट...'' श्रीकांतने शेखरचे वाक्य अर्ध्यावरच तोडले. ''पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आनंद आता अनाथ नाही. आम्ही आहोत ना त्याचे आईवडिल. काय अपर्णा...'' असं म्हणत त्याने अपर्णाकडे अपेक्षेने बघितले. तर अपर्णा भेलकांडत आपल्या रुमकडे जात होती व शीला आणि जानकी तिला सावरायला तिच्यामागे धावत होत्या. 'अहो, अगं' करेपर्यंत आणि शीलानं तिला धरेपर्यंत अपर्णा जमिनीवर कोसळलीच. अचानक तिला काय झालं हे न समजून श्रीकांत तिच्याकडे धावला आणि शेखरने त्वरित खिशातून मोबाईल काढून डॉक्टरांना फोन लावला. पार्टीतले सर्व पाहुणे अपर्णाकडे धावले. श्रीकांत एकदम कावरा-बावरा झाला. जानकी व शीलाने अपर्णाला धरून बेडरूममध्ये नेले आणि पलंगावर झोपवले.

''एसी चालू करा,'' कुणीतरी म्हणाले, श्रीकांतने एसीचे बटण ऑन केले. श्रीकांतचा उतरलेला चेहरा बघून अय्यर त्याच्याजवळ आले आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला धीर देत म्हणाले, ''डोन्ट बी पॅनिक श्रीकांत. अरे हे बर्थडेच्या प्रिपरेशनचं काम करून ते थकलं असेल म्हणून तेला चक्कर आलं असंल बग.'' तेवढ्यात ''बाजूला व्हा... बाजूला व्हा... डॉक्टर आले,'' असं म्हणत शेखर डॉक्टरांना घेऊन तिथे आला. त्याने सगळ्यांना आधी बेडरूमबाहेर जाऊन थांबण्याची विनंती केली. श्रीकांत आनंदला घेऊन बेडच्या बाजूलाच उभा राहिला. डॉक्टरांनी अपर्णाची

तपासणी केली आणि बाजूलाच टेन्शनमध्ये उभ्या असलेल्या श्रीकांतला म्हणाले, ''काँग्रेट्स मिस्टर श्रीकांत! अपर्णा आई होणार आहे आणि तुम्ही बाप होणार आहात.''

''काय? काय... माझी अपर्णा आई होणार आहे? ऐकलंस आनंद, अपर्णा आई होणार आहे,'' असं म्हणून कडेवरच्या आनंदचे तो पटापट मुके घेऊ लागला.

नवीन येणाऱ्या बाळासाठी अपर्णाने स्वेटर करायला घेतला होता; पण आनंद सारखा मधेमधे येऊन विणलेला स्वेटर ओढीत होता. ती उचलून त्याला बाजूला ठेवीत होती. तो पुन्हा पुन्हा तिच्या कामात डिस्टर्ब करीत होता.

''छेऽ! या मुलानं अगदी जीव नकोसा केला,'' असं म्हणत ती आनंदवर जरा ओरडूनच म्हणाली, ''आनंद, अरे मला काम का करू देत नाहीस? जा बरं. खेळ जरा तिकडं जाऊन,'' असं म्हणून पुन्हा तिनं आनंदला उचलून बाजूला ठेवलं. ठेवलं म्हणण्यापेक्षा जरा आदळलंच. साहजिकच आनंदनं भोकाड पसरलं. इतक्यात डोअरबेल वाजली. आनंदला तसंच रडत ठेवून अपर्णा दरवाजा उघडायला गेली. तिनं दरवाजा उघडताच, नेहमीप्रमाणे तिच्या कडेवर आनंद असणारच या समजुतीने त्याला घेण्यासाठी श्रीकांतने झटकन आपले दोन्ही हात पसरले; पण तो तिच्या कडेवर नाही हे पाहून तो म्हणाला, ''हे काय... दरवाजा उघडायला आज आनंदला नाही घेऊन आलीस? आहे कुठं तो?'' त्यानं असं म्हणताच अपर्णानं आतल्या बाजूला रडत असलेल्या आनंदकडे निर्देश केला आणि म्हणाली- ''तो काय रडत बसलाय तिकडं. आज तर रडून रडून त्याने माझा जीव खाल्लाय नुसता.'' तिनं असं म्हणताच श्रीकांत आनंदच्या दिशेने झेपावला आणि उचलून त्याला छातीशी लावत चुचकारू लागला, ''अले, आला हं बाबा. काय झ्यालं आमच्या आनंदला... मम्मीनं माललं... च्यल आपन मम्मीला मालू.. च्यल''असं म्हणून आनंदचा एक हात आपल्या हातात घेऊन तो अपर्णाला खोटं खोटं मारू लागला. अपर्णानं त्याचा हात झटकला आणि जरा घुश्श्यातच म्हणाली, ''काय हा पोरकटपणा लावलायस श्रीकांत... का मारतोस मला?''

''अगं गंमत करतोय मी; चिडायला काय झालं?'' हसत हसत श्रीकांत

म्हणाला.

‘‘गंमत सोड. हातपाय धुवून घे. मी तुझ्यासाठी चहा आणते,’’ असं म्हणून अपर्णा जाण्यासाठी वळत असतानाच श्रीकांतनं झटक्यात तिचा हात पकडला आणि म्हणाला, ‘‘चहा आणशील गं, पण आधी आनंदसाठी मी काय आणलंय ते तर बघ,’’ असं म्हणून हातातील एक भली-मोठी पिशवी पुढे केली; पण तिकडे दुर्लक्ष करून ‘‘तूच बघत बस आणि दाखव तुझ्या आनंदला’’ असं म्हणून अपर्णा आत गेली.

श्रीकांत ती गेल्या दिशेने दिङ्मूढ होऊन बघतच राहिला. आज ही अशी का वागते आहे हे काहीच त्याला कळेना. बहुतेक आज आनंदनं तिला खूपच त्रास दिला असला पाहिजे, असं त्याला वाटलं. शांत झाली की येईल ताळ्यावर असं वाटून त्याने तो ट्रॅक जरा साईडिंगला टाकला आणि आनंदला उचलून आपल्या छातीशी घेतले.

‘‘अले अले.. आज काय झ्यालं मम्मीला. आज तू मम्मीला फालच त्लास दिलास वाटतं... लब्बाल आहेस नुसता,’’ असं स्वत:शीच पण आनंदला उद्देशून बोलत त्याने पुन्हा एकदा अपर्णा गेल्या दिशेने नजर टाकली. तेवढ्यात आनंदाने भोकाड पसरले.

‘‘ललायच्यं नाई - ललायच्यं नाई. हे बघ... हे बघ.. पप्पानं आनंदसाठी काय आणलंय...’’ असं म्हणून श्रीकांतनं बॉक्समधून बाजा वाजवणारं माकड काढलं आणि त्याला चावी भरून आनंदपुढे ठेवलं. नाचत नाचत आणि ‘तड् तड् तड् --- टम् टम् टम्’ असा आवाज बाजावर काढणारं ते माकड बघून आनंद खदाखदा हसू लागला. ‘काय शुंदर दिसतोय आमचा आनंद हशताना’ असं म्हणत तो आनंदचे पटापट मुके घेऊ लागला. तेवढ्यात...

‘‘श्रीकांत, ठेव त्याला बाजूला आणि चहा घे,’’ असं म्हणत अपर्णानं चहाचा कप त्याच्यापुढे केला.

‘‘घेतो गं. पण आधी आनंदचं खेळणं तर बघ!’’ श्रीकांत आपल्याच नादात म्हणाला.

‘‘श्रीकांत, सगळं घर खेळण्यांनी भरलंय. आणखी हे खेळणं आणायची काही गरज होती का?’’ अपर्णा घुश्श्यात म्हणाली.

‘‘म्हनून क्याय झ्यालं. कायले लब्बाला,’’ असं आनंदला म्हणत त्याला खाली ठेवलं आणि अपर्णाच्या हातून चहाचा कप घेता घेता, समजुतीच्या स्वरात तिला म्हणाला, ‘‘अगं, एक तर मुलगा आपल्याला. आपल्याकडची प्रेम, माया... सगळी त्याच्यावर उधळून टाकू...’’

त्याचे बोलणे अर्धवट तोडत अपर्णा म्हणाली, ‘‘नाही श्रीकांत! आता आपल्या घरी अजून एक आणि ते पण आपलं स्वत:चं बाळ येऊ घातलंय. आता आपला पैसा आणि प्रेम त्याच्यासाठी राखून ठेवायची सवय लावून घे.’’

हे ऐकून श्रीकांत चक्रावला, ‘‘अपर्णा, अगं काय बोलतेस हे?’’ संभ्रमीत होऊन त्याने प्रश्न केला.

‘‘बरोबर... अगदी बरोब्बर बोलतेय मी?’’ असं ठामपणे म्हणत अपर्णा झटक्यात आत गेली आणि वाचा बंद झाल्यासारखा श्रीकांत ती गेली त्या दिशेकडे नुसता बघतच राहिला.

त्या दिवशी अपर्णाचं भाजी निवडण्याचं काम सुरू होतं. ‘‘ही गावरान गवार निवडायची म्हणजे कटकट आहे अगदी,’’ असं स्वत:शीच पुटपुटत अपर्णा ती बारीक गवार निवडत बसली होती. आनंद सारखा मधेमधे लुडबूड करून निवडलेली गवार विस्कटून टाकत होता. म्हणून कपाटातली एक भली मोठी बाहुली काढून त्याला खेळायला दिली. इतक्यात डोअरबेल वाजली. ‘‘आता या वेळी कोण?’’ असं पुटपुटत तिनं दरवाजा उघडला, तर दारात शीला.

‘‘ये ये शीला, आज कशी काय वाट चुकलीस?’’ असं म्हणून तिनं शीलाचं स्वागत केलं.

‘‘अगं काय सांगू अपर्णा, या दोन पोरांच्या भांडणानं मी हैराण झालेय बघ. म्हणून पिंकूला इथल्याच एका नर्सरीत दाखल केलाय. तेवढीच दोन तास रिंकूला आणि पर्यायाने मला पण सुटका,’’ शीला म्हणाली.

‘‘अग, म्हणजे पिंकूला आता शाळेत सोडून आले. आता तो दोन तासांनी येणार. एका जाचातून माझी दोन तास सुटका. जाताजाता तुझ्याकडे डोकवावं असा विचार मनात आला म्हणून आले,’’ असं म्हणून कडेवरच्या रिंकूला अपर्णाच्या स्वाधीन करीत शीला खेळत असलेल्या आनंदकडे

धावली.

अपर्णानं मायेनं रिंकूला घेतलं आणि रिंकूच्या हातावरची खरचटल्याची जखम पाहून म्हणाली, ''अय्या, हे काय... याला इतकं खरचटलं कशानं?''

''ही पिंकूची करामत...'' शीला कृतककोपानं म्हणाली.

''पिंकूची करामत? म्हणजे ?'' अपर्णानं विचारलं.

''म्हणजे वाघाचे पाय, हत्तीचे कान अन् उंटाची मान,'' शीला हसत म्हणाली.

''अगं हसतेस काय अशी शीला? किती खरचटलं बघ की,'' अपर्णा काळजीनं म्हणाली.

''अगं काय सांगू अपर्णा, या रिंकूला पिंकूकडून वाचवायचं म्हणजे माझ्यासाठी एक मोठी डोकेदुखीच झालीय. किती वेळा सांगितलं की रिंकू अजून लहान आहे; त्याच्या अंगाशी झोंबू नकोस; पण ऐकतच नाही. बघावं तेव्हा त्याच्या अंगाशी झोंबाझोंबी खेळत असतो. आज असंच खेळताना त्याची नखं लागली बघ याला.''

आणि अपर्णाला शीला हे सगळं सांगत असताना, अचानक अपर्णा एका कल्पनेत हरवली. आनंद त्या कापडी बाहुलीशी खेळता खेळता बाहुलीला दोन्ही हातांनी धबाधबा मारतोय, उचलून आपटतोय; आणि एकाएकी अपर्णाला बाहुलीच्या जागी तिचं छोटं बाळ दिसू लागलं. बाळ छोट्या गादीवर झोपलं आहे. आनंद रांगत रांगत बाळाच्या जवळ जातो. बाळाच्या छातीवर, पोटावर धबाधबा मारून, हातातले खेळणे बाळाच्या डोक्यात मारतोय. बाळाच्या डोक्यातून भळाभळा रक्त वहातंय, या कल्पनाचित्रात वाहून जात अपर्णा 'आनंद' असं जोरानं किंचाळली. तिचं किंचाळणं ऐकून शीला तिच्याजवळ आली.

''अपर्णा... अपर्णा'' म्हणून तिला गदागदा हलवले. ''अपर्णा, अपर्णा, अगं काय झालं? आनंदच्या नावानं किंचाळलीस का? अग हा बघ आनंद माझ्याजवळ आहे - बाहुलीशी खेळतोय.'' शीला तिला समजवण्याच्या सुरात म्हणाली.

शीलाच्या या बोलण्याने अपर्णा भानावर आली आणि 'तेच तर' एवढं बोलून आनंदकडे धावली आणि बाहुली त्याच्या हातातून खेचून घेतली.

आनंद मोठ्याने रडू लागला; पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून अपर्णा आत निघून गेली. तिच्या त्या वागण्याचे आश्चर्य वाटून आणि काहीच न समजून शीला अपर्णा गेली त्या दिशेकडे बघतच राहिली. आनंदचे रडणे तिच्या कानात शिरतच नव्हते.

''अपर्णा... ये अपर्णा'' असं लाडानं बोलत श्रीकांतनं अपर्णाच्या कमरेत हात घातला.

''सोडा, सोडा मला! कुणीतरी बघेल,'' असं म्हणत अपर्णानं त्याचा हात झटकला.

''अगं आपण आपल्या बेडरूममध्ये आहोत. इथं कोण बघणार आपल्याला,'' असं म्हणत श्रीकांतने पुन्हा तिला जवळ ओढण्याचा प्रयत्न केला.

''श्रीकांत, आनंद बाजूला झोपलाय,'' असं म्हणत अपर्णाने पुन्हा श्रीकांतचा हात झटकला.

''म्हणून काय झालं? आपलाच मुलगा आहे तो,'' असं श्रीकांत म्हणताच अपर्णा ताड्कन म्हणाली, ''नाही, तो आपला मुलगा नाही. आपलं बाळ तर अजून माझ्या पोटात आहे.''

''अग अपर्णा, हे असं काय बोलतेस तू?'' श्रीकांत आश्चर्यानं म्हणाला.

''खरं तेच बोलतेय मी,'' असं ठामपणे म्हणत अपर्णा अचानक वळून श्रीकांतच्या कुशीत शिरली आणि त्याच्या छातीवर हात फिरवीत म्हणाली, ''श्रीकांत, माझं एक ऐकशील?

''सांग ना. तुझं म्हणणं मी कधी टाळलंय?'' तिला जवळ घेत आश्वासक सुरात श्रीकांत म्हणाला.

''आपण... आपण आनंदला बोर्डिंगमध्ये ठेवूया?'' अपर्णाने चाचरत प्रश्न केला.

''काय?'' अपर्णाला अचानक दूर लोटत श्रीकांत किंचाळलाच.

''अपर्णा, अगं तू काय बोलतेयस हे तुझं तुला तरी समजतंय काय?'' त्यानं आश्चर्यानं अपर्णाला प्रश्न केला.

''हो. मी काय बोलतेय ते मला चांगलं समजतंय. तुलाच समजलं नसलं तर पुन्हा बोलते हवं तर. आपण आनंदला बोर्डिंगमध्ये ठेवूया.'' अपर्णाने

त्याच वाक्याचा पुन्हा ठामपणे उच्चार केला.

''अपर्णा, तुला वेड लागलंय... पागल झालीस तू. यू आर गोइंग मॅड,'' श्रीकांत त्राग्याने म्हणाला.

''बिलकूल नाही. बुद्धी ताळ्यावर ठेवून चांगली शुद्धीत बोलतेय मी. वास्तव तेच सांगतेय. शहाणपणाचं बोलतेय.'' अपर्णा शांतपणे म्हणाली.

''हे... हे... वास्तव आहे? याला शहाणपणा म्हणतेस तू? स्वत:च्या मुलाबद्दल असं बोलशील तू?'' श्रीकांतनं तप्त आवाजात विचारलं.

''नाही... कधीच नाही!'' अपर्णा तितक्याच शांतपणे म्हणाली.

''नाही ना? मग आनंदबद्दल तुला असं बोलवतं तरी कसं?'' त्याच तप्त आवाजात श्रीकांत म्हणाला.

''कारण आनंद माझा मुलगा नाही आणि कुणा परक्या मुलाची छाया माझ्या मुलावर पडलेली मला मुळीच खपायची नाही,'' अपर्णा निश्चयी आवाजात म्हणाली.

''काय... काय म्हणालीस तू? आनंद परका?'' आश्चर्याने श्रीकांत म्हणाला.

''होय, परकाच! हेच वास्तव आहे. त्याच्या धमन्यातून वाहणारं रक्त आपलं नाही हे सत्य आहे,'' स्वरातला ठामपणा कायम ठेवून अपर्णा म्हणाली.

''अपर्णा, अपर्णा, अगं काय वेड्यासारखं बोलतेयस हे? अगं, याच आनंदवर तू पोटच्या पोरासारखा जीव लावलायस हे विसरू नकोस,'' श्रीकांत अजिजीने म्हणाला.

''काही विसरले नाही मी. सगळं लक्षात आहे माझ्या. पण आता माझं स्वत:चं मूल जर माझ्या पोटी जन्माला येणार आहे तर परक्या मुलावर मी का म्हणून जीव लावावा?'' अपर्णानं परखडपणे प्रश्न केला.

''शिट्. अपर्णा, अगं मी आता कसं समजावू तुला? जरा विचार कर - किती विश्वासानं आपण अनाथाश्रमातून आणलं आनंदला. त्या विश्वासाला असा तडा द्यायचा?'' श्रीकांत काकुळतीने म्हणाला.

''मी कुठं म्हणते विश्वासाला तडा द्यायचा म्हणून. त्याला सोडून देऊ असं नाही म्हणत मी. मी इतकंच म्हणतेय की आपण त्याला बोर्डिंगमध्ये

ठेवू. तिथं तो चांगल्याप्रकारे वाढेल, मोठा होईल. शिकून शहाणा होईल - आणि त्यासाठी होणारा सगळा खर्च आपण करूया की. ती जबाबदारी झटकत नाहीये मी,'' अपर्णा समजावण्याच्या स्वरात म्हणाली.

''अगं पण, बोर्डिंगमध्ये त्याला आईवडिलांचं प्रेम मिळणार आहे का?'' तिचं न पटून श्रीकांत म्हणाला.

''ते तर त्याच्या नशिबातच नसावं! आई-वडिलांचं प्रेम त्याच्या नशिबात असतं तर लहानपणीच आईबापाला गिळून बसला नसता. उलट हे त्याचं नशीब समज की, आपण त्याला अनाथाश्रमातून उचलून बोर्डिंगमध्ये घालतोय.'' अपर्णानं पुन्हा आपलं म्हणणं श्रीकांतच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला.

''नाही... अपर्णा... असे होणे नाही. आनंद आपल्या मुलाबरोबरच वाढणार... शिकणार... मोठा होणार...'' श्रीकांत ठाम स्वरात म्हणाला.

''ठीक आहे. हाच जर तुझा अंतिम निर्णय असेल तर मी घर सोडून जाते,'' त्याच ठामपणे अपर्णा म्हणाली.

''अपर्णा... अपर्णा... आता मात्र तू हे ठार वेड्यासारखी बोलतेयस,'' श्रीकांत उद्वेगाने म्हणाला.

''काही म्हण; पण आनंद आणि मी, आम्हा दोघांपैकी या घरात कुणी राहायचं, याचा निर्णय आता तुलाच घ्यावा लागेल,'' असं म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवून अपर्णानं डोक्यावरून पांघरुण घेतलं.

श्रीकांत पुरता हताश झाला. 'परमेश्वरा, कसलं धर्मसंकट उभं केलंस माझ्यासमोर...' विचार करून त्याचं डोकं फुटायची वेळ आणि नाईलाजाने त्याने मनात निर्णय घेतला. ''ठीक आहे. अपर्णा तूच राहशील या घरात. आय प्रॉमिस यू, ज्या दिवशी तुझं मूल या घरात येईल त्या दिवशी आनंद या घरात नसेल. बस्स? झालं तुझं समाधान?'' असा विचार करून श्रीकांतने व्याकुळपणे शेजारी निजलेल्या आनंदकडे नजर टाकली. आनंद झोपेत खुदुखुदु हसत होता.

'श्रीकांत... श्रीकांत' अशा दोन-तीन वेळा हाका मारूनही श्रीकांतचे लक्ष जात नाही असे पाहून शेवटी ऑफिस प्रोटोकॉलला न जुमानता 'श्रीकांत' अशी शेखरने मोठ्यांदा हाक मारली, आणि श्रीकांतने दचकूनच फाईलीतून

डोके वर काढून शेखरकडे बघितले.

''अरे लक्ष कुठे आहे तुझं? डोकं फाईलीत खुपसलं होतेस तरी मन नक्कीच कुठे तरी भरकटले होतं.'' असं म्हणत शेखर श्रीकांतच्या समोरच्या खुर्चीत स्थानापन्न झाला. ''काय बच्चू इतका कसल्या गहन विचारात गढला होतास?'' त्याने श्रीकांतला प्रश्न टाकला.

''अरे शेखर, तू कधी आलास?'' श्रीकांतने विचारले.

''मला येऊन जमाना झाला यार; पण तुझं लक्षच नाही. इतका कसल्या विचारात गढला होतास?''

''विचार? छे कसला विचार? विचार बिचार काही नाही. नथिंग ऑफ द सॉर्ट. तू चहा घेणार? खरं तर, आजची पार्टी तुझ्याकडे लागू आहे. एक रेग्युलर आणि एक स्पेशल अशी दोन इन्क्रिमेंट मिळाली आहेत ना तुला?'' असं म्हणत चहाची ऑर्डर करण्यासाठी श्रीकांतचा हात बेलच्या बटणाकडे गेला. इतक्यात 'नको... चहा नको...' असं म्हणत शेखरने त्याला अडवले.

''चहाचं राहू दे. तू विचार कसला करत होतास ते आधी सांग,'' जाब विचारण्याच्या स्वरात शेखरने विचारले.

''आता काय आणि कसं सांगू तुला शेखर.. अपर्णानं माझ्यापुढे एक मोठा प्रॉब्लेम उभा केलाय,'' धीम्या गतीने श्रीकांत म्हणाला.

''प्रॉब्लेम? कसला प्रॉब्लेम?'' शेखरने विचारले.

''थांब'' असा डाव्या हाताने शेखरला इशारा करून श्रीकांतने इंटरकॉम उचलला आणि ''मी सांगेपर्यंत कुणालाही माझ्याकडे पाठवायचं नाही किंवा फोन द्यायचा नाही.'' अशा सूचना मिसेस डिसोझाला देऊन, धिम्या गतीने तो आपला प्रॉब्लेम शेखरला सांगू लागला. ऐकता ऐकता शेखरच्या चेहऱ्यावर कधी प्रश्नचिन्ह, कधी आश्चर्य, कधी खेद तर कधी सहानुभूती, निराशा असे भाव उमटत होते.

सगळं सांगून झाल्यावर शेखर म्हणाला, ''श्रीकांत तू जे काही सांगितलंस त्यावर माझा विश्वासच बसत नाही.''

''विश्वास तर माझाही बसत नाही. शेखर अजूनही वाटतंय की हे मला पडलेलं एक घाणेरडं स्वप्न असावं. पण नाही शेखर, दुर्दैवानं हे सत्य आहे.'' असं म्हणत असताना श्रीकांतला भरून आलं. शेखर उठला. टेबलाला एक

वळसा घालून श्रीकांतजवळ गेला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून, त्याला शांत करत म्हणाला, ‘‘ठीक आहे. तू आधी शांत हो. काळजी करू नकोस. एका दृष्टीने तू घेतलेला निर्णय योग्यच आहे.’’ असं म्हणत असतानाच थोडा विचार करून शेखर म्हणाला, ‘‘डोन्ट वरी. आपण आनंदला पुन्हा आश्रमात पोहोचविण्याची व्यवस्था करू. मी बघतो काय करायचं ते. बाय द वे, अपर्णा वहिनींची डिलिव्हरी डेट कधीची आहे?’’

‘‘डिलिव्हरी डेट...’’ असं तो म्हणतो इतक्यात टेबलावरचा त्याचा मोबाईल वाजू लागला.

‘‘आता कोण?’’ असं म्हणत चरफडत फोन बघितला आणि घरचा फोन बघून हिरवे बटण दाबले.

‘‘हं बोल मंजुळा.. काय? कधी? बरं बरं, आलोच मी.’’ असं म्हणून त्याने फोन बंद केला आणि एकदम उठून शेखरला म्हणाला, ‘‘शेखर, अपर्णाच्या पोटात दुखायला लागलंय. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं.’’

‘‘चल! मी पण येतो बरोबर,’’ असं म्हणून शेखरही उठला आणि दोघेही घाईनेच बाहेर पडले.

अपर्णा लेबर रूममध्ये गेलेली होती. कॉरिडॉरमध्ये श्रीकांत, शेखर, शीला चिंतातुर मुद्रेने बसली होती. नर्सेस, वॉर्डबॉईज यांची धावपळ चालली होती. डॉक्टर शर्मिला आत अपर्णाला ट्रीटमेंट देत होत्या. काही कामासाठी त्या बाहेर आल्या. श्रीकांत एकदम त्यांच्याकडे धावला.

‘‘इज शी ऑलराईट ?’’ त्याने अधीरतेने विचारले.

‘‘मिस्टर श्रीकांत, परिस्थिती थोडी गंभीर आहे. बट डोन्ट वरी, वुई विल डू इट सेफली ॲज पॉसिबल.’’ डॉक्टर शर्मिलांनी त्याला धीर दिला.

‘‘पण डॉक्टर, डिलिव्हरी डेट तर अजून महिन्याने...’’ श्रीकांत उद्‌गारला.

‘‘हो, पण जरा कॉम्प्लिकेशन्स झालीस. ऑपरेशन करून डिलिव्हरी आत्ताच करावी लागेल.

‘‘पण तिची तब्येत बरी आहे ना?’’ मध्येच शीलानं विचारलं.

‘‘नाही. तब्येत थोडी गंभीर आहे,’’ असं शीलाला सांगून, श्रीकांतकडे

वळून त्या म्हणाल्या, ''मिस्टर श्रीकांत, मी तुम्हाला अंधारात ठेवू इच्छित नाही. ऑपरेशन दरम्यान आईच्या जिवाला किंवा बाळाला धोका उद्‌भवू शकतो. कदाचित...''

'''नाही डॉक्टर... तुम्ही असं काही होऊ देणार नाही. बाळ आणि अपर्णा दोघेही मला हवे आहेत प्लीज...'' श्रीकांत अजिजीने म्हणाला.

''होय मिस्टर श्रीकांत, म्हणून तर आम्ही ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतलाय. पण त्यासाठी तुमचे संमतीपत्र लागेल,'' असं म्हणून त्यांनी मागे हातात फॉर्म घेऊन उभ्या असलेल्या नर्सला इशारा केला आणि त्या लगबगीने आत गेल्या.

फॉर्मवर सही केली आणि श्रीकांत मट्‌कन बाजूच्या बाकावर बसला. त्याची छाती धडधडू लागली. डोळ्यासमोर अंधारी आली. परिस्थिती ओळखून शेखर त्याच्याकडे झेपावला. शीला पटकन पाणी आणायला धावली. शेखरने आपल्या दोन्ही हातांच्या मिठीत श्रीकांतला सावरले. आता मात्र श्रीकांतच्या मनाचा बांध फुटला. एवढ्या धीराचा श्रीकांत; पण त्यालासुद्धा हुंदके आवरेनात.

''श्रीकांत प्लीज... बी ब्रेव्ह... नथिंग विल गो राँग... सगळं काही ठीक होईल,'' असं म्हणत शीलाने आणलेले पाणी त्याने श्रीकांतपुढे केले.

थोड्या वेळाने  लेबर रुमचे दार उघडले. डॉ. शर्मिला हसतमुखाने बाहेर आल्या. ''कॉग्रॅच्युलेशन्स... श्रीकांत, तुम्हाला मुलगा झालाय आणि बाळ-बाळंतीण दोघेही सुखरूप आहेत.'' हे ऐकताच श्रीकांतनं आवेगानं डॉ. शर्मिलाचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन मनापासून त्यांचे आभार मानले आणि अधीरपणे विचारले, ''आम्ही आत जाऊन तिला बघू शकतो?''

''नॉट नाऊ! थोड्या वेळाने पेशंटला रुममध्ये आणतील; पण काळजी करू नका. दोघेही एकदम नॉर्मल आहेत,'' असं म्हणून डॉक्टर त्यांच्या केबिनकडे गेल्या.

''पेशंटला रुममध्ये आणलं आहे,'' हे शब्द सिस्टरने बोलताच - श्रीकांत झपकन आत धावला. मागोमाग शेखर आणि शीलासुद्धा.

आत शिरताच श्रीकांत प्रथम झेपावला तो अपर्णाकडे. ''अपर्णा, खरंच आज पुन्हा एकदा तू मला मिळालीस. मला तर भीतीनं माझा जीव जातोय

की काय, असं वाटायला लागलं होतं. थँक्स गॉड... थँक्यू व्हेरी मच...'' असं म्हणत त्याने शेजारच्या पाळण्यातल्या बाळाकडे नजर टाकली.

''किती गोड आहे ना बाळ!'' तो म्हणाला.

''हो. अगदी आपल्या आनंदसारखं,'' अपर्णा म्हणाली. आणि इकडे-तिकडे बघत तिने विचारले, ''हे काय... आनंदला नाही आणलंस बरोबर?'' हे ऐकून अडखळतच श्रीकांत म्हणाला,

''नाही... म्हणजे आम्ही... म्हणजे त्याला...''

''म्हणजे... तुम्ही आनंदला बोर्डिंगमध्ये पाठवलंत...'' अपर्णानं घाईत विचारलं. यावर काय बोलावं हे श्रीकांतला सुचेना. तेव्हा शेखरच पुढे होत म्हणाला,

''नाही म्हणजे अजून नाही पाठवलं; पण तुम्ही घरी यायच्या आत आम्ही त्याला परत आश्रमात पाठवणार आहोत. डोन्ट वरी - मी करीन सगळी व्यवस्था.''

हे ऐकताच अपर्णा एकदम आवेगाने म्हणाली,

''नाही... नाही... आनंदला कुठेही पाठवायचं नाही. माझा आनंद मला हवाय!'' हे ऐकून श्रीकांत आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला,

''पण तू तर म्हणत होतीस की...''

''वेडी, वेडी झाले होते मी. त्या वेळी कोणतं भूत माझ्या डोक्यावर बसलं होतं कुणास ठाऊक. पण जेव्हा मला बाळंतपणाच्या कळा जाणवू लागल्या, मी जगतेय की मरतेय असं वाटू लागलं, तेव्हा मनात विचार आला की मी मेले तर माझ्या बाळाला कोण सांभाळेल? कोण बघेल त्याच्याकडे? कोण देईल त्याला आईचं प्रेम? या प्रश्नांनी मी हवालदिल झाले. मातृत्वाच्या भावनांनी माझा रोमरोम आकांत करू लागला. परमेश्वरा, माझ्या बाळासाठी तरी मला वाचव. माझ्या बाळाला आईविना करू नकोस... दया कर... दया कर... आणि देवानं माझी ती आर्त हाक ऐकली आणि तेव्हा मला जाणवलं - ॲक्सिडंट झाला तेव्हा मरताना त्या माऊलीनं असाच आकांत आनंदसाठी केला असेल. अशीच कळवळून देवाला साद घातली असेल. तिच्या नशिबात कदाचित मुलाचं प्रेम नसेल म्हणून तिची हाक देवाला ऐकूच गेली नाही. पण ईश्वरकृपेने माझ्या नशिबात... दोन दोन मुलांचं प्रेम आहे.

त्याची मी का म्हणून वाटणी करू? श्रीकांत ताबडतोब माझ्या आनंदला घेऊन ये.''

हे सर्व ऐकून श्रीकांतचे डोळे पाणावले. ''ईश्वर, तुझी लीला अगाध आहे. फार मोठ्या धर्मसंकटातून तू मला वाचवलंस...'' असे मनोमन देवाचे आभार मानता मानता त्याच्या डोळ्यात ढगांनी गर्दी केली. परिस्थिती ओळखून शेखर म्हणाला, ''श्रीकांत, तू थांब इथंच. मी आणि शीला जाऊन आनंदला घेऊन येतो,'' असं म्हणून त्याने मागे वळून शीलाकडे पाहिले तर ती गायब! ''अरे, ही शीला कुठं नाहिशी झाली?'' तो पुटपुटला. इतक्यात आनंदला कडेवर घेऊन शीलानं दारातून एंट्री केली आणि म्हणाली, ''हे बघा, मी आनंदला घेऊन आलेय.'' असं म्हणत तिनं आनंदला अपर्णाच्या स्वाधीन केलं. अपर्णा मायेनं आनंदचे मटामटा मुके घेऊ लागली.

''पण शीला, तू कशी काय आनंदला घेऊन आलीस?'' शेखरनं आश्चर्यानं विचारले.

''अहो महाराज, मघाशी अपर्णा जेव्हा - हे काय, आनंदला नाही आणलंत बरोबर? असं म्हणाली तेव्हाच मी तिच्या डोळ्यात आनंदविषयीचं अपत्यप्रेम बघितलं आणि आनंदला आणायला धावले. आईचं अंत:करण मला कळतं बरं! आई आहे मी दोन-दोन मुलांची,'' आनंदला अपर्णाकडे देत शीला म्हणाली. आनंदला अपर्णानं झेपावून आपल्या कुशीत घेतलं आणि पटापट त्याचे मुके घेत ती म्हणाली, ''ए शीला मावशी तू एकटीच नाही काही, मीसुद्धा आता आई झालेय दोन-दोन मुलांची.''

हे ऐकून, नवीन बाळाला कडेवर घेत श्रीकांत दोघींना उद्देशून बाळाच्या वतीने बोबड्या सुरात म्हणाला, ''तुमी दोदी पन द्यास्त भाव खाऊ नका माधा बाबापन बाप धालाय दोन दोन मुलांचा!'' श्रीकांतच्या या उद्‌गारांनी मात्र हॉस्पिटलची ती खोली हास्यतुषारांनी भिजून चिंब झाली.

# कभी कभी ऐसा भी होता है!

'फोन मारी त्याला कोण तारी!' अशी एक नवी म्हण त्या रविवारी माझ्या मनात जन्माला आली. माझ्याकडे जर फोन नसता तर रविवार असूनही मी त्या दिवशी ऑफिसला गेलो नसतो आणि तो अनावस्था प्रसंग माझ्या आयुष्यात घडलाच नसता. खरं तर त्या दिवशी रविवार असल्याने, उशिरापर्यंत ताणून द्यायची, दुपारी झकास आमरसपुरी चापायची; संध्याकाळी बायकोबरोबर हलकासा चावटपणा करत, एक मस्त पिक्चर टाकायचा आणि रात्री घरी आल्यावर... असा ढासू बेत आखला होता. त्यासाठी आदल्या शनिवारीच चार डझनाची हापूसची पेटी आणि दोन बिअरच्या बाटल्या पण फ्रीजमध्ये आणून टाकल्या होत्या. इतकंच नाही तर येताना मिनर्व्हाची बाल्कनीची, शेवटच्या रांगेतली, कोपऱ्यातली, दोन तिकिटे पण काढून आणली होती. असा मस्त संडे स्पेशल प्रोग्राम ठरवला होता. पण 'हा हन्त हन्त!' माझं ते स्वप्नरूपी गुलाबी कमळ, साहेबाच्या त्या एका फोनने उद्ध्वस्त करून टाकलेच - शिवाय पुढचा तो दुरवस्था प्रसंग माझ्यावर आणला. काय घडलं ते सांगतोच तुम्हाला-

'गाढवाचं लग्न'मधल्या दादू इंदुरीकरप्रमाणे मी सदेह स्वर्गात गेलो होतो. रंभा, अप्सरांबरोबर खेळत होतो. मेनका मला उजवीकडून झोंबत होती तर उर्वशी डावीकडून झोंबत होती. झोंबीझोंबीच्या या खेळात अचानक मला जाग आली आणि लक्षात आले की, रंभा-उर्वशी नाही तर माझी बायकोच माझ्या अंगाला झोंबत होती. मला गदागदा घुसळत होती.

''अहो, अहो उठाना,'' मला आत-बाहेर हलवत ती म्हणत होती.

''किती वाजलेत?'' मी झोपाळलेल्या आवाजात विचारले.

''सात वाजलेत - उठा,'' तिचा परत आग्रह.

''सातच वाजलेत. आज संडे आहे. मी सावकाश उठीन,'' असं म्हणून मी पुन्हा स्वत:ला चादरीत गुरफटून घेतले.

''अहो, असं काय करता? उठा म्हणतेय ना,'' चादर खेचत ती पुन्हा म्हणाली.

''एवढं काय अडलंय माझ्यावाचून तुझं?'' मी करवादलो.

''अडलं माझं नाही, अडलंय तुमच्या साहेबाचं. बोला त्यांच्याशी,'' असं म्हणून तिने कॉर्डलेस माझ्या हातात कोंबला.

साहेब म्हटल्यावर मी ताडकन उठून उभा राहिलो आणि रिसीव्हर कानाला लावून म्हणालो, ''गुड मॉर्निंग सर, गुड मॉर्निंग'' पण माझ्या त्या गुड मॉर्निंगला काहीही प्रतिसाद न देता तो खडूस साहेब अगदी रुक्षपणे म्हणाला, ''मिस्टर जोशी, आय वाँट यू इन दि ऑफीस इमिजिएटली बाय नाइन थरटी शार्प'' आणि मला पुढे काहीही बोलू न देता खाडकन फोन बंद केला.

'आलीया फोनशी असावे सादर' या उक्तीप्रमाणे भराभर सगळं आटोपून साडेनऊच्या ठोक्याला ऑफिसात हजर झालो. रविवार असल्याने ऑफीस रिकामेच होते. गुड मॉर्निंग करायला नेहमीची टेलिफोन सुंदरी पण नव्हती. ज्या अर्थी साहेबाचा मोरे शिपाई केबिनच्या दारात, स्टुलावर तंबाखू मळत बसला होता त्या अर्थी साहेब आत होते. मला बघताच ''उशीर केला तुमी जोशी, सायेब कवाचे येऊन बसलेत,'' असं म्हणून माझी पहिली हजेरी मोरेने घेतली आणि माझ्यासाठी केबिनचे दार उघडले.

''गुड मॉर्निंग सर!'' असं म्हणून मी केबिनमध्ये एन्ट्री केली. माझ्या गुड मॉर्निंगला प्रतिसाद देण्याची गरज साहेबाला भासली नाही.

''मि. जोशी, दीज सम बिल्स आर रिक्वायर्ड टू बी फायनलायज्ड टुडे ओन्ली. सो कीप इट रेडी ऑन माय टेबल. नाऊ आय एम गोइंग विथ माय वैफ टू वॉच फिल्म,'' असं म्हणून माझा संडे खराब करून साहेब चालता झाला. कामं इतक्या तातडीचं का आहे वगैरे मला सांगण्याची त्याला गरजच भासली नाही आणि खानदानी मराठी असून तो ऑफीसमध्ये इंग्रजी

का बोलतो, हे मला कधीच कळले नाही.

सगळं कामं आटोपून चर्चगेट स्टेशनमध्ये घुसलो तेव्हा दुपारचे अडीच वाजले होते; आणि आमरसपुरीचे व मिनर्व्हातल्या चावटपणाचे बारा वाजले होते. माणसांनी तुडुंब वाहणाऱ्या या स्टेशनात, रविवार असल्याने, आज अगदी तुरळक माणसे दिसत होती. इंडिकेटर फलाट नंबर पाचवर दोन पंचेचाळीसची बोरिवली ट्रेन लागल्याचे दाखवत होता. गाडी सुटायला बराच वेळ होता, तरी पण, सवयीप्रमाणे धावत जाऊन नेहमीच्या (फर्स्टक्लास लेडीजमागे) डब्यात शिरलो. डबा जवळजवळ रिकामाच होता. बसायला चांगली जागा हेरण्यासाठी नजर इकडेतिकडे फिरत असताना एका जागी स्थिर झाली. स्थिर झाली म्हणजे खिळूनच राहिली.

'कोण्या गं सुभगाची मदन मंजिरी सांग सखे सुंदरी' ही शाहीर पठ्ठे बापूराव यांची लावणी आठवली.' ज्यो भी हो तुम खुदाकी कसम लाजवाब हो'' ही ओळ समोर मूर्तिमंत झाली. केवळ अनुपम सौंदर्य। उजव्या बाजूला एका खिडकीत ती बसली होती. हातात कुठले तरी एक जाडजूड पुस्तक होते. पुस्तक वाचण्यात ती अगदी दंग झाली होती. मी बसायला जागा हेरतच होतो. तिच्या शेजारची सीट रिकामीच होती. बहुतेक ती एकटीच असावी. 'बसावं तिच्या शेजारी' असा विचार मनात आला आणि झेपावलो त्या दिशेने. जवळ गेलो आणि दुसरे मन म्हणाले, 'अरे, सगळा डबा रिकामा आहे. आजूबाजूला खूप जागा रिकाम्या आहेत. तिथं बसलो तर आजूबाजूला बसलेले इतर लोक काय म्हणतील? मुद्दामच आपण तिथं बसलो असं म्हणतील.' सभ्यपणाच्या या भावनांनी ते धाडस मी करू शकलो नाही. तिच्याच जवळ, पण शेजारी न बसता मी समोर बसलो. तिच्या शेजारच्या रिकाम्या सीटवर कोण बसणार आहे, याची मला उत्सुकता लागून राहिली.

माझ्यानंतर आणखी काही लोक आले. डब्यात शिरणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष आधी त्या जागेवर जात होते; पण माझ्याप्रमाणेच त्यांचेसुद्धा तिथं बसण्याचे धाडस होत नव्हते. प्रत्येकजण तिकडे बघायचा आणि जवळच पण दुसरीकडे कुठे तरी जाऊन बसायचा. प्रत्येकाचे लक्ष मात्र त्याच जागेवर होते. कोण भाग्यवान तिच्या शेजारच्या जागेवर बसणार आहे, याची उत्सुकता प्रत्येकाच्या नजरेत दिसत होती. मी तर मनात म्हणत होतो की

गाडी सुटेपर्यंत तिथं कुणीच बसू नये. गाडी सुटली की वारा खायच्या मिषाने आपणच उठून तिथं बसावं, माझं लक्ष सारखं फलाटावरच्या आणि माझ्या घड्याळाकडे जात होतं. एकदा तर मला रुमाल टाकून ती जागा धरण्याचा मोह झाला; पण मी आवरला. आता फक्त एक मिनिट आणि गाडी सुटणार! वारा खाण्याची पूर्वतयारी म्हणून खिशातला रुमाल काढून मी वारा घेऊ लागलो. उठण्यासाठी थोडी हालचाल पण मी केली. माझ्यासारखेच विचार मनात येऊन आणखी काही जणांनी तशी हालचाल केल्याचे मी पाहिले. पण यापैकी कोणत्याही गोष्टीकडे तिचे अजिबात लक्ष नव्हते. ती तिच्या पुस्तक वाचनात तल्लीन होती.

थोडे क्षण, गाडी सुटायला थोडेच क्षण उरले. इतक्यात...

इतक्यात एक अतिशय फाटका, केस पिंजारलेला, दाढी वाढलेला, ढगाळ लेहेंगा-झब्बा घातलेला बावळट दिसणारा माणूस डब्यात शिरला. त्याच्या हातात एक चण्याची पुडी होती. त्यातला एक एक चणा तोंडात टाकत त्याने इकडेतिकडे पाहिले आणि सरळ येऊन तिच्या शेजारच्या रिकाम्या जागेवर बसला. त्याला तिथं बसलेला बघून, माझ्यासकट, प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर आणि डोळ्यांत एकच भाव. 'काय बावळट आणि अजागळ माणूस आहे. ती किती सुंदर, स्मार्ट आणि हा हेल्या बसला जाऊन तिच्या जवळ. अरे आपण कसे, ती कशी? काही सारासार विचार? तिच्या जवळ बसण्याची लायकी आहे का हेल्याची? काय एकेक चणा तोंडात टाकतंय ध्यान?' हेच विचार प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वाचत होतो मी. पण तिला या सगळ्याचे काहीच वाटत नव्हतं. तिचं लक्षच नव्हतं. ती हातातले पुस्तक वाचण्यात बुडून गेली होती. गाडी सुरू झाली होती. त्याच्या पण चेहेऱ्यावर कसलेच भाव नव्हते. तो पुडीतले चणे खाण्यात दंग होता. एक-एक चणा आधाशीपणे तोंडात टाकत होता. जणू काय चार दिवस जेवला नव्हता. तिच्याकडे तर त्याचे एकदाही लक्ष गेले नव्हते. तो चणे खाण्यात दंग, ती पुस्तक वाचण्यात दंग! ते बघून मी मात्र मनात चरफडत होतो. सालं आपलं चुकलंच. आपल्याला चान्स होता तेव्हाच तिथं बसायचं होतं; पण आपण च्यायला डेअरिंग नाही केलं. मला शंभर टक्के खात्री आहे की, तिथं असलेल्या प्रत्येकाच्या मनात असेच विचार चालू होते. पण तिला त्याचे

काहीच नव्हते. ती वाचनात गुंग होती. स्टेशन मागून स्टेशन सोडत गाडी धावत होती.

त्याने पुडीतले चणे खाऊन संपवले. त्या पुडीच्या कागदाचा बोळा करून तो तळहातावर गोल गोल फिरवला आणि चक्क तिच्या अंगावरून झुकून तो बोळा खिडकीतून बाहेर फेकून दिला. तिला त्याचा थोडा स्पर्श झाला असावा, पण ती काहीच बोलली नाही. फक्त स्त्री सुलभ लज्जेने थोडी मागे सावरली. तिचे त्याच्याकडे लक्षच गेले नाही. ती वाचनात मश्गुल होती. कागदाचा बोळा फेकून झाल्यावर, जणू आपण काही गैर केलेच नाही असे भाव चेहेऱ्यावर आणून, मागे बाकाच्या पाठीला डोके टेकून, संभावितपणाचा आव आणून त्याने डोळे मिटून घेतले. ते दृश्य बघून बाकीच्या लोकांचा जळफळाट झाल्याचं त्यांचे चेहरे सांगत होते. मला मात्र तिच्या शेजारी न बसल्याचा चांगलाच पश्चात्ताप झाला होता. एक चालून आलेली संधी मी हुकवली आणि त्या भुक्कड माणसानं ती घेतली, याचं मला मनोमन वाईट वाटलं. पण यातलं तिला काहीच कळत नव्हतं. ती वाचनात गढून गेली होती. गाडी पुढे पुढे चाललीच होती.

हळूहळू त्याची मान डोलू लागली. तो डुलक्या घेऊ लागला. गाडीच्या गतीबरोबर हलू लागला. झोप लागल्याचा बहाणा करू लागला. पण मला पक्की खात्री होती की आतून तो नक्कीच जागा होता. झोपेच्या मिषाने तिच्या अंगाला अंग भिडवायला बघत होता. डांबीस, पक्का डांबीस होतो तो! गाडीच्या गतीबरोबर त्याची मान तिच्या खांद्यावर झुकायला लागली. येण केण प्रकारेण तिला स्पर्श करायला हपापलेला होता स्सा... आता मला त्याच्याबरोबर तिचा पण राग यायला लागला. अरे, तिने थोडा तरी प्रतिकार करायला हवा होता. त्याच्याकडे एखादी नाराजीची नजर टाकायला हवी होती. किंबहुना त्याला चांगला झापायला हवा होता. त्याने काही गडबड केली असती तर मी होतो ना.. पण नाहीच... तिने त्याची काही दखलच घेतली नाही. ती तिच्या वाचनात रममाण.

गाडीची गती वाढत होती, तसे त्याचे डुलणे आणि हलणे पण वाढत होते. वारंवार तो तिच्या खांद्यावर झुकत होता. ती त्याच्याकडे न बघता, तिथल्या तिथे स्वत:ला सावरत होती, पदर आवरत होती. हे बघून माझी

मात्र अस्वस्थता वाढत होती. आणि मी मनातल्या मनात कधीपासून वाट बघत होतो तो क्षण आला. तिच्या मानेवर झुकता झुकता एका क्षणी अचानक त्याची मान तिच्या खांद्यावर टेकली... आता मात्र दम धरणे मला शक्य नव्हते... झटकन मी माझ्या जागेवरच उठून उभा राहिलो आणि उजव्या हाताच्या पंजाला खालीवर झटके देत, हलवून, संतापाने म्हणालो,

''ए... तू ऊठ... आधी तू इथून... ऊठ''

''क...क काय झालं?'' त्याने गांगरून विचारले.

''तू आधी तिथून ऊठ!'' माझा पारा चढत चालला होता.

''अहो, पण झालं काय ते तर सांगाल?'' त्याने गोंधळून विचारले.

''काय झालं? वर मलाच विचारतोस काय झालं?''

''खरंच मला कळलं नाही हो. सांगा ना काय झालं?'' त्याने अधिकच गोंधळून विचारले.

''तू डब्यात चढल्यापासून बघतोय मी. सबंध डबा रिकामा असताना, इतक्या जागा मोकळ्या असताना, तू नेमका या बाईशेजारी येऊन बसलास. बसलास ते बसलास, पण सभ्यपणे शांत बसावे की नाही. पण नाही. गुंड, मवाली आहेस रे तू! पक्का आंबटशौकी आहेस तू. अरे, त्या बाईच्या अंगावरून झुकून खिडकीतून कागद काय टाकतोस, झोपेचं सोंग घेऊन सारखा तिच्या अंगावर काय पडतोयस, आणि आता तर चक्क तिच्या खांद्यावर मान? तुला काय वाटलं? बाई एकटी आहे? तू तिच्याशी कसाही वागू शकतोस? अरे, आपण कोणत्या देशात राहतो, आपल्या परंपरा काय, आपली सभ्यता आणि संस्कृती काय, याचा थोडा तरी विचार करायचास? अरे, पर स्त्री मातेसमान, परस्त्री बहिणीसमान, ही आपली भारतीय संस्कृती. आणि तू तिच्याशी असा बेलगाम वागतोयस?'' मी बेभान होऊन त्याच्यावर तोफ डागली. माझ्या बोलण्याला आजूबाजूच्या लोकांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे मला त्यांच्या चेहऱ्यावरून दिसले. पण एवढ्या गोळ्या मी झाडल्या तरी तो ढिम्म! आपल्या उजव्या हाताच्या चार बोटांची खालीवर इशारेवजा हालचाल करीत तो शांतपणे मला म्हणाला,

''अहो, शांत व्हा आणि बसा. ती आईप्रमाणे, बहिणीप्रमाणे तुम्हाला असेल - पण माझी ती लग्नाची बायको आहे. मी तिला शोभत नाही, असे

जरी तुम्हाला वाटत असले तरी तिला मी मनापासून पसंत आहे. आणि हो, आमचा प्रेमविवाह झालेला आहे.''

हाय-वे-वरून भरधाव धावणारा ट्रक अचानक पंक्चर व्हावा, त्याप्रमाणे फुस्स होऊन मी खाली बसलो.

खैर! चलो कभी कभी ऐसा भी होता है!

# अजब प्रेमाची गजब गोष्ट

ही माझी, हो चक्क माझीच प्रेमकथा आहे. अगदी माझ्या गद्धे-पंचविशीतली. ऐन प्रेमवयातली प्रेमकथा आहे. खरंतर कुठल्याही वयात केलेले प्रेम म्हणजे चक्क गद्धेगिरी असते. कृपया शब्दाकडे नीट लक्ष द्या. 'केलेले प्रेम' असा शब्दप्रयोग मी केला. बसलेले प्रेम, झालेले प्रेम, जमलेले प्रेम इत्यादि प्रेमाच्या अन्य कॅटेगरीजचा उल्लेख मी अजिबात केलेला नाही. ते म्हणतात ना 'प्यार किया नही जाता हो जाता है,' वगैरे... तसं...

तो काळ उपेक्षितांचे अंतरंग वगैरे जाणून घेण्याचा होता. म्हणजे उपेक्षित लोकांबद्दल, प्राणीमात्रांबद्दल वगैरे, समाजात एक भलताच कळवळा निर्माण झाला होता. उदा० रावणाने कितीही दृष्कृत्ये केली असली तरी तो रामापेक्षा कसा श्रेष्ठ होता; सीता ही रामाबरोबर वनवासात गेली, त्यामुळे रामाला चौदा वर्षे वनवास झाल्याने तिचे काहीच बिघडले नाही; पण पती लक्ष्मण, रामाबरोबर वनवासात गेला आणि त्यामुळे उर्मिला बिचारी चौदा वर्षे राजवाड्यात एकटीच राहिली. हे तिचे दु:ख सीतेच्या दु:खापेक्षा श्रेष्ठ! पाचही पांडवांना आपले हक्काचे राज्य मिळविण्यासाठी जन्मभर संघर्ष करावा लागला; तरीसुद्धा, पांडव असूनही, कौरवांत राहावे लागल्यामुळे कर्ण त्यांच्या (पांडवां)पेक्षा श्रेष्ठ!

त्या काळात हाजी मस्तानचे गुणगान करणाऱ्यांची आणि रामन राघवनबद्दल कणव दाखवणाऱ्यांची संख्यासुद्धा कमी नव्हती. एकूण काय तर उपेक्षित आणि दुर्लक्षितांना प्रेम आणि कणव दाखविण्याचे ते दिवस होते. आणि याचा माझ्या मनावर इतका जबरदस्त पगडा बसला होता की,

आपणसुद्धा उपेक्षित आणि दुर्लक्षितांसाठी काहीतरी करायलाच हवे म्हणून माझे मन फुरफुरू लागले.

आणि त्या दिवशी तशी संधी आयतीच चालून आली. मी बसच्या रांगेत उभा होतो. माझा नंबर साधारण सातवा-आठवा होता. माझ्या मागे तीनचार नंबर सोडून एक कन्या रांगेत येऊन उभी राहिली. खरं तर रूप ही ईश्वरदत्त देणगी असते; पण तिला ती ईश्वराने दत्त केली नव्हती म्हणजे दिली नव्हती, यात त्या बिचारीचा काय दोष?

कोलकृष्ण वर्ण(कोलकृष्ण म्हणजे कोळशापरी काळा), पण त्याला काळा न म्हणता 'सावळाचि रंग तुझा' असे म्हणावे. अशा या सुकुमारीच्या हत्तीप्रमाणे पुढे आलेल्या दोन टोकदार सुळ्यांकडे आणि विस्कटलेल्या रांगेसारख्या दंतपंक्तीकडे पाहिले. चेहऱ्यावर देवीच्या व्रणाच्या खुणा ठेवून गेलेल्या, निबर आणि राठ चेहऱ्याकडे पाहिले. नाक तर दिसलंच नाही. केवळ बायकी पंजाबी ड्रेस घातला म्हणूनच तिला मुलगी म्हणायचं. अन्यथा मुलगी म्हणावं असं काहीही तिला देवानं दत्त केलं नव्हतं - अर्थात दिलं नव्हतं.

देवाने भले तिला स्त्री म्हणून जनानी सौंदर्य दिलं नसेल; पण दिल (मन) तर नक्कीच दिलं होतं. तिला बघितलं आणि मनोमन तिची दया आली. मनोमन देवाकडे करुणा भाकली. देवा, तिच्या स्त्रीत्वावर असा अन्याय का केलास? ती एक स्त्री आहे. तरुण, जवान आहे. आपल्याकडे कुणी बघावं, आपल्या दिशेने एखादं स्मित हास्य फेकावं, आपल्याकडे बघून एकाच डोळ्यांची उघडझाक करावी, पुन्हापुन्हा आपल्याकडे नजर वळवावी. जमल्यास एखादा फ्लाइंग कीस आपल्या दिशेने उडवावा, अशा तारुण्यसुलभ भावना तिच्याही मनात येत असतीलच की.

पण हा हन्त हन्त! तिला असं हे न देखणेपण देऊन तिच्या तारुण्यसुलभ कोमल भावनांचा देवाने अगदी चक्काचूर केला होता. तिचा असा अपेक्षाभंग करून देवाने तिला अगदी उपेक्षित करून ठेवले होते. असा विचार मनात आला. मात्र एक भन्नाट कल्पना चमकली. उपेक्षितांच्या मनात दोन आनंदाचे क्षण फुलविण्यासाठी फुरफुरणारे माझे मन थुईथुई नाचू लागले. यस्. धिस इज दि चान्स- बस! ठरवलं, या उपेक्षितेच्या मनात प्रेमाचं चांदणं फुलवून

काही क्षण का होईना; पण तिच्या नीरस आणि निराश जीवनात थोडा आनंद फुलवायचा आणि लगेच कामाला लागलो.

माझ्या मनात चाललेल्या या विचारांच्या दरम्यान एखाददुसरी बस माझ्या नकळत येऊन गेली असावी. कारण माझ्यापुढची रांग थोडी कमी झाली होती. मी सहेतुक माझी नजर रांगेतल्या तिच्याकडे वळवली. 'ती'च्या जागी जर एखादी सुंदर मुलगी असती तर अख्ख्या रांगेच्या नजरा सारख्या सारख्या तिच्याकडेच वळत राहिल्या असत्या. पण त्या उपेक्षितेच्या मनात आनंद फुलविण्यासाठी मी मात्र कंबर कसली होती. माझी नजर कधी थेट तर कधी कडेच्या कोपऱ्यातून मी 'ती'च्याकडे वळवीत राहिलो. तुम्हाला समजेल अशा भाषेत सांगायचं तर मी रांगेतल्या 'ती'च्या वर चक्क लाइन मारू लागलो. हे 'ती'च्या तर ध्यानात आलंच असावं; पण रांगेच्या पण ध्यानात आलं असावं. माझी टेस्ट बघून, आवड बघून एखादा दुसरा मनातल्या मनात मला हसलासुद्धा असावा. पण मला त्याची तमा नव्हती. उपेक्षितेच्या जीवनात आनंद फुलविण्याच्या कल्पनेनं मी पुरता पछाडलो होतो. आणि त्यामुळे सारखा पीछे मुडकर 'ती'च्याकडे बघत होतो. एकदा तर ती माझ्याकडे बघून हसल्याचा मला भास झाला. इतक्यात एक बस आली. मी त्या बसने सहज जाऊ शकलो असतो; पण नाही गेलो. 'ती'च्यासाठी थांबलो.

आणखी एक बस आली. त्या बसमध्ये आधी 'ती'ला चढू दिलं, नंतर मी चढलो. खरं तर मला 'ती'च्या शेजारीच बसायचं होतं; पण डबल सीटमधल्या एक सिंगल रिकाम्या सीटवर 'ती' बसली आणि मी 'ती'च्या थोडा मागे तशाच एका सिंगल रिकाम्या सीटवर बसलो. 'ती'च्या शेजारचा माणूस दुसऱ्या एका रिकाम्या झालेल्या सीटवर शिफ्ट झाला आणि एक तरुण 'ती'च्या शेजारी रिकाम्या झालेल्या सीटवर बसला. आणखी एक जागा रिकामी झाल्यावर तो ही तिकडे सटकला आणि 'ती'च्या शेजारची सीट पुन्हा रिकामी झाली. माणसं दुसरीकडे जागा रिकामी होण्याची वाट बघत उभी राहिली पण 'ती'च्या शेजारच्या रिकाम्या जागेवर कुणी बसेना. ती जर दिसायला सुंदर असती तर 'ती'च्या शेजारच्या रिकाम्या जागेवर उड्या पडल्या असत्या! पण 'ती'च्या शेजारी मात्र कुणीच बसत नव्हता. बिचारी मनातून खूप खट्टू झाली असावी.

बस! ठरवलं. कुणीच 'ती'ला सहवास देत नाहीना? आपण द्यायचा. मी झटक्यात माझ्या जागेवरून उठलो आणि 'ती'च्या शेजारी असलेल्या रिकाम्या जागेवर जाऊन बसलो आणि 'ती'च्याकडे बघून मोहक हसलो. विजेचा झटका बसावा तशी ती ताड्कन उठली. पायातली सँडल काढून माझ्या दिशेने नाचवीत, आपल्या पुरुषी, भसाड्या आवाजात म्हणाली, 'मेल्या, बसच्या लाईनपासून बघतेय. सारखा-सारखा माझ्यावर लाइन मारतोयस. तुला आया-बहिणी आहेत की नाही? हलकट साला!' असं म्हणून 'ती'ने सँडल परत आपल्या पायात घातली आणि हॅडऽऽ असं म्हणून माझ्या तोंडासमोर दोन वेळा झकास टाळ्या वाजवून, बसमधून उतरली. तेव्हा माझ्या लक्षात आलं की उपेक्षितांचा उद्धार करण्याच्या नादात चुकून मी 'सहा' नंबरच्या बसमध्ये चढलो होतो.

**(अर्थमंच, दिवाळी २०१०)**

# बायको प्रेमात पडते

का कुणास ठाऊक, पण अगदी पहिल्यापासून, म्हणजे मला कळत नव्हतं तेव्हापासून, मला 'पडणे' या गोष्टीची भयंकर चीड आहे. लहानपणी-सुद्धा मी चालताना पडलो की चिडायचो; लागलं म्हणून नव्हे, तर पडलो म्हणून. स्वत: पडलो तरी चिडायचो आणि दुसरा कोणी पडला तरी चिडायचो. केवळ या एकमेव कारणामुळे मी कधी निवडणुकीला उभा राहिलो नाही. इतकंच काय, पण प्रेमात वगैरे पडण्याच्या भानगडीत न पडता रीतसर पोहे खाऊन मी लग्न केलं आणि पोहे खातानासुद्धा, जमिनीवर एकही कण पडणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. लग्नात हुंडा, मानापमान वगैरे कोणत्याही अटी नव्हत्या. अट फक्त एकच होती; नव्हे, सक्त ताकीदच होती की बायकोने कोठेही, कधीही पडायचं नाही. इतकंच काय पण लग्नानंतर आम्हाला होणाऱ्या तीन (आमच्या वेळी ही सरकारी लिमिट होती) मुलांनी चालायला शिकताना सुद्धा पडता कामा नये. बस्!

बायको खरोखरच सुंदर, सुशील आणि सद्गुणी मिळाली. नम्र, मितभाषी मिळाली. कधी कसला हट्ट नाही, काही मागण्या नाहीत. शेजारीपाजारी जाऊन कुणाच्या कुचाळक्या करणं नाही. आपण बरं, आपलं घर बरं. नाही म्हणायला, दुपारनंतर आमच्या समोरच्या जोशीवहिनींकडे दोन घटका जाऊन बसायची आणि ते सुद्धा संध्याकाळच्या भातासाठी तांदूळ निवडत.

मुख्य म्हणजे लग्नात दिलेली ताकीद तिने कधी मोडली नाही. स्वत: तर कधी पडली नाहीच; पण आम्हाला झालेल्या दोन्ही मुलांना, चालायला शिकताना सुद्धा कधी पडू दिलं नाही. अशा प्रकारे, आहे त्यात समाधान

मानून खालमानेनं आणि शालीनतेनं ती माझ्याबरोबर सुखाने संसार करीत होती. दिसायला माझ्यापेक्षा सुंदर असूनही! पण त्या दिवशी आमच्या या सुखी संसाराला कुणा दुष्टाची नजर लागली आणि इतक्या वर्षात घडली नाही ती गोष्ट अचानक घडली.

नेहमीप्रमाणे मी संध्याकाळी ऑफिसातून घरी आलो आणि दारावरच्या कॉलबेलचं बटण दाबलं. 'आलेऽ आलेऽ' असा नेहमीपेक्षा वेगळाच पण फ्रेश आवाज आतून आला. अर्थात तो माझ्या बायकोचाच होता; पण त्या आवाजाला आज एक वेगळाच ताजेपणा, वेगळीच, काय म्हणतात ते... ताजगी होती. काही क्षणातच दार उघडले आणि मनाला धुंदधुंद करणारा, मोगऱ्याचा घमघमाट नाकात जाऊन माझे सर्व शरीर सुगंधित झाले.

'या' असं म्हणत, माझ्याकडे एक गोडगुलाबी हास्य फेकत, तिनं माझं स्वागत केलं. मला आवडणारी हिरवीकच्च जरीची बारीक काठाची पिवळी किनार असलेली साडी, तीवर शोभणारा, काँट्रास की काय म्हणतात तसा, लाल रंगाचा ब्लाऊज, साडीच्या रंगाला मॅचिंग बांगड्या आणि झुबकेदार मोत्याची, कोरीव कानातली. झक्कपैकी मेंटेन केलेल्या नैसर्गिक काळ्याभोर केश-संभारात, पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याचा, दशदिशांना सुगंध उधळीत असलेला भरघोस गजरा. वा! क्या बात है!! कितीतरी वर्षांनी माझं असं प्रसन्न आणि सुगंधी स्वागत झालं होतं.

दारातच तिने माझे हसून स्वागत केले आणि माझ्या हातातली ब्रीफकेस आदराने आणि अदबीने आपल्या हातात घेतली. 'हातपाय धुऊन घ्या' असं मला सांगून ती डौलदार चालीने अंतर्धान पावली. जणू काय एखादी परीच क्षणात माझ्यापुढे अवतीर्ण झाली आणि अचानक गुप्त झाली.

हा सगळा प्रकार बघून मी मात्र चांगलाच स्तिमित झालो. आजचा हा रंग काही वेगळाच होता. छानपैकी हातपाय तोंड धुऊन, बाथरूमचे दार उघडून मी बाहेर आलो तर हाताच स्वच्छ धुतलेला पांढरा शुभ्र टॉवेल घेऊन बायको हजर! आता मात्र कमालच झाली. नुसता रंगच वेगळा नाही, तर ढंगसुद्धा वेगळाच आहे याची मला तीव्रतेने जाणीव झाली आणि मी विचारात पडलो.

पुन्हा मोगऱ्याच्या सुगंधाने मी माझ्या विचारतंद्रीतून भानावर आलो.

माझ्या दंडाला धरून अगदी माझ्या अंगाला अंग घासत, तिनं मला आमच्या वनरुम किचनच्या हॉलमध्ये आणलं आणि अगदी हलक्या हाताने नाजुकपणे, एकुलत्या एक सोफाकम बेडवर बसवलं. छतपंखा, म्हणजे सीलिंगफॅन अंमळ फास्ट केला आणि 'आलेच हं' असं म्हणून पुन्हा त्याच डौलदार चालीनं किचनमध्ये अंतर्धान पावली.

आजचा एकंदरीत तिचा थाटमाट आणि रंगढंग पाहून मनात म्हटलं, 'कुछ तो गडबड है'- पण काय? मला काहीच अंदाज लागेना. हे सगळं, वेगळं आज कशासाठी चाललंय? असे विचार माझं डोकं कुरतडत असतानाच किचनच्या दारात ती पुन्हा प्रविष्ट झाली. तिथूनच माझ्याकडे एक स्मितहास्य उडवीत नाजूक नजाकतीनं चालत ती माझ्या जवळ आली. आणि हातातला ट्रे माझ्यासमोरच्या टीपॉयवर ठेवला. त्या ट्रेमध्ये, कांदे बटाटे घालून, वर पांढरे शुभ्र खोबरे आणि हिरवीगार कोथिंबीर पेरलेली, डोळ्यांना सुखावणाऱ्या पिवळ्या धम्मक गरमागरम पोह्याची डिश आणि आल्याच्या सुगंधाने नासिका तृप्त करणाऱ्या वासाचा वाफाळलेला चहाचा कप होता. झाल्या प्रकारावर हा मात्र कळस होता. आज माझा मूड तिनं भलताच रोमँटिक वगैरे केला होता. नक्कीच काहीतरी खास कारण होतं, पण काय?

पोह्याची बशी माझ्या हातात देऊन, ती माझ्या बाजूला पण थोड्या अंतरावर, मुलगी बघण्याच्या कार्यक्रमातल्या सारखी, अधोवदन म्हणतात तशी उभी राहिली. त्या रोमँटिकपणात तिचा हा दुरावा मला सहन होईना.

''एऽ...ऽ... अशी दूर का उभी? बैस ना इथं,'' माझ्या डाव्या बाजूच्या रिकाम्या सीटवर थापटत मी म्हणालो.

''नको, इथंच बरी आहे मी,'' किणकिणत्या आवाजात ती म्हणाली. तिचा आवाज पण आज वेगळाच लागला होता. जणू काय साक्षात लताच!

'''बैस गं!'' मी पुन्हा लाडीक आग्रह केला.

''नको हो, बरी आहे मी इथंच.''

पुन्हा तेच उत्तर. स्वरात लता आणि माझ्या मनात त्याच शंका. आजची ही सगळी ट्रीटमेंट का, हे काही मला कळेना. आल्या आल्या दारातच ते सुगंधी स्वागत. बाथरुममधून बाहेर आल्यावर टॉवेलची ती आदबशीर खातिरदारी, गरमागरम चहा-पोह्याचा बेत. नक्कीच काहीतरी सॉलिड डिमांड

असणार. पण नो प्रॉब्लेम! आज मी तिच्यावर फार खूष होतो. तिनं मला जिंकलंच होतं म्हणाना. बस! ठरलं! आज तिची कोणतीही डिमांड पूर्ण करायची.

''बोल, आज माझ्याकडून तुला काय पाहिजे?'' मी प्रामाणिक आणि सरळ प्रश्न विचारला.

''काही नको. खरंच काही नको.''

खाली बघत आणि मोझेक टाईल्सवर नसलेली माती डाव्या पायाच्या अंगठ्याने उकरत ती म्हणाली.

मी मनात विचार केला की काहीतरी डिमांड असल्याशिवाय अचानक इतकी खातिरदारी होणं शक्यच नाही.

''अगं सांग ना, शेजारच्या घाटपाड्यांसारखा फ्लॅट टीव्ही घ्यायचाय का?'' मी मधाळ स्वरात विचारले.

''नको हो, खरंच नको!'' पुन्हा तीच लता.

''मग नवीन ऑटोमॅटिक वॉशिंग मशीन?'' माझा प्रश्न. 'नाही हो' तिचे निग्रही उत्तर.

''मग बेलसरेवहिनींनी त्यांच्या चुलतमावस दिराच्या लग्नात घेतली तशी अबोली रंगाची पैठणी?'' मी.

''नाही हो, तसलं काही नाही?'' तिचं ठाम उत्तर.

''अगं, मग तुला हवंय तरी काय?'' मी कळकळून विचारले.

''मी कुठं म्हणाले मला काही हवंय म्हणून?'' मला निरुत्तर करणारा तिचा प्रश्न.

''अग मग कधी नव्हे तो आज तुझा एवढा नट्टापट्टा, माझी एवढी सरबराई, हे सगळं कशासाठी?''

''मला किनै... तुम्हाला काही सांगायचंय,'' संकोचाने तुटक स्वरात ती लाजत म्हणाली.

''अगं मग सांग ना, त्यासाठी एवढं लाजायला काय झालं? बिनधास्त सांग?'' मी खुल्या दिलानं सांगितलं.

''म्हणजे किनै... माझे - म्हणजे मी...'' ती चाचरत सांगू लागली.

मी मात्र ती काय सांगतेय हे ऐकायला भलताच अधीर झालो होतो.

शेवटी मनाशी काही तर्क काढून मीच म्हणालो, ''तुझ्या माहेरचे कुणी चार दिवसांसाठी राहायला येणार आहे का? येऊ दे ना. मग कधी येत आहेत ते?''

''नाही हो, मला सांगायचंय ते वेगळंच आहे.''

''अगं अगदी जगावेगळं असलं तरी सांग,'' मी.

''मला माहीत आहे, ते ऐकून तुम्हाला राग येईल. तुम्हाला आवडणार नाही... तुम्ही रागवाल. तरी सांगतेच मी.''

''अगं सांग माझे आई, नमनाला आधीच तेलाचे चार घडे वाया गेलेत,'' मी करवादलो.

''म्हणजे मी किनै, आज किनै, म्हणजे मी आज प्रेमात पडले!''

आधी चाचरत बोलत असलेलं वाक्य धीर एकवटून तिनं झटक्यात पूर्ण केलं.

मला तुम्ही अगदी प्रामाणिकपणे सांगा, की तुमची स्वत:ची लग्नाची सख्खी बायको, तुमच्या तोंडावर अगदी उघडपणे सांगतेय की, ''आज मी प्रेमात पडले'' तर तुमची रिॲक्शन काय होईल? नक्कीच तुम्ही प्रचंड आरडाओरडा कराल. तिला शिव्यांची लाखोली वाहाल. लाथाबुक्क्यांनी तिला तुडवाल, बडवाल, तसेच वेताच्या छडीने झोडपून काढाल; आणि ''पुन्हा तुझं हे काळं तोंड मला आयुष्यात दाखवू नकोस'' असं बजावून तिला घराबाहेर हाकलून द्याल- अगदी कायमची!

पण मी मात्र कमालीचा शांत राहिलो 'पडणे' या क्रियेची मला कितीही चीड असली तरी 'मी आज प्रेमात पडले' हे तिचे शब्द मी शांतपणे ऐकून घेतले आणि असीम कौतुकाने मी तिच्याकडे पाहू लागलो. मला तिचा गर्व वाटू लागला. अभिमान वाटू लागला. क्या बात है! लग्नानंतर इतक्या वर्षांनी सुद्धा माझी बायको कुणाच्या तरी प्रेमात पडली आहे, हे ऐकून तिचाच नाही तर माझा सुद्धा मला अभिमान वाटू लागला. ''गर्व से कहो ये हमारी बायको है'' असे मोठ्याने ओरडावे वाटले. पण शेजाऱ्यापाजाऱ्यांचं भान ठेवून तसं मोठ्याने न ओरडता हळू आणि मृदू आवाजात तिला म्हणालो, ''व्हेरी गुड... बायको.. व्हेरी व्हेरी गुड... आय ॲम प्राउड ऑप यू... पण आता मला एवढंच सांग की ज्यानं या वयातसुद्धा तुला मोहवून प्रेमात पाडलं त्या

भाग्यवंत महापुरुषाचं नाव काय?''

आईशप्पथ! तुम्हाला सांगतो, तिनं अगदी भारताच्या पंतप्रधानापासून म्युनिसिपालटीच्या ऑफिसात नोकरी करणाऱ्या शिपायापर्यंत आणि आमच्या सोसायटीच्या चेअरमन-सेक्रेटरीपासून ते सोसायटीच्या गेटवर पहारा देणाऱ्या वॉचमनपर्यंत कुणाच्याही प्रेमात पडल्याचं मला सांगितलं असतं तरी मी पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली, सुपरस्टार अमिताभ बच्चनच्या हस्ते तिचा जाहीर सत्कार केला असता; पण तिनं मला जे सांगितलं, ते ऐकून माझी तळपायाची आग मस्तकात गेली. रागाने लालेलाल होऊन खाऊ की गिळू अशा नजरेने मी तिच्याकडे पाहू लागलो. डोळ्याची वरची बाजू आकाशात आणि खालची बाजू पाताळात जाऊन बुबुळं बाहेर पडताहेत की काय असे मला झाले.

''मी गोविंदरावांच्या प्रेमात पडले,'' एका दमात ती म्हणाली. आणि त्या प्रेमात पडल्याचे तिने केलेले वर्णन ऐकून तर माझी बोलतीच बंद झाली.

''तसं म्हटलं तर गोविंदराव हे अगदी पाठीला पाठ लावून आले नसले तरी मला सख्ख्या भावासारखे. आमच्या समोरच्याच एक मजली बंगल्यात राहायचे. त्यांची पत्नी गोदावरी तर मला भाऊजीच म्हणायची. गोदावरीवहिनींकडे जाऊन गप्पा मारत, रात्रीच्या स्वयंपाकासाठी तांदूळ किंवा भाजी निवडणे हा तर माझ्या बायकोचा नित्यक्रमच असायचा. बंगल्यातल्या पहिल्या मजल्यावरच्या गॅलरीत बसून, रस्त्यावरची वर्दळ बघत, टाईमपास करणे हा त्यांचा नित्य छंद होता.

आजसुद्धा गप्पांचा कार्यक्रम आटोपून ती अशीच घरी यायला निघाली. लगबगीने जिना उतरताना तिचा पाय घसरला आणि ती पडली. तसं मला सरळ सांगावं की नाही? पण इतकं सरळ बोलेल तर ती माझी बायको कसली?

''मी गोविंदरावांच्या बंगल्यात पडले,'' असं म्हणण्याऐवजी ती म्हणाली, ''मी गोविंदरावांच्या प्रेमात पडले!'' कारण गोविंदरावांच्या बंगल्याचं नाव आहे 'प्रेम'!

**('नीहारा', दिवाळी २०१२)**

# पांडुरंग कुलकर्णी - अल्प परिचय

१८/७ (वेस्ट), प्रतीकनगर, येरवडा, पुणे ४११००६.
संपर्क : ९८२३०७९९९८/९८५०३९६७३७
E-mail : pandukul43@gmail.com

## - लेखन प्रपंच -

**रेडिओ कार्यक्रम** : आकाशवाणी (मुंबई)वरून सादर होणाऱ्या 'सहज सुचलं म्हणून' या कार्यक्रमाचे लेखन (पुस्तक प्रकाशित)

**दूरदर्शन** : 'अशा रंगल्या गप्पागोष्टी' तसेच 'इन्स्पेक्टर प्रताप' या मालिकांसाठी लेखन.

**व्हिडिओपट** : 'बाईचं ऐका - गाडीभर पैका' (शेमारू)
'अगंबाई सोळावं वरीस' (शेमारू)
'जय जीवदानी देवी' (कुणाल म्युझिक)

**रंगमंच** : 'होण्याआधीच काळजी घ्या' (नाटक)
'सर्व मंगल सावधान' (एकांकिका)

**कथा/ललित** : 'असंभव' (कथासंग्रह)
'मॉर्निंग वॉक' (लेखसंग्रह)

**गीतलेखन** : 'पोलिसाची बायको' (चित्रपट)
'सौभाग्य' (चित्रपट)
'हवालदार भोळा' (लोकनाट्य)
'लवंगी मिरची कोल्हापुरची' (लोकनाट्य)
(दिलीप कोल्हटकर दिग्दर्शित)
'आळीमिळी' (मालिका शीर्षकगीत)
'फिरकी' (मालिका शीर्षकगीत)
'प्रपंचमाया' (मालिका शीर्षकगीत)
'शुभमंगल सावधान' (मालिका/निर्णय)
अनेक व्हिडिओ/ऑडिओ अल्बम

**गौरव/सन्मान** : 'मेरे सामनेवाली खिडकीमे-' या कथेस डॉ. अ.वा. वर्टी कथा पारितोषिक (संवाद-नासिक)

'होण्याआधीच काळजी घ्या' या एड्सविरोधी नाटकाचा महाराष्ट्र शासन-आरोग्यखात्याकडून सन्मान आणि निर्मिती.

'पाणीच पाणी' या कविता सादरीकरणाबद्दल ७८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (नासिक) यांचे सन्मानपत्र.

भक्तीसेवा फौंडेशन (पुणे) काव्यवाचन स्पर्धा (राज्यस्तरीय) सन्मानपत्र.

'युवा महाराष्ट्र साप्ताहिक' (पुणे) यांचा 'नाट्यरत्न' जीवनगौरव पुरस्कार.

पश्चिमक्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात निवेदक म्हणून सन्मानपत्र.

महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान न्यास यांच्या लोकरंग लावणी महोत्सवात निवेदक म्हणून सन्मान.

आंतर कार्यालयीन शासकीय नाट्य-स्पर्धांतून अनेक पारितोषिके आणि सन्मान.

अनेक चित्रपट/मालिकांतून भूमिका.

**इतर** : 'भारूड भरती' हा गंमत-गीत काव्यसंग्रह प्रकाशनास सिद्ध.

'गंमत गप्पा-गंमत गाणी' या स्वलिखित रंगमंच कार्यक्रमाची निर्मिती आणि सादरीकरण.

# ई साहित्य प्रतिष्ठान

माणूस किंवा कोणताही सजीव संवेदनशील असतो. त्याच्या डोळयांसमोर कोणी तडफ़डत असेल तर तो आपोआप धावून जातो. म्हणून तर संकट्काळी आपण किंकाळी फ़ोडतो. कारण आपल्याला वाटते की आपली किंकाळी ऐकून, आपला टाहो ऐकून कोणी न कोणी धावून येईल. आपल्या रक्तातील लाखो करोडॊ वर्षांच्या शिकवणीचा तो भाग आहे. संकट काळी टाहो फ़ोडणं आणि दुसर्याच्या संकटात धावून जाणं हे आपल्या रक्तात असतं.

पण सध्याच्या व्यापारीकरणाच्या युगात नेमकी याच्याविरुद्ध शिकवण दिली जात आहे. समाज एका असंवेदनशीलतेच्या दिशेला वाटचाल करतो आहे. शेतकरी मरतो आहे, मरेना का? स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, होईनात का? ’जोवर आपल्या स्वतःपर्यंत संकट येत नाही (आणि ते येणारच नाही अशी खात्री आहे) तोवर मजा करून घ्या” अशी प्रवृत्ती वाढते आहे.

अशा वेळी समाजाला समाजभान यावे, संवेदना आणि सहवेदना जागी व्हावी हे काम उत्कृष्ट दर्जाचे साहित्य करते. प्रस्तुत पुस्तक तसेच आहे. आपण हे पुस्तक वाचा आणि इतरांना वाचायला द्या.

ई साहित्य प्रतिष्ठान दर महिन्याला अनेक उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करते. आपण त्यांचे सभासद व्हा. आणि आपल्या ओळखीच्या सर्व मराठी साक्षरांना या अभियानात सामिल करून घ्या.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

अधिक माहितीसाठी भेट द्या : www.esahity.com

आपले नम्र

टीम ई साहित्य